CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ८ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १९० | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



बंधुत्वाचा सिद्धांत अर्थशास्त्रात लागू करून आर्थिक व्यवहाराच्या विविध प्रणाली परस्पर सहकार्याने चालवून, स्वत:सोबतच समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न करतानाच राष्ट्राची प्रगतीकडे वाटचाल करणे, हेच सहकार चळवळीचे मूळ स्वरूप एक वैश्विक सत्य आहे.

**- स्व. बिंदुमाधव जोशी**
संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत

# राज्यात मादकपदार्थ विरोधी मोहीम सुरू

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**◆ मुंबई, ७ जून**


राज्यात आणि देशात 'नो टॉलरन्स फॉर ड्रग्ज' ही मोहीम तीव्र गतीने राबवली जात आहे. विविध तपास यंत्रणांच्या माध्यमातून अचूक माहिती गोळा करून मोठ्या कारवाया केल्या जात असून, कुठल्याही परिस्थितीत मादकपदार्थांच्या जाळ्याची पाळेमुळे खणून काढली जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आगामी काळातही या कारवाया सातत्याने सुरूच राहतील, असे त्यांनी सांगितले.



यंदाच्या मान्सूनबाबत आणि हवामानाच्या स्थितीवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या चिंतेची दखल घेतली. यंदाचे वर्ष अल-निनोचे असल्याने सरासरी पाऊस ९२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. सरासरी ९२ टक्के पाऊस असला, तरी मराठवाडा, पश्चिम विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे आणि राज्यातील आवर्षण प्रवण (दुष्काळी) भागांमध्ये या सरासरीपेक्षाही कमी पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

कमी पावसाच्या पृष्ठभूमीवर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येऊ नये, यासाठी त्यांनी योग्य वेळीच पेरणी करावी, असे आवाहन सातत्याने केले जात आहे. कमीत कमी पावसात शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त नुकसान कसे टाळता येईल, यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### ई-८५ इंधनाचा शेतकऱ्यांना फायदा



**ई-८५ या नव्या पर्यावरणपूरक इंधनाचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला होणार आहे. कारण आपला राज्य इथेनॉलच्या निर्मितीत देशात अग्रेसर आहे, असे फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारकडून इंधन मिश्रणाला मिळणारे प्राधान्य आणि १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्यांचे धोरण यामुळे येत्या काळात महाराष्ट्रातील ऊस उत्पादक आणि इतर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी भर पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

### इंधन दरवाढीवरून शरद पवारांना प्रत्युत्तर

**वाढत्या इंधन आणि गॅस दरांचे राजकीय हादरे सत्ताधाऱ्यांना बसतील, या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वक्तव्याचा फडणवीस यांनी समाचार घेतला. सध्या जागतिक पातळीवर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जगातील एकही देश असा राहिलेला नाही, जिथे पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे भाव वाढलेले नाहीत. ही जागतिक समस्या आहे. केंद्र सरकारला सर्वसामान्यांची चिंता आहे. योग्य वेळी यावर योग्य निर्णय घेतले जातील, असे फडणवीस यांनी सांगितले.**

## गडचिरोलीत येणारा लाखोंचा मद्यसाठा छत्तीसगडमध्ये जप्त

**◆ मानपूर, ७ जून**

छत्तीसगडच्या मोहला-मानपूर-अंबागड चौकी जिल्ह्यात एका ट्रकमधून ५०.२८ लाख रुपये किमतीची दारूची ८०० खोकी पोलिसांनी जप्त केली. हा मद्यसाठा तस्करीच्या माध्यमातून दारुबंदी असलेल्या गडचिरोलीत आणला जात होता, असा संशय असल्याचे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.

हा साठा गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेजवळील गावांमध्ये वितरित करण्याचा उद्देश होता. हा ट्रक शनिवारी अडवल्यानंतर पोलिसांना पाहताच चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले, असे वरिष्ठ पोलिस अधीक्षक वाय. पी. सिंह यांनी सांगितले.

अंबिकापूर येथे नोंदणीकृत असलेला एक पांढरा ट्रक अंबागड चौकी, मोहला, मानपूर आणि औंधी या भागांतून महाराष्ट्र सीमेच्या दिशेने मोठ्या प्रमाणात अवैध मद्य घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर उपविभागीय न्यायदंडाधिकारी कार्यालयाजवळ एक फिरती चौकी स्थापन करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी हा संशयास्पद ट्रक थांबवून तपासणी केली. हा माल मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील मुलताई भागातून भरण्यात आला होता आणि तो महाराष्ट्राच्या सीमेकडे नेला जात होता, असे चौकशीदरम्यान ट्रक चालक बलरामसिंग डांगीने सांगितले. (वृत्तसंस्था)

# 'प्रोजेक्ट एक्स'मध्ये दारू-गांजा अन् धांगडधिंगा!

- तुळापुरातील पार्टीवर छापा; १५६ ताब्यात
- पुणे पोलिसांकडून ७८ जणांवर गुन्हा दाखल

**◆ पुणे, ७ जून**

पुण्याजवळील तुळापूर येथील एका बड्या फार्म हाऊसवर 'हाऊस पार्टी' आयोजित केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या पार्टीला 'प्रोजेक्ट एक्स' असे नाव देऊन तेथे हुक्का, दारू आणि गांजाचा पुरवठा केल्याचे समोर आले आहे. मध्यरात्री पोलिसांच्या दोनशे जणांच्या फौजफाट्याच्या छाप्यानंतर खळबळ उडाली. याप्रकरणी पोलिसांनी आयोजक, फार्महाऊस मालक, दारू सर्व्ह करणारे यांच्यासह एकूण ७८ जणांवर गुन्हा नोंदवला आहे. याठिकाणी १०७ तरुण आणि ४९ तरुणी उपस्थित होत्या. त्यात ३ मुली २१ वर्षांखालील होत्या.

याप्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात आयोजक यश चौधरी, ऐमन शेख, सैफ सय्यद, सिद्धांत धुवाडी, दिशांत धुवाडी, अली पानसरे व आवेश अन्सारी यांच्यावर तर, फार्महाऊस मालक नरेंद्र चुघ तसेच बाऊन्सर, दारू सर्व्ह करणारे, लाइटिंग आणि डीजे अशा एकूण ७८ जणांवर पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. यातील काहींची वैद्यकीय चाचणी करून नोटीस देऊन सोडण्यात आले, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

नरेंद्र चुघ यांच्या फार्महाऊसवर यश चौधरी, धुवाडी बंधू, अली, आवेश तसेच ऐमन, सैफ व इतरांनी 'प्रोजेक्ट एक्स' नावाने शनिवारी रात्री हाऊस पार्टीचे आयोजन केले होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून पार्टीचे आमंत्रण देण्यात आले. पार्टीसाठी घेतलेली मद्य परवानगी शनिवारी रात्री साडेअकरापर्यंतचीच होती.

दरम्यान, पोलिसांना हाऊस पार्टीमध्ये ड्रग्जचा वापर होणार असल्याची 'टीप' मिळाल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांसह तब्बल २०० जणांच्या फौजफाट्याने मध्यरात्री दोनच्या सुमारास छापा टाकला. पोलिसांनी आयोजकांसह इतरांना ताब्यात घेत कारवाई सुरू केली. (वृत्तसंस्था)



### पार्टीचे लोकेशन पाच तासांपूर्वी 'ओपन'

**हाऊस पार्टीचे आयोजन करणाऱ्यांनी इन्स्टाग्रामसह इतर सोशल मीडियावर माहिती दिली होती. मात्र, पार्टी नेमकी कुठे होणार हे सुरुवातीला 'ओपन' केले नव्हते. शनिवारी पार्टीच्या पाच तासांपूर्वी लोकेशन सोशल मीडियावर टाकण्यात आले. या पार्टीमध्ये महाविद्यालयीन तरुण आणि आयटी क्षेत्रातील तरुण-तरुणींचा स्वत:हून सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

## महत्त्वाचे



### राज्यात १५ जूननंतरच बरसणार सरी

**मुंबई** : मान्सून तळकोकणात दाखल झाला असला तरी संपूर्ण राज्यात १५ जून नंतरच बरसणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. १५ जूनपर्यंत राज्यात पावसाचा जोर कमी राहील, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आली. मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या या अंदाजानुसारच शेतीची कामे करायला हवीत. कारण, १५ जूनपर्यंत पेरणीसाठीचा पाऊस पडणार नसल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाने दिली तसेच शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये, असे आवाहनही करण्यात आले. सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### दिल्लीत आज इंडिया आघाडीचे मंथन

**नवी दिल्ली** : इंडिया आघाडीचे घटक असलेले देशातील २३ विरोधी पक्ष सोमवारी दिल्लीत एका मोठ्या बैठकीत सहभागी होणार आहेत. २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला टक्कर देण्यासाठी या बैठकीत मंथन केले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अलिकडेच झालेल्या काही राज्यांतील विधानसभा निवडणुकांत विरोधकांचा धुव्वा उडाला. यानंतर इंडिया आघाडीत धुसफूस सुरू झाली आहे. यावर तोडगा काढून पुढील रणनीती ठरवण्यासाठी ही बैठक होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. अलिकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालामुळे विरोधक हादरले आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्यासारख्या दिग्गज नेत्याची धुळधाण झाली. तृणमूल काँग्रेस इंडिया आघाडीचा मोठा आधार मानला जातो. केवळ इतकेच नव्हे, तर तामिळनाडूत द्रमुकचाही पराभव झाला. या पराभवांमुळे आघाडी कमकुवत होऊन भाजपाची शक्ती वाढली आहे.




### वाखरी येथे कोयत्याने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर** - वाखरी ता. पंढरपूर येथे पाईप आणि कोयत्याने केलेल्या मारहाणीत उमेश पांढरे (वय २१) हा तरुण जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात वडिलांनी दाखल केले. धनाजी संधिपान पांढरे आणि उमेश तुकाराम पांढरे या दोघांनी मिळून त्याला अज्ञात कारणावरून मारहाण केली .

# इराणच्या मालमत्तांचा भरपाईसाठी वापर

## डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय, जप्त मालमत्ता विकणार

**◆ वाशिंग्टन, ७ जून**

आखाती देशांमधील युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी अमेरिकेने आता जप्त केलेल्या इराणी मालमत्ता वापरण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेसह युरोप आणि मध्यपूर्वेतील इराणी मालमत्ता ताब्यात घेऊन त्यांची विक्री केली जाईल आणि त्यातून आलेल्या पैशातून युद्धाचा खर्च, तसेच आखाती देशांना झालेल्या नुकसानीची भरपाई दिली जाणार असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

अमेरिकेसह इतर राष्ट्रांतील इराणची मालमत्ता, पैसा आणि इतर



सामग्री ताब्यात घेतील जाणार आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने निर्बंधांखाली जप्त केलेली इराणी मालमत्ता वापरण्याची तयारी सुरू केली आहे. हा पैसा आखाती देशांमधील युद्ध आणि हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी वापरला जाईल. ट्रम्प यांनी शनिवारी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणच्या मालमत्तांचा वापर युद्धाचा खर्च करण्यासाठी आणि नुकसान भरपाईसाठी केला जाईल. संघर्षात आखाती देशांना झालेल्या नुकसानीची भरपाई केली जाईल. इराणची जप्त केलेली मालमत्ता आखाती मित्र देशांना वितरित करण्याची योजना लवकरच जाहीर केली जाणार आहे. इराणने आखाती देशांमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ले केले.

**मध्यपूर्वेत संघर्ष चिघळण्याची शक्यता**

ट्रम्प यांच्या योजनेमुळे मध्यपूर्वेत संघर्ष चिघळण्याची शक्यता बळावली आहे. इराणने आपल्या जप्त केलेल्या मालमत्तेचा उल्लेख करारातील एक प्रमुख मुद्दा म्हणून केला आहे. अमेरिकेने त्यांच्या मालमत्ताचा वापर केल्यास इराण अधिक आक्रमक होऊ शकतो. इराणची गोठवलेली मालमत्ता पुनर्बांधणी आणि दुरुस्तीसाठीच नव्हे, तर पूर्वी झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठीही वापरली जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### ...तर शांतता करार होणार नाही : मोहसेन रझाई



**इराण आणि अमेरिका यांच्यातील करारासाठी सुरू असलेल्या वाटाघाटींमध्ये सुमारे २४ अब्ज डॉलर्सच्या गोठवलेल्या मालमत्तेचा प्रमुख मुद्दा आहे. जोपर्यंत अमेरिका इराणची मालमत्ता मुक्त करत नाही, तोपर्यंत कोणताही करार होणार नाही. आमच्या मालमत्तांवर टाच आणल्यास आखाती देश आणि अमेरिकेला किंमत चुकवावी लागेल असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांचे सल्लागार मोहसेन रझाई यांनी दिला आहे.**

# मुंबई विमानतळावर पाच कोटींचे सोने जप्त

## सहा अटकेत

**◆ मुंबई, ७ जून**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) केलेल्या धडक कारवाईत पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या सोनेतस्करीचा पर्दाफाश झाला असून, अजित आचरेकर यांच्यासह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

डीआरआयला मुंबई विमानतळावरून मोठ्या प्रमाणावर सोन्याची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी ६ जून रोजी



पहाटे सुमारे २.३० वाजता विमानतळ परिसरात सापळा रचला. संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर करण्यात आलेल्या झडतीत आणि चौकशीत पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे सोने व अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात अजित आचरेकर यांच्यासह रोहित कुमार सिंग, संतोष सुभाष, समीमुल्ला शहा, हमीद लेबेरीफखान आणि फलिल मोहम्मद कासिम यांना अटक करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# निदा खाननेच पीडितेला दिले नमाजचे प्रशिक्षण




## तपास यंत्रणांसमोर कबुली

**◆ नाशिक, ७ जून**

नाशिक येथील नामांकित टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ आणि सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न केल्याचे प्रकरण सध्या राज्यभरात गाजत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानने पोलिस कोठडीतील चौकशीदरम्यान ही धक्कादायक कबुली दिली आहे.

होय, मीच पीडितेला घरी नेऊन नमाज पठनाचे रीतसर प्रशिक्षण दिले, असे तिने पोलिसांना सांगितले. या धक्कादायक कबुलीमुळे या प्रकरणाची व्याप्ती किती खोलवर आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. टीसीएस कार्यालयाच्या सातव्या मजल्यावरील कॅफे हा या संपूर्ण कटाचा मुख्य अड्डा होता. इथेच बसून दानिश, निदा खान आणि तौसीफ अत्तार पीडित महिलेचे ब्रेनवॉश करणे आणि तिच्या धर्मांतराचा संपूर्ण कट रचत असत. निदा खान स्वतः पोलिस पथकाला आपल्या घरी घेऊन गेली आणि पीडितेला बोलावून नमाज शिकवला जायचा ती खोली आणि कोपरा दाखवला.

मूल होत नसल्याने तुला अजमेरच्या एका मौलवीचा मोबाईल नंबर देतो. तिथे जाऊन आल्यावर निश्चित तुला मूल होईल, असे तौसिफ अत्तारने तिला म्हटले होते. पोलिस आता या अजमेर आणि त्या मौलवीच्या संबंधांचा सखोल तपास करीत आहेत. पीडितेच्या मोबाईलमध्ये अनेक विशिष्ट युट्यूब लिंक्स आणि मुस्लिम धर्माशी संबंधित आढळलेले चार ॲप्स पीडितेच्या फोनमध्ये जबरदस्तीने इन्स्टॉल करण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

### रमजानमध्ये रोजे ठेवण्यासाठी सक्ती

**२०२५ च्या रमजान महिन्यात पीडितेवर केवळ मानसिक दबावच नव्हे, तर तिला जबरदस्तीने इस्लामिक नियमांचे पालन करण्यास भाग पाडले गेले. मुख्य आरोपी दानिश आणि तौसिफ अत्तारने पीडितेला पूर्ण ३० दिवस रोजे ठेवण्यास भाग पाडले होते. यादरम्यान निदा खान तिला रमजान सुरू होण्याच्या तारखा सांगायची, तर दानिश तिला रोजे ठेवण्याची, तसेच सहरी आणि इफ्तारची योग्य वेळ सांगत असे.**



सुरत महानगरातील कटारगाम भागात असलेल्या नासीरनगरात शंभरपेक्षा जास्त घरे अतिक्रमणविरोधी पथकाने पाडून टाकली. मात्र, ही घरे पाडण्याचा आदेश दिला नसल्याचे स्थानिक प्रशासनाने म्हटल्याने पाडकामाबद्दल वाद निर्माण झाला आहे.

### महागाई टप्प्याटप्प्याने वाढवण्याचे सूत्र : पवार

**◆ कोल्हापूर, ७ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित ठेवत असल्याचे सांगितले होते. पण नियंत्रित याचा अर्थ पाहता टप्प्या टप्प्याने धक्का द्यायचा हे त्यांचे सूत्र आहे. त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी चुकवावी लागेल अशा शब्दात खासदार शरद पवार यांनी केंद्रावर निशाणा साधला.

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर आणि पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीवरून टीका करताना पवार म्हणाले, घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात सरकारने थेट २९ रुपयांची वाढ झाली आहे. (वृत्तसंस्था)

# इस्रायलमध्ये उभारणार शिवरायांचा पुतळा

## भारतातील वाणिज्य दूतावास यानिव रेवाच यांची माहिती

**◆ मुंबई, ७ जून**

भारत-इस्रायल मैत्रीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आणि स्मारक इस्रायलमध्ये उभारले जाईल. दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती इस्रायलचे महावाणिज्यदूत यानिव रेवाच यांनी दिली.

भारत आणि इस्रायल यांच्यातील सांस्कृतिक आणि राजनयिक संबंधांना चालना देण्यासाठी दोन्ही देशांमधील मैत्रीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आणि स्मारक इस्रायलमध्ये उभारले जाईल. हा





उपक्रम भारत-इस्रायल संबंध अधिक दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे रेवाच यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

हा प्रकल्प केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नसून दोन्ही देशांतील लोकांना जोडणारा एक सदिच्छा प्रकल्प आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भारत आणि इस्रायल यांच्यातील मैत्री आणि प्रेरणेचे एक चिरस्थायी प्रतीक आहे. यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असता त्यांनी या प्रकल्पाला पाठिंबा देण्यास आणि आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रकारे मदत करण्यास तयार असल्याचे आश्वासन दिले आहे. (वृत्तसंस्था)

### भारताचा इतिहास प्रेरणादायी

**भारताचा इतिहास जगासाठी प्रेरणादायी आहे. दोन्ही देशांमधील संघर्ष आणि राष्ट्रउभारणीच्या गाथेत अनेक साम्य आहेत. याच भावनेतून हा सांस्कृतिक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. आम्ही शिवाजी महाराजांच्या ग्रंथाचे हिब्रू भाषेत भाषांतर करणार आहे.**

### कला, शिक्षणावर भर

**इस्रायली प्रशासनाला हा प्रकल्प केवळ एका पुतळ्यापुरता मर्यादित ठेवायचा नाही. एका प्रसिद्ध कलाकाराकडून पुतळा तयार करून तो इस्रायलमधील एका प्रमुख ठिकाणी स्थापित करण्याची योजना आहे. याशिवाय, शिवाजी महाराजांचे जीवन आणि विचार इस्रायली नागरिकांना समजावे यासाठी जीवनचरित्राचे भाषांतर केले जाईल. सांस्कृतिक प्रकल्पांमुळे दोन्ही देशांच्या लोकांमधील संबंध अधिक दृढ होतील.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### सरकारविरोधात मोठे आंदोलन उभारणार

**नवी दिल्ली :** शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमिततेविरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केल्यानंतर आता सरकारविरोधात मोठे आंदोलन उभारणार असल्याचा इशारा कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी दिला आहे. समाज माध्यमावर रविवारी केलेल्या पोस्टमध्ये दिपके यांनी म्हटले की, जंतरमंतरवरील निदर्शनांनी सरकारला झलक दाखवून दिली की, जेव्हा आपण झुरळं एकवटतो तेव्हा काय करू शकतो. अनेक जण प्रथमच आंदोलनात सहभागी झाले असून शिक्षण व्यवस्थेबाबतचा रोष त्यांनी व्यक्त केला. शांततापूर्ण चळवळीचे सरकार काहीही वाकडे करू शकत नाही. आपल्यासारख्या झुरळांना त्यांच्याकडून कधीही घाबरण्याची गरज नाही. पण हे प्रकरण इथेच संपत नाही. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी एका संपूर्ण पिढीवर अन्याय केला आहे. जर त्यांना पदावरून हटवले नाही किंवा त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला नाही, तर आम्हाला आमचा लढा प्रत्यक्ष रस्त्यावर सुरू ठेवावा लागेल.

**अभिजित दिपकेंचा इशारा**

### तृणमूल नगरसेवकावर अंड्यांचा मारा

**कोलकाता :** खंडणीसारख्या गंभीर आरोपाखाली अटक करण्यात आलेला तृणमूल काँग्रेसचा नगरसेवक बाप्पादित्य दासगुप्ताच्या विरोधात येथील नागरिकांनी संताप व्यक्त करीत पाटुली पोलिस ठाण्याबाहेर त्याच्यावर अंड्यांचा मारा केला. कडक सुरक्षा व्यवस्थेत पोलिस दासगुप्ताला अलिपूर न्यायालयात नेत असताना, निदर्शकांनी त्याच्या दिशेने अंडी भिरकावली. तो कोलकाता महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १०१ चा नगरसेवक आहे.

त्याला शनिवारी सौरव घोषसोबत या प्रकरणात अटक करण्यात आली. या दोघांवरही भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात खंडणी, गुन्हेगारी स्वरूपाचा अनधिकृत प्रवेश, गुन्हेगारी स्वरूपाची धमकी, जाळपोळीचा प्रयत्न आणि इतर गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे, अशी माहिती कोलकाता पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. स्थानिक वकील परिमिता डे यांनी दाखल केलेल्या तक्रारीतून हे प्रकरण उद्भवले आहे. कायदेशीर कामकाजासाठी निवासस्थानी चेंबर सुरू करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी दासगुप्ताने २० लाख रुपयांची मागणी केली, असा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे.

पातुली पोलिस ठाण्याबाहेर निदर्शकांनी नगरसेवकाच्या विरोधात चोर-चोर अशा घोषणा देत त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. निमलष्करी दलातील जवानांच्या मदतीने त्याला पोलिस ठाण्यातून न्यायालयात नेत असताना परिस्थिती तणावपूर्ण बनली होती.

# गुटखा माफियांवर सर्जिकल स्ट्राईक

## अवघ्या पाच दिवसांत १९२ गुन्हेगारांच्या आवळल्या मुसक्या



◆ **मुंबई, ७ जून**

आरोग्याशी खेळणाऱ्या गुटखा आणि पानमसाला माफियांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अत्यंत आक्रमक आणि धडाकेबाज पवित्रा घेतला आहे. केवळ पाच दिवसांच्या विशेष मोहिमेत प्रशासनाने राज्यभरात धडक कारवाया करत दोन कोटी रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त केला असून, तब्बल १९२ जणांना अटक केली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईने गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत.

१ जून ते ५ जून २०२६ या कालावधीत राज्यभर राबविलेल्या या विशेष मोहिमेत प्रशासनाने १९५ ठिकाणी अचानक धाडी टाकल्या. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याची एकूण किंमत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपये इतकी आहे. धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथील कारवाईत १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपयांचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसचे समृद्धी महामार्गावरील सावंगी टोल नाक्यावर ६० लाख ५० हजार रुपयांचा माल आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे वाहन जप्त करण्यात आले.धुळे जिल्ह्यातील सोनगीर परिसरात २३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा पकडण्यात आला.नांदेड जिल्ह्यातील धाडी टाकत महाराष्ट्र-तेलंगणा सीमा भागात १७ लाख ५२ हजार ४५० रुपयांचा माल आणि वाहनावर कारवाई करण्यात आली. पुणे विभागातील पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात ६ लाख १९ हजार ९८२ रुपयांचा साठा जप्त करून चिखली पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### शून्य सहनशीलता धोरण

नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही घटकाची गय केली जाणार नाही, असे स्पष्ट करत प्रशासनाने आता शून्य सहनशीलता (झीरो टॉलरन्स) धोरण स्वीकारले आहे. भारतीय न्याय संहिता आणि अन्न सुरक्षा मानके कायद्याच्या अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आल्यामुळे, दोषींवर आता कठोर कायदेशीर कारवाईचा फास आवळला जाणार आहे. भविष्यात या कारवाया अधिक तीव्रतेने आणि व्यापक स्तरावर सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.



सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे रविवारी पाटणा विमानतळावर आगमन झाले. बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी त्यांचे स्वागत केले

# मुंबई, ठाणे, पालघरमध्ये एफडीएची धडक कारवाई

## २ कोटी १७ लाखांचे बनावट वैद्यकीय साहित्य जप्त!

◆ **मुंबई, ७ जून**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) केलेल्या एका मोठ्या कारवाईत मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरात तब्बल २ कोटी १७ लाख रुपये किमतीचे औषध आणि वैद्यकीय साहित्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १ कोटी ३५ लाख रुपये किमतीचे सर्जिकल ग्लोव्हज आणि ८१ लाख रुपयांच्या औषधांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या बनावट साहित्याचा पुरवठा चक्क शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांना झाल्याचे समोर आल्याने आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार करण्यात आलेल्या या तपासणी मोहिमेत अनेक गंभीर बाबी उघडकीस आल्या आहेत. मे. साची मेडिक (साकीनाका) या आस्थापनेने मलेशियातून विना-निर्जंतुकीकरण केलेले सर्जिकल ग्लोव्हज आयात करून ते कोणत्याही परवान्याशिवाय विकल्याचे स्पष्ट झाले आहे. या ग्लोव्हजवर वाडा आणि भिवंडी येथील काही आस्थापनांमध्ये पुन्हा पॅकिंग आणि लेबलिंग करून ते निर्जंतुक असल्याचा बनाव करून शासकीय रुग्णालयांना पुरवण्यात आले होते. साची मेडिकल (साकीनाका) येथून ७४.८५ हजार रुपये किमतीचे विना-निर्जंतुकीकरण ग्लोव्हज जप्त केले तर मे. साची मेडिक (भिवंडी)येथून 'वैद्यकीय उपकरणे नियम २०१७' चा भंग केल्याप्रकरणी ९.८८ लाख रुपयांचा साठा प्रतिबंधित करून उत्पादन बंद करण्याचे आदेश. मेडिअर्थ लाईफकेअर (वाडा, पालघर) येथे धाड टाकत १.२६ कोटी किमतीचा बँडेज, रोल बँडेज व कॉटन साठा प्रतिबंधित केला. तसेच ६.१७ लाख रुपयांचे अनधिकृत ॲलोपॅथिक औषध साठा जप्त करण्यात आला. *(तभा वृत्तसेवा)*

### रुग्णहितासाठीचे आवाहन

रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या प्रकारामुळे प्रशासनाने सर्व डॉक्टर्स आणि रुग्णालयांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही वैद्यकीय उपकरणे किंवा औषधे खरेदी करताना ती केवळ परवानाधारक आणि अधिकृत पुरवठादाराकडूनच घ्यावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मदत शिबिरांमध्ये ७३१ लोकांचा मृत्यू

## मणिपूर हिंसाचार प्रकरणात सरकारची माहिती, ४३ हजार नागरिक अजूनही बेघर

◆ **इम्फाळ, ७ जून**

मे २०२३ मध्ये मणिपूरमध्ये वांशिक हिंसाचार सुरू झाल्यापासून मदत शिबिरे आणि पूर्वनिर्मित निवाऱ्यांमध्ये ७०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर अजूनही ४३ हजार नागरिक बेघर असल्याची माहिती माहितीच्या अधिकाराअंतर्गत (आरटीआय) राज्याच्या गृह विभागाने दिली आहे.

मणिपूर माहिती आयोगाच्या निर्देशानुसार, आरटीआय कार्यकर्ते आणि राजकीय विश्लेषक हरेश्वर गोस्वामी यांनी सादर केलेल्या अर्जावर गृह विभागाने विविध जिल्हा प्रशासनांकडून गोळा केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, नऊ जिल्ह्यांमधील मदत शिबिरे आणि तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये किमान ७३१ विस्थापित लोकांचा मृत्यू झाला आहे. चुराचंदपूर जिल्ह्यात सर्वाधिक २४८ मृत्यूंची नोंद झाली आहे. यानंतर, बिष्णुपूरमध्ये १५१, कांगपोकपीमध्ये १२८, पश्चिम इम्फाळमध्ये ९४, काकचिंगमध्ये ६० आणि पूर्व इम्फाळमध्ये २५ मृत्यूंची नोंद झाली. दरम्यान, जिरीबाममध्ये १३, थौबलमध्ये ११ आणि तेंगनौपालमध्ये एकाचा मृत्यू झाला. संघर्ष सुरू होऊन तीन वर्षे उलटली तरी परिस्थिती सामान्य झालेली नाही. राज्यभरातील ४३,००० हून अधिक लोक अजूनही मदत शिबिरे आणि पूर्वनिर्मित घरांमध्ये राहत आहेत. *(वृत्तसंस्था)*



### मृत्यूंची कारणे काय?

मदत शिबिरे आणि वस्त्यांमध्ये किमान २५ अनैसर्गिक मृत्यूंची नोंद झाली आहे. चुराचंदपूरमध्ये सहा अनैसर्गिक मृत्यू झाले, ज्यात बुडून चार, विजेचा धक्का लागून एक आणि लैंगिक अत्याचाराचा एक मृत्यू यांचा समावेश आहे. या घटनांनंतर शिबिरांमध्ये समुपदेशन आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मदत शिबिरांमध्ये राहणारी कुटुंबीय विस्थापनासोबतच गंभीर आरोग्य समस्यांचा सामना करत आहेत. पूर्व इम्फाळ जिल्ह्यातील शिबिरांमधील २१७ लोक गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत.

# लाचखोर अभियंत्याकडे सापडले घबाड

### दोन कोटी रोकड, पाच इमारती, १३ प्लॉट्स जप्त

◆ **भुननेश्वर, ७ जून**

ओडिशाच्या कंधमाल जिल्ह्यातील बालीगुडा येथील आदिवासी विकास विभागातील सहायक अभियंत्याच्या घरावर दक्षता विभागाच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात दोन कोटी रोख, लाखोंचे सोन्याचे दागिने, पाच इमारती आणि १३ प्लाट्स अशी एकूण शंभर कोटींपेक्षा अधिकची मालमत्ता आढळून आली. बैकुंठ नाथ बेहरा, असे लाचखोर अभियंत्याचे नाव आहे.



लाचखोरीच्या तपासाचा भाग म्हणून दक्षता विभागाच्या पथकाने भुवनेश्वर, बारीपदा, धर्मशाला आणि बालीगुडा येथे शनिवारी एकाचवेळी अभियंत्याच्या निवासस्थानावर छापा टाकला. अभियंता आणि त्याच्या कुटुंबीयांच्या नावावर असलेल्या मालमत्तांची यादी पाहून अधिकारी चक्रावले. बेहरा यांच्याविरुद्ध उत्पन्नाच्या स्रोतापेक्षा अधिक संपत्ती बाळगल्याचे आरोप होते. बँकेतील लॉकरमधील रोकड मोजण्यासाठी मशीन मागवावे लागले. हे दोन्ही लॉकर्स इंजिनिअर बेहरा यांच्या पत्नीच्या नावावर होते. *(वृत्तसंस्था)*

### सहा हजारापासून नोकरीची सुरुवात

महत्वाचे म्हणजे, ५२ वर्षीय बैकुंठ नाथ बेहरा १९९९ मध्ये अवघ्या सहा हजार रुपये पगारावर कनिष्ठ अभियंता पदावर सरकारी सेवेत रुजू झाले होते. २०१६ मध्ये सहायक अभियंता आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांना कार्यकारी सहायक अभियंता पदावर बढती मिळाली होती. तपासात,त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या नावावर पाच इमारती आढळून आल्या. यात भुवनेश्वरमधील चार आलिशान इमारतींचा समावेश आहे.

# पती बेरोजगार असला तरी द्यावीच लागेल पोटगी

### दिल्ली न्यायालयाचा आदेश

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

बेरोजगार असल्याचा दावा करून कोणताही पती आपली पत्नी आणि अल्पवयीन मुलाप्रती असलेली कायदेशीर व नैतिक जबाबदारी टाळू शकत नाही, त्याला पोटगी द्यावीच लागेल असा निर्णय दिल्लीतील न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणात पतीला दरमहा सहा हजार रुपये पोटगी देण्याचा आदेश दिला.

एका महिलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत पतीने बेरोजगारीचे कारण देत आर्थिक मदत नाकारली होती. याप्रकरणी महिलेने न्यायालयात अर्ज दाखल केला,

यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश शीतल चौधरी प्रधान यांनी सुनावणी करताना म्हटले की, पतीने स्वतःच्या खर्चाचे नियोजन कसे करावे हा त्याचा प्रश्न आहे. तो बेरोजगार आहे किंवा त्याच्यावर इतर जबाबदाऱ्या आहेत, असे कारण देऊन तो आपल्या पत्नी आणि मुलाच्या पालनपोषणाच्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. २०१५ पासून पतीने मुलाला कोणतीही आर्थिक मदत केली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.'मुलाच्या संगोपनासाठी पती तितकाच जबाबदार आहे. पत्नी सुशिक्षित असल्याने ती मदतीस पात्र नाही हा पतीचा युक्तिवादही न्यायालयाने फेटाळून लावला. *(वृत्तसंस्था)*

### काय आहे प्रकरण?

पीडित महिलेने आरोप केला होता की, फेब्रुवारी २०१३ मध्ये विवाह झाल्यानंतर पती आणि त्याच्या कुटुंबीयांकडून तिला हुंड्यासाठी छळ, शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला.

गर्भवती असताना तिला सासरच्या मंडळींनी घराबाहेर काढले होते. त्यामुळे २०१५ पासून ती मुलासह वेगळी राहात आहे. महिलेने कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये केलेली तक्रार ट्रायल कोर्टाने सप्टेंबर २०२५ मध्ये फेटाळली होती.




### पद्मभूषण विनोद राय यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**माजी नियंत्रक** आणि महालेखापरीक्षक (सीएजी) पद्मभूषण विनोद राय यांच्या 'व्हेन ऑडिट मॅटर्स...' या मालगाडीसारख्या लांबलचक नावाच्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच उपराष्ट्रपती एन्क्लेव्हमध्ये उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. विनोद राय हे देशातील चर्चित नावआहे. २०१४ च्या आधी काँग्रेस सरकाविरुध्द भ्रष्टाचाराच्या मुद्यावरुन वातावरण तापवण्यात विनोद राव यांचे मोठे योगदान आहे. टुजी स्पेक्ट्रम, कोळसा घोटाळा आणि राष्ट्रकुल क्रीडा घोटाळा आदी मुद्यावरुन त्यांनी तत्कालिन सरकारविरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप आपल्या लेखा परीक्षणातून केले, कारण तेव्हा ते देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणजे सीएजी होते. यामुळे देशभर विनोद राय चर्चेत आले. पंतप्रधान कार्यालयातील तत्कालिन राज्यमंत्री नारायणसामी यांनी विनोद राय यांच्यावर जाहीरपणे टिका केली. सरकारी पातळीवर होणाऱ्या भ्रष्टाचारावर टिकाटिपणी करण्याचा राय यांना अधिकार नसल्याचा आरोप केला. पण हा आरोप तेवढ्याच जाहीरपणे विनोद राय यांनी खोडून काढला. सरकारच्या कामकाजात प्रत्यक्ष हस्तक्षेप न करताही आर्थिक व्यवहारातील अनियमिततांकडे लक्ष वेधणे ही सीएजीची नैतिक आणि मुलभूत जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले होते. यातून संविधानाने दिलेल्या त्याच्या अधिकाराचे रक्षण होईल, आणि सरकारवर नियंत्रण राहील, असे केले नाही तर तो देशातील जनतेचा विश्वासघात ठरेल, असेही राय यांनी म्हटले होते.

देशात मुख्य निवडणूक आयुक्त हे पद आहे, आणि तो काय काम करु शकतो, हे देशातील जनतेला टी.एन. शेषन मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यावरच समजले होते. तसेच देशात नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (सीएजी) हे पद आहे, आणि या पदावरील व्यक्तीने मनात आणले म्हणजे प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावले तर तो केंद्रातील सरकारला कसे सळो की पळो करु शकतो, असे विनोद राय यांनी दाखवून दिले होते.

२००८ ते २०१३ या काळात विनोद राय सीएजी होते. विशेष म्हणजे या काळात डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान होते, आणि राय यांनी मनमोहनसिंग सरकारवरच भ्रष्टाचाराचे आरोप करत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. ऑडिट म्हणजे लेखापरीक्षण या विषयावर विनोद राय यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि संपादितही केली. देशातल्या घोटाळ्यावर २०१४ मध्ये त्यांनी लिहिलेले पुस्तक चांगलेच गाजले होते. 'नॉट जस्ट ॲन अकाऊंटंट: द डायरी ऑफ द नेशन कॉनसायन्स कीपर' हे ते पुस्तक होते. मोदी सरकारने त्यांना २०१६ मध्ये पद्मभूषणने सन्मानित केले होते.

●● ●●

### रामभक्त म्हणून आम्ही केले स्वागत

दिल्लीत परदेशी नेत्यांची शिष्टमंडळ नेहमीच येत असतात. दर आठवड्यात कोणत्या न कोणत्या देशाचे राष्ट्रपती आणि पंतप्रधान दिल्लीत येत असतात. दिल्लीत येणाऱ्या विविध देशाच्या परराष्ट्रमंत्र्यांची तर गणतीच करता येत नाही. कधी दुसऱ्या देशाचे परराष्ट्रमंत्री आपल्याकडे येतात, तर कधी आपले परराष्ट्रमंत्री दुसऱ्या देशात जातात. हे सगळे सांगण्याचे कारण म्हणजे मागील आठवड्यात नेपाळमधील सत्तारुढ पक्षाचे अध्यक्ष रबी लामिछाने भारताच्या दौऱ्यावर आले होते. सामान्यपणे दोन देशातील संबंध दृढ करण्यासाठी सरकारी पातळीवर नेहमीच प्रयत्न सुरु असतात, पण पक्षीय पातळीवरही असे प्रयत्न केले जातात.

एका देशातील सत्तारुढ पक्षाचे अध्यक्ष दुसऱ्या देशातील सत्तारुढ पक्षाच्या निमंत्रणावरुन त्या देशाला भेट देत असतात. हा प्रकार नियमितपणे सुरु असतो. रबी लामिछाने यांचा हा दौरा तसा शासकीय म्हणता येणार नसला तरी अधिकृत होता. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या निमंत्रणावरुन नेपाळचे शिष्टमंडळ भारतात आले. भाजपा मुख्यालयात त्यांचे दणदणीत स्वागत करण्यात आले. लामछाने यांनी नितीन नवीन यांची भेट घेतली. भाजपा मुख्यालयात भाजपा महासचिव अरुणसिंह, भाजपा विदेश विभागाचे प्रमुख डॉ. विजय चौथाईवाले यांनी त्यांचे स्वागत केले. या शिष्टमंडळाच्या स्वागतासाठी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा आणि मनोज तिवारी, बांसुरी स्वराज, रामवीरसिंह विधुरी आणि प्रवीण खंडेलवाल आदी दिल्लीतील भाजपाचे खासदार उपस्थित होते. सीतेच्या देशातील प्रतिनिधीमंडळ भाजपा मुख्यालयात येत असल्यामुळे रामाचे भक्त म्हणून आम्ही त्यांच्या स्वागतासाठी उभे असल्याचे या भाजपा नेत्यांनी काही पत्रकारांनी विचारले असता म्हटले.

●● ●●

### पुन्हा मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा

भाजपाने राज्यसभेच्या ११ उमेदवारांची यादी जाहीर केली. पण या यादीत अपेक्षित असलेल्या दोन राज्यमंत्र्यांची नावे नाहीत. जॉर्ज कुरियन आणि रवनीतसिंग बिट्टू या दोन राज्यमंत्र्यांचा राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपत आला आहे. पण या दोघांचाही भाजपाने राज्यसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत समावेश नाही. त्यामुळे या दोघांना मंत्रिमंडळातून वगळले जाणार, हे निश्चित आहे. रवनीतसंग बिट्टू हे तसे पंजाबचे आहेत, पुढीलवर्षी पंजाब विधानसभेची निवडणूक होणार आहे, त्यामुळे भाजपा बिट्टू यांचा उपयोग पंजाब विधानसभा निवडणुकीत करेल, असा अंदाज आहे. जॉर्ज कुरियन हे केरळचे आहेत, केरळमध्ये विधानसभा निवडणूक नुकतीच आटोपली आहे. मात्र काहीही असले तरी कुरियन आणि बिट्टू यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून वगळले जाईल वा त्यांना राजीनामा द्यावा लागेल. याआधी केंद्रीय मंत्रिमंडळातील पंकज चौधरी आणि हर्ष मल्होत्रा यांची प्रदेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. पंकज चौधरी यांच्याकडे उत्तरप्रदेशची तर हर्ष मल्होत्रा यांच्याकडे दिल्ली प्रदेश भाजपाची जबाबदारी सोपवण्यात आली. तर आता दोन राजमंत्र्यांना राज्यसभेत घेण्यात आले नाही, त्यामुळे मंत्रिमंडळातील ४ जागा रिकाम्या होणार आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा पुन्हा सुरु होणे स्वाभाविक म्हणावे लागेल. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार, याकडे आता सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

● **दिल्लीवाला**

### अस्थी विसर्जनासाठी जाताना काळाचा घाला

**फिरोजपूर :** पंजाबमधील फिरोजपूर-फाजिल्का रस्त्यावरील जंगा वाला वळणाजवळ पिक-अप वाहन आणि ट्रकची समोरासमोर जोरदार धडक होऊन ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. पिक-अप वाहनातून प्रवास करणारे नागरिक नातेवाइकाच्या अस्थी विसर्जनासाठी अमृतसरमधील बियास नदीकडे जात असताना हा अपघात झाला.

# चुकत असेल तर मंत्र्यालाही ठोका

### बच्चू कडू यांचा शिवसैनिकांना सल्ला

◆ **गोंदिया, ७ जून**

सत्तेत आहोत म्हणून स्वस्त बसून राहू नका, मस्त होऊ नका. सत्तेत आहोत म्हणून काही करताच येत नाही, असे वाटत असेल आणि मंत्री आपला असला व चुकत असेल तर त्याला ठोकल्याशिवाय राहू नका, असा रोखठोक सल्ला विधान परिषदचे आमदार बच्चू कडू यांनी गोंदियाच्या देवरी येथे ७ जून रोजी आयोजित शिवसेना कार्यकर्ता मेळाव्यात शिवसैनिकांना दिला.

आपल्या तडाखेबंद अध्यक्षीय भाषणात कर्जमाफी आणि दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांवरून सरकारवर कडक शब्दांत प्रहार करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, माझ्यासाठी अनेक पक्षांमध्ये जाण्याच्या वाटा मोकळ्या होत्या. मात्र, मी एकनाथ शिंदेंकडे जाण्याचा पर्याय निवडला. कारण, ते एकमेव मर्द आहेत. रात्री दोन वाजता मुख्यमंत्री असताना एखाद्या सामान्य शेतकऱ्याला भेटणे, हेच तर एकनाथ शिंदे यांची ओळख आहे. देवरी येथील आफताब मंगल लॉन येथे शिवसेना शिंदे गटाचा कार्यकर्ता मेळावा आणि जाहीर पक्षप्रवेश सोहळा रविवारी पार पडला. माजी आमदार सहषराम कोरोटे यांच्या मार्गदर्शनात आयोजित या मेळाव्याला हजारो शिवसैनिकांनी गर्दी केली होती. याप्रसंगी इतर पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी मंचावर राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी मंत्री दीपक सावंत, विधान परिषद सदस्य मनीषा कायंदे, माजी आमदार मनोहर चंदिकापुरे, जिल्हाप्रमुख सुरेंद नायडू, रूपेश कुथे आदी मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या सिंचन, वीज आणि पिकांचे दर आदी समस्या प्राधान्याने सोडविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी, मेळाव्याला उपस्थित नेत्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून संघटन बळकटीकरण, आगामी निवडणुकांची तयारी आणि जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याचे आवाहन केले. *(तभा वृत्तसेवा)*



कार्यकर्त्यांना संबोधित करताना बच्चू कडू

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







वाढती महागाई आणि घरगुती स्वयंपाकाच्या गॅसचे दर वाढल्याच्या निषेधार्थ रविवारी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कानपूर येथे आंदोलन केले

# भारतासोबतचा वाद खुल्या मनाने सोडवण्याची इच्छा

### नेपाळच्या परराष्ट्र मंत्र्यांची नरमाईची भूमिका



◆ **नवी दिल्ली, ७ जून**

दोन्ही बाजूंनी मनमोकळेपणाने चर्चा झाल्यास कोणतीही समस्या फार मोठी नसते. त्यामुळे भारतासोबतचा सीमावाद मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवण्याची नेपाळची इच्छा आहे, अशी नरमाईची भूमिका नेपाळचे परराष्ट्रमंत्री शिशिर खनाल यांनी रविवारी घेतली.

नेपाळमधील नवीन सरकार भारताकडे एकविसाव्या शतकातील नकारात्मक भूराजकारण आणि अतिसंवेदनशील दृष्टिकोनातून पाहत नाही. त्याऐवजी दोन्ही देशांच्या सर्वांगीण समृद्धीसाठी परस्पर फायदेशीर संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा आहे, असे खनाल यांनी सांगितले. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी सविस्तर चर्चा केल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी नेपाळच्या परराष्ट्र मंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी उपरोक्त वक्तव्य केले. द्विपक्षीय संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने खनाल यांनी शुक्रवारी तीन दिवसांच्या भारत दौऱ्याला सुरुवात केली. मात्र, दोन्ही देशांमधील सीमावादाबाबत नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी अलिकडेच केलेल्या विधानांमुळे निर्माण झालेल्या तीव्र वादामुळे या दौऱ्यावर मळभ निर्माण झाले आहे.

आपण मोकळ्या मनाने एकत्र बसतो, त्यावेळी कोणतीही समस्या खूप मोठी नसते आणि कोणतीही सीमा खूप गुंतागुंतीची नसते, असे खनाल म्हणाले. आम्ही भारताकडे खुल्या मनाने, स्पष्ट दृष्टीने आणि एकाच पारदर्शक अजेंड्यासह पाहतो, तो म्हणजे नेपाळचे आर्थिक परिवर्तन हा आहे, असे ते म्हणाले. अतिराष्ट्रवादी आव आणण्याऐवजी आम्ही समस्या सोडवण्यसाठी शांत आणि तथ्यांवर आधारित दृष्टिकोन स्वीकारत आहोत, असे खनाल म्हणाले. त्यांनी भारताच्या आर्थिक विकासाचीही स्तुती केली. तीव्र आकांक्षा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या या भारताशी आम्हाला जुळायचे आहे, तो मोबदल्यात आम्ही आकांक्षी नेपाळची ऊर्जा घेऊन येत आहोत, असे खनाल म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

#### भारताने स्वतःची ओळख निर्माण केली

**» आम्ही सीमेपलीकडे पाहतो, त्यावेळी आम्हाला एक उदयोन्मुख भारत दिसतो. असा भारत ज्याने जागतिक मंचावर स्वतःची ओळख एका गतिमान, वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान आणि आर्थिक महाशक्तीच्या रूपात मूलभूत आणि अतिशय प्रभावीपणे नव्याने निर्माण केली आहे, असे खनाल यांनी सांगितले.** ■

## दिल्लीत अग्नितांडव; सात जण बचावले

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

दिल्लीतील न्यू फ्रेंड्स कॉलनीमधील एका घरात आग लागली. आज (रविवार) दुपारी ३:४० वाजता अग्निशमन दलाला या घटनेची माहिती देण्यात आली. घटनास्थळी पाच अग्निशमन गाड्या पाठवण्यात आल्या. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घरात राहणाऱ्या कुटुंबाला वाचवण्याचे प्रयत्न सुरू केले.

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यू फ्रेंड्स कॉलनीमधील आगीतून सात जणांना वाचवण्यात आले आहे. त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अग्निशमन दलाचे बचावकार्य सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, आगीत एक कुत्रा जखमी झाला असून त्याला पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आतापर्यंत कोणतीही दुखापत झाल्याचे वृत्त नाही. घरात राहणारे कुटुंबातील इतर सदस्य सुरक्षित आहेत. न्यू फ्रेंड्स कॉलनीमधील आगीमुळे सर्वत्र घबराट पसरली आहे. तीन मजली घरात आग लागली. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी दाखल झाली आहेत. आतापर्यंत पाच मुले आणि दोन महिलांना वाचवण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# आयडीएफसी बँक घोटाळा प्रकरणात सीबीआयची छापेमारी

### चंदीगड, पंचकुला, दिल्ली-एनसीआरमध्ये कारवाई




◆ **नवी दिल्ली, ७ जून**

हरयाणा सरकार आणि चंदीगड प्रशासनाच्या विविध विभागांमधन सरकारी निधीची अफरातफर केल्याच्या कथित ६६१ कोटी रुपयांच्या फसवणूकप्रकरणी सीबीआयने चंदीगड, पंचकुला आणि दिल्ली-एनसीआरमधील सहा ठिकाणांवर छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

आयडीएफसी फर्स्ट बँक आणि एयू फायनान्स बँकेत ठेवलेल्या निधीच्या कथित गैरव्यवहार प्रकरणातील चौकशीचा भाग म्हणून हरयाणा कॅडरचे वरिष्ठ लोकसेवक आणि नोएडा येथील विपम कन्सल्टन्सी प्रा. लि. आणि तिच्या संचालकांच्या संबंधित ठिकाणांवर शुक्रवारी छापेमारी करण्यात आली, अशी माहिती सीबीआयने निवेदनात दिली.

फसवणुकीमुळे हरयाणा सरकारचे आठ विभाग आणि चंदीगड केंद्रशासित प्रदेश, चंदीगड महापालिका आणि चंदीगड रिन्युएबल एनर्जी ॲण्ड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी प्रमोशन सोसायटी या दोन विभागांवर परिणाम झाला, असे तपास यंत्रणेने सांगितले.

सरकारी कर्मचाऱ्यांनी बँक अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून खाती उघडणे, निधीचे हस्तांतरण आणि त्यानंतर तो निधी अन्यत्र वळवण्याच्या प्रक्रियेत मदत केली होती, असे पुरावे तपासादरम्यान समोर आल्याची माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

#### दस्तावेज, उपकरणे जप्त

**» छापेमारीदरम्यान गुन्हेगारी स्वरूपाचे दस्तावेज, डिजिटल उपकरणे, मालमत्तेची कागदपत्रे आणि इतर संबंधित साहित्य जप्त केले, अशी माहिती तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी दिली. हा तपास हरयाणा राज्य दक्षता आणि भ्रष्टाचारविरोधी ब्युरोकडून हस्तांतरित करण्यात आलेल्या एका प्रकरणातून आणि चंदीगड येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या दोन प्रकरणांमधून सुरू झाले आहे.** ■

# ट्रम्प सरकारची इस्रायलकडून हेरगिरी

### अमेरिकेच्या संरक्षण विभागाचा अहवाल



◆ **वॉशिंग्टन, ७ जून**

अमेरिका आणि इस्रायल यांच्यात इराणवरून मतभेद वाढत असताना अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या (पेंटागॉन) एका गुप्त अहवालाने खळबळ उडवली आहे. इस्रायल अमेरिकन अधिकारी आणि ट्रम्प सरकारच्या अंतर्गत माहिती गोळा करण्यासाठी हेरगिरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. हेरगिरीचा वापर भविष्यात अमेरिकेविरोधात केला जाऊ शकतो असा इशारा अहवालातून दिला आहे.

अमेरिकन गुप्तचर विभागाच्या माजी अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला अहवालाची माहिती देताना सांगितले की, पेंटागॉनच्या डिफेन्स इंटेलिजन्स एजन्सीने अलीकडेच इस्रायलशी संबंधित धोक्याची पातळी वाढवली आहे.

अहवालात इस्रायलने अमेरिकेच्या विविध विभागात हेरगिरी करून गोपनीय माहिती मिळवली आहे. अमेरिका आणि इस्रायलसारख्या अत्यंत जवळच्या मित्रराष्ट्रांमध्ये असा प्रकार घडणे चिंतेचा विषय आहे. अमेरिका आधीपासूनच आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या इस्रायल दौऱ्यादरम्यान विशेष खबरदारी घेतो. अमेरिकन अधिकारी या काळात आपले फोन-लॅपटॉप वापरणे टाळतात. इस्रायली गुप्तचर यंत्रणा माहिती गोळा करण्याच्या बाबतीत खूप आक्रमक मानल्या जातात. अहवालानंतर अमेरिकन अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अत्यंत असामान्य मानले जाते.

मात्र, इस्रायलने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. दरम्यान इस्रायली दूतावासाने आरोप फेटाळत म्हटले की. त्यांच्या गुप्तचर संस्था मित्रांवर नव्हे, तर शत्रूंवर लक्ष ठेवतात. अमेरिकेतील सरकारी विभागाची हेरगिरी करण्याचा आरोप निराधार आहे. ◂(वृत्तसंस्था)

#### व्हाईट हाऊसने फेटाळला अहवाल

**» व्हाइट हाऊसने हा अहवाल चुकीचा असल्याचे सांगत फेटाळून लावला आणि म्हटले की, हा अहवाल अशा लोकांनी तयार केला, ज्यांना अंतर्गत प्रक्रियांची पूर्ण माहिती नाही. हा वाद अशा वेळी निर्माण झाला आहे, जेव्हा इराण आणि लेबनॉनच्या मुद्द्यावर ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील धोरणात्मक मतभेद समोर आले.** ■

## चित्रपट वार्ता

### वय ३३, भूमिका १३ ची!




**मुंबई** : नेटफ्लिक्सवर अलीकडेच प्रदर्शित झालेली 'करवत' ही मालिका प्रेक्षकांमध्ये चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत सैफ अली खान मुख्य भूमिकेत असून, त्यांच्यासोबत युधवीर अहलावत यांच्या अभिनयाने विशेष लक्ष वेधून घेतले आहे. किशोरवयीन पात्राची प्रभावी भूमिका साकारल्यामुळे युधवीर यांच्या कामगिरीचे सोशल मीडियावर कौतुक होत आहे. मालिकेत युधवीरने साकारलेले पात्र इतके वास्तवदर्शी वाटले की अनेक प्रेक्षकांनी तो प्रत्यक्षातही किशोरवयीन असल्याचे मानले. मात्र नंतर त्यांचे खरे वय समोर आल्यानंतर प्रेक्षकांना आश्चर्याचा धक्का बसला. युधवीर अहलावत सध्या ३३ वर्षांचे असूनही त्यांनी किशोरवयीन भूमिकेत अत्यंत नैसर्गिक अभिनय सादर केले आहे. ■

### ७७ हजार कोटींची राणी कोण?



**हैदराबाद** : अभिनेता राम चरण यांच्या 'पेड्डी' या चित्रपटाची सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी सुरू असून तो १५० कोटी रुपयांहून अधिक कमाईच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले जात आहे. चित्रपटाभोवती सुरू असलेल्या चर्चांदरम्यान आता त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित एक वेगळीच माहिती सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. राम चरण यांची पत्नी उपासना कामिनेनी यांच्या संपत्ती आणि व्यावसायिक साम्राज्याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली आहे. त्या प्रसिद्ध कामिनेनी कुटुंबातील असून आरोग्यसेवा क्षेत्रातील त्यांच्या कौटुंबिक व्यवसायाचे मूल्य अंदाजे ७७,००० कोटी रुपयांपर्यंत असल्याचा दावा काही मीडिया रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे. या विस्तीर्ण व्यवसाय नेटवर्कमध्ये हजारो कर्मचारी कार्यरत असल्याचेही सांगितले जाते. दरम्यान, राम चरण आणि उपासना यांची प्रेमकथा देखील अनेकदा चर्चेत राहिली आहे. ■

### 'बिग बीं'च्या पोस्टचा गोंधळ



**मुंबई** : बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात. विविध विषयांवर विचार मांडणारे अमिताभ बच्चन यांचे एक ट्विट सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरले आहे. पहाटेच्या सुमारास त्यांनी हिऱ्याच्या किमतींबाबत केलेल्या एका पोस्टनंतर अनेक नेटकऱ्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. अमिताभ बच्चन यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पहाटे २.१२ वाजता एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी हिरे महाग असण्यामागील कारण स्पष्ट करताना, त्यांची किंमत दुर्मिळतेमुळे नसून ते शोधणे अत्यंत कठीण असल्यामुळे जास्त असल्याचे म्हटले. त्यांच्या या साध्या वाटणाऱ्या पोस्टने काही क्षणांतच सोशल मीडियावर मोठी चर्चा निर्माण केली. पोस्ट व्हायरल झाल्यानंतर अनेक युझर्सनी अमिताभ बच्चन यांना देशातील महत्त्वाच्या घडामोडींवर भाष्य न करण्याबद्दल प्रश्न विचारले. काहींनी शैक्षणिक क्षेत्रातील वादग्रस्त मुद्दे, विद्यार्थ्यांच्या समस्या आणि वाढत्या महागाईसारख्या विषयांवर त्यांनी मौन का बाळगले आहे, असा सवाल उपस्थित केला. ■

## मुलासह आईची गोळ्या झाडून हत्या

◆ **गुरुग्राम, ७ जून**

हरियाणातील गुरुग्राम येथे कौटुंबिक वादातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीशी झालेल्या वादानंतर एका व्यक्तीने स्वतःच्या पत्नीची गोळ्या झाडून हत्या केली. आईला वाचवण्यासाठी पुढे आलेल्या मुलालाही त्याने गोळी घालून ठार केले. घटनेनंतर आरोपी घरातच मृतदेहांजवळ बसून राहिल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

ही घटना गुरुग्राममधील अशोक विहार परिसरात रविवारी पहाटे घडली. घरामध्ये पती-पत्नीमध्ये काही कारणावरून जोरदार वाद झाला होता. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर संतापलेल्या पतीने बंदुकीतून पत्नीवर गोळीबार केला. आईवर हल्ला होत असल्याचे पाहून त्यांचा २५ वर्षीय मुलगा मध्ये पडला. आरोपीने त्याच्यावरही गोळी झाडली. यात दोघांचाही मृत्यू झाला. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय अभियंत्याची अमेरिकेत हत्या

◆ **वॉशिंग्टन, ७ जून**

अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथे तेलंगणाच्या २८ वर्षीय अभियंता अंशुल कुंचा याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. कुटुंबाचा आरोप आहे की अंशुलला बनावट पिझ्झा ऑर्डर देऊन एका निर्जन ठिकाणी बोलावण्यात आले आणि तिथे हल्लेखोराने त्याच्यावर बेछूट गोळीबार केला.



अंशुल एका बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी करत होता. अतिरिक्त उत्पन्नासाठी तो वीकेंडला पिझ्झा डिलिव्हरीचे पार्ट-टाइम कामही करायचा. शनिवारी रात्री त्याला एक ऑर्डर मिळाल्यानंतर तो फिलाडेल्फियाच्या एका निर्जन भागात पिझ्झा पोहोचवायला गेला. तिथे पोहोचताच एका अज्ञात हल्लेखोराने अंशुलच्या डोक्यात अनेक गोळ्या झाडल्या आणि घटनास्थळावरून पळ काढला. अंशुलने हैदराबादमधून बीटेक केल्यानंतर अमेरिकेत जाऊन मास्टर्सचे शिक्षण घेतले. त्यानंतर तो फिलाडेल्फियामधील केडब्लूसी कंपनीत काम करत होता. अंशुलची बहीण तन्वी कुंचाने आरोप केला की ही डिलिव्हरी ऑर्डर केवळ एक सापळा होता. अंशूल पोहोचला तिथे कोणताही ग्राहक उपस्थित नव्हता आणि त्याला लक्ष्य करण्यासाठी बोलावले होते. ◂(वृत्तसंस्था)

# बंगालमध्ये मदरशांचे सर्वेक्षण

### मुख्यमंत्री शुभेन्दू यांचा निर्णय; ५ जुलैपर्यंत अहवाल मागवला

◆ **कोलकाता, ७ जून**

पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील सर्व मदरशांची कायदेशीर स्थिती, पायाभूत सुविधा आणि कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एका व्यापक सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना ५ जुलैपर्यंत अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सत्तांतरानंतर शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणि प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री शभेन्दू अधिकारी यांनी सांगितले.

राज्य सरकारने मदरशांचे कामकाज, पायाभूत सुविधा आणि कायदेशीर स्थिती तपासण्यासाठी मदरशांच्या व्यापक सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. या संदर्भात अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागाने अधिसूचना जारी केली. सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना ५ जुलैपर्यंत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्व संस्था विद्यमान नियमांनुसार कार्यरत आहेत की नाही हे तपासले जाईल. याशिवाय आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनांना मदरशांचे स्थान, त्यांच्या स्थापनेचे वर्ष, नोंदणी तपशील आणि वैध कागदपत्रांची उपलब्धता यासह विविध बाबींवर माहिती गोळा करण्यास सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

#### बेकायदेशीर मालमत्तांवर बुलडोजर कारवाई

**» राज्य सचिवालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, या उपक्रमाचा उद्देश अद्ययावत डेटाबेस तयार करणे आहे, ज्यामुळे मदरसा शिक्षण क्षेत्रासाठी भविष्यातील योजना तयार करण्यास मदत होईल. तपासणीत बेकायदेशीर मालमत्ता अथवा मदरसा आढळल्यास त्यांच्यावर बुलडोजर चालवण्यात येईल. या संस्था निवासी आहेत, खाजगी अनुदानावर चालतात की स्वतंत्रपणे चालवल्या जातात, हे देखील अहवालातून स्पष्ट होणार आहे.** ■

# बेसुमार उपसा केल्याने पृथ्वी कलली

- अक्ष सरकून धरणीच्या वजनाचा समतोल बिघडला
- पातळातून पाणी काढल्याने पृथ्वी ३१.५ इंच सरकली

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

भूमिगत भागातून अतिरिक्त पाणी काढल्यामुळे पृथ्वीच्या वजनाचा समतोल बिघडला आहे. परिणामी, पृथ्वीचा अक्ष सुमारे ३१.५ इंच सरकला आहे, त्यामुळे समुद्राची पातळी वाढली आहे.

पृथ्वी स्वतःच्या अक्षावर फिरते. त्यामुळे दिवस व रात्र होतात, हे आपल्या सर्वांना माहित आहे.पण आपण पूर्णपणे स्थिर व घन मानत असलेली पृथ्वी, मानवी क्रियाकलापांमुळे अवकाशातील आपल्या जागेवरून हलली आहे.



सिंचन, कारखाने आणि पिण्याच्या पाण्यासाठी मानवाने जमिनीतून मोठ्या प्रमाणात पाणी काढल्यामुळे, पृथ्वीचा परिवलन अक्ष अंदाजे ३१.५ इंच (सुमारे ८० सेंटीमीटर) सरकला आहे. हा बदल १९९३ ते २०१० दरम्यान झाला. हे ऐकायला क्षुल्लक वाटू शकते, परंतु वैश्विक स्तरावर, संपूर्ण सूर्यमालेतील एका ग्रहाचे हे डगमगणे शास्त्रज्ञांसाठी मोठ्या चिंतेचा आणि आश्चर्याचा विषय बनले आहे. हा सनसनाटी शोध सोल नॅशनल युनिव्हर्सिटीचे भू-भौतिकशास्त्रज्ञ की-वेऑन सेओ व त्यांच्या चमूने लावला आहे. हे जिओफिजिकल रिसर्च लेटर्समध्ये प्रकाशित झाले आहे. ◂(वृत्तसंस्था)

#### किनारपट्टीचा भाग पाण्याखाली बुडतोय्

**» त्यानंतर, २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'जर्नल ऑफ जिओडेसी' आणि 'नेचर' सारख्या इतर अनेक अभ्यासकांनी देखील पुष्टी केली की, पाण्याचे हे प्रचंड विस्थापन केवळ पृथ्वीच्या गतीमध्ये बदल करत नाही, तर समुद्राची पातळी वाढवून किनारपट्टीचे भाग देखील पाण्याखाली बुडवत आहे.** ■

**२,१५० गिगाटन पाणी भूगर्भातून महासागरांपर्यंत प्रवास करते**

**» संगणकीय मॉडेल आणि उपग्रह डेटा वापरून शास्त्रज्ञांनी गणना केली आहे की, १९९३ ते २०१० या काळात मानवाने भूगर्भातील नैसर्गिक जलस्रोतांमधून अंदाजे २,१५० गिगाटन (२.१५ ट्रिलियन टन) भूजल उपसले. या प्रचंड पाण्याचा वापर प्रामुख्याने पिकांना पाणी देण्यासाठी आणि शहरांची तहान भागवण्यासाठी करण्यात आला. शेतांवर फवारलेले आणि शहरांमध्ये वापरलेले हे पाणी अखेरीस नद्या आणि नाल्यांमधून वाहत जाऊन जगातील विशाल महासागरांमध्ये जाऊन मिळाले. याचा अर्थ असा की, जे पाणी पूर्वी जमिनीच्या खोलवर साठवलेले होते, ते आता संपूर्ण पृथ्वीवर पसरून महासागरांचा भाग बनले. वजनातील या प्रचंड बदलाचा थेट परिणाम पृथ्वीच्या अक्षावर झाला.** ■

# संशयित विदेशी नागरिकांची माहिती द्या

### निवडणूक आयोगाचा राज्यस्तरीय यंत्रणेला आदेश

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

'एसआयआर' प्रक्रियेदरम्यान आढळलेल्या संशयित विदेशी नागरिकांची प्रकरणे सक्षम प्राधिकरणांकडे सोपवण्यात यावीत, असा निर्देश निवडणूक आयोगाने राज्यस्तरीय निवडणूक यंत्रणेला दिला आहे.

ज्या मतदारांचे माहिती संकलन अर्ज परत आलेले नाहीत, त्यांच्याबाबत बुथ पातळीवरील अधिकारी आसपासच्या मतदारांकडून चौकशी करून अनुपस्थिती स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंद यासारखी संभाव्य कारणे निश्चित करतील आणि तशी नोंद करतील, असे आयोगाने स्पष्ट केले.

विदेशी नागरिक असल्याचा संशय असलेल्या व्यक्तींची प्रकरणी निवडणूक नोंदणी अधिकारी नागरिकत्व कायदा-१९५५ अंतर्गत सक्षम प्राधिकरणाकडे सोपवतील, असे एसआयआर राबवताना अनुसरण करण्याच्या कार्यपद्धतींबाबत १४ मे रोजी राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवण्यात आलेल्या सविस्तर सूचनांमध्ये निवडणूक आयोगाने म्हटले आहे. या उद्देशांसाठी सहाय्यक ईआरओ हे ईआरओचे अधिकार स्वतंत्रपणे वापरतील. मागील वर्षी आयोगाने बिहारमध्ये एसआयआर प्रक्रियेची तयारी करीत असताना आयोगाच्या तळागाळातील कर्मचाऱ्यांना बांगलादेश, नेपाळ आणि म्यानमारमधील अनेक नागरिक आढळल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला.

**एसआयआरचा तिसरा टप्पा सुरू**

मतदार यादीत समाविष्ट होण्यास पात्र नसलेल्या लोकांची कोणतीही आकडेवारी किंवा पुरावे निवडणूक प्राधिकरणाने सादर केले नव्हते. भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांशी न जुळणाऱ्या मतदारांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने एसआयआर राबवण्याचा डाव असल्याची टीका विरोधी पक्षांनी केली आहे. निवडणूक आयोगाने १४ मे रोजी १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३६.७३ कोटी मतदारांचा समावेश असलेल्या एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्याची सुरुवात केली. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ...तरच टळेल देवस्थानांवरील बालंट

सत्ता कुणाचीही असली तरी हिंदू समुदायाला वारंवार विविध प्रकारच्या कसोट्यांना सामोरे जावेच लागते. विद्यापीठ अनुदान आयोगाने काही महिन्यांपूर्वी आणलेले 'यूजीसी विधेयक-२०२६' किंवा महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेला देवस्थान इनाम निर्मूलन कायदा हे त्याचे ताजे उदाहरण. हिंदूंच्या भावना दुखावणारा देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम आराखडा आता स्थगित करण्यात आला असला तरी तो सरकारने जारी केला होता, हे दुःखद आहे. मात्र, त्यातील इष्टापत्ती अशी की, या निमित्ताने हिंदू समाज मंदिरांच्या व्यवस्थापनांच्या किंवा जमिनींच्या मुद्यांवर आता विचार करायला लागेल. एरवी हा विषय कुणाच्या गावीही नसतो.

हा मसुदा जारी होताच हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध सुरू केला. विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र मंदिर महासंघाने राज्यभरात आंदोलने सुरू केलीत. जुने वाद मिटविण्याच्या गोंडस नावाखाली या कायद्याचा घाट घातला गेला. वर्तमान इनाम व्यवस्था रद्द करणे, जमिनीवरील मालकी हक्क संपुष्टात आणणे, सध्या ज्यांच्याकडे देवस्थानची जमीन आहे किंवा ज्यांनी अतिक्रमण केले आहे किंवा ज्यांनी कायद्यातील पळवाटांचा फायदा घेत ताबा मिळविला आहे अशांना जमिनीचा मालकी हक्क प्रदान करणे हा या कायद्याचा उद्देश होता, असा या मसुद्याला विरोध करणाऱ्यांचा दावा होता. मंदिरांच्या जमिनींचे वाद आहेतच. त्यावर तोडगे काढणे गरजेचे आहेच. पण, मूळ समस्येचा अभ्यास न करता एकदम प्रारूप आणणे अनाठायी होते. हिंदू समाजाला असे वाटते की, इतर धर्मांच्या देवस्थानांसाठी अशा प्रकारचे कायदे लागू करण्याचा विचार सरकारच्या मनात येत नाही. येऊन-जाऊन दिसतो तो हिंदू समाज. इतर समुदायांच्या धर्मस्थळांचे कारभार बिनबोभाट चालू द्यायचे आणि जमिनी हिसकावून घ्यायच्या त्या हिंदू मंदिर संस्थांच्या. या कायद्याच्या मसुद्यावरून एक बाब उघड होते आणि ती म्हणजे शासनाने प्रारूप मसुदा जाहीर करण्यापूर्वी कोणताही अभ्यास केला नव्हता. हिंदू संस्कृतीच्या मुळावर घाव घालण्याचे प्रकार काँग्रेस राजवटींनी केले आणि त्या पक्षाला त्याची किंमत मोजावी लागली. एके काळी साऱ्या देशावर राज्य असलेला काँग्रेस पक्ष आता सत्तेत फार थोडा शिल्लक आहे. वर्तमान सरकारांनी या इतिहासापासून शिकले पाहिजे. आता हिंदू संघटनांनी विरोध केल्याने देवस्थान इनाम कायद्याच्या मसुद्याला स्थगिती दिल्याची घोषणा राज्य सरकारने केली असली तरी मुळात हा मसुदा आणलाच का गेला होता, हा खरा प्रश्न आहे. कायदा आणायचाच होता तर अन्य धर्मीयांच्या धार्मिकस्थळांना यातून का वगळण्यात आले, हाही कळीचा प्रश्न आहे. अनेक मंदिरांच्या जमिनीवर ठिकठिकाणी अवैध कब्जा करण्यात आला आहे. भाडे तत्त्वावर जमीन कसणाऱ्यांनी काही काळानंतर ताबा मिळविल्याची अथवा एससी/एसटी कायद्याचा धाक दाखवीत देवस्थानच्या जमिनीवर कब्जा केल्याची अनेक उदाहरणे राज्यात आहेत. देशातही आहेत. हे वाद सोडवावे लागतीलच. परंतु, अतिक्रमण करणाऱ्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे फायदा होऊ नये, याचीही काळजी घ्यावी लागेल. भारतीय संविधानातील २५ आणि २६ ही कलमे धार्मिक स्वातंत्र्यासंदर्भात मूलभूत अधिकार प्रदान करतात. कलम २६ हे धार्मिक संस्थांना स्वतःच्या धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार देते. महाराष्ट्र सरकारने कायद्याचा जो मसुदा आणला होता, तो संविधानातील कलम २५ आणि २६ चे सरळसरळ उल्लंघन करणारा आहे. भारतीय संविधान सर्व धर्मीयांना समान धार्मिक अधिकार देण्याचा सिद्धांत मांडते. असे असताना केवळ हिंदूंच्या देवस्थानांवरच वक्र नजर टाकण्याचे प्रयत्न सरकारने केले आणि त्यामुळे हिंदू समाज नाराज झाला होता. ती नाराजी कायमची संपवायची असेल तर पूर्ण अभ्यास केल्याखेरीज सरकारने यापुढे असे पाऊल टाकू नये, असा सल्ला द्यावासा वाटतो.

काहीही गरज नसताना अथवा असा कायदा आणावा, यासाठी कुणीही मागण्या किंवा आंदोलने केली नसताना हिंदू देवस्थानांवर अशी वक्र नजर टाकण्याची अवदसा का सुचावी, हा रास्त मुद्दा प्रारूपाच्या विरोधकांकडून मांडला गेला. नवीन कायदाच आणायचा असता तर सर्वप्रथम मंदिरांच्या जमिनीचे सर्वेक्षण करून त्यावरील अतिक्रमण हटविणे आवश्यक होते. तसे न करता अतिक्रमण करणाऱ्यांच्या घशात जमिनी घालण्याचा डाव आखण्यात आला होता, असे कुणी या मसुद्याकडे पाहून म्हटले तर त्याला चुकीचे ठरविता येणार नाही. देवस्थान इनाम व्यवस्था ही काही आत्ता-आत्ता आलेली नाही. या व्यवस्थेचे मूळ मध्ययुगीन आणि ब्रिटिशपूर्व काळातील आहे. राजे, महाराजे, सरदार किंवा स्थानिक सत्ताधीश मंदिर, मठ किंवा देवतांच्या नावे जमीन इनाम करून देत असत किंवा रोख अथवा वस्तुरूपात दानाची व्यवस्था करीत असत. मंदिर अथवा देवस्थान यांच्याभोवती त्या परिसरातील अर्थव्यवस्था फिरत असते. छोटे-मोठे व्यवसाय त्यावर चालतात आणि अनेकांच्या घरच्या चुली पेटतात. धार्मिक सेवा, पूजा-अर्चना, अन्नछत्र अथवा यात्रा-महोत्सवासाठी देवस्थानांना इनामे दिली जात असत. त्यातून सामाजिक कामेही होतात. आजही यात्रा-महोत्सवासाठी सार्वजनिक वर्गणी करणे ही व्यवस्था आहेच. ब्रिटिशांनीही देवस्थानच्या जमिनींना कायदेशीर स्वरूप प्राप्त करून दिले होते. देवस्थानांना मिळणाऱ्या अनुदानाची, इनामांची तपासणी करण्यासाठी इनाम आयोग स्थापन केला होता. बॉम्बे रेंट फ्री इस्टेट्स ॲक्ट-१८५२ आणि एक्झम्प्शन्स ॲक्ट-१८६३ हे कायदे करून इंग्रजांनी इनामांचे व्यवस्थित नियमन केले होते. असंख्य श्रद्धाळू नागरिकांनी मंदिरांना जमिनी दिल्या आहेत. संपत्ती दिली आहे. त्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून विविध धार्मिक-आध्यात्मिक आणि सामाजिक कार्ये पार पाडली जातात. इनामी जमिनी या देवस्थानांच्या आर्थिक व्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. हा कायदा मंजूर झाला असता तर ग्रामीण भागातील मंदिर व्यवस्थापनांना मोठा फटका बसला असता. मंदिरे ही भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहेत. ती आपल्या सनातन संस्कृतीची जिवंत केंद्रे आहेत. राज्यात हजारोंच्या संख्येने असलेली मंदिरे केवळ धार्मिक विधी करण्याची स्थळे नव्हेत. ती धर्म, इतिहास, लोकपरंपरा, स्थापत्य आणि सांस्कृतिक स्मृती जपणारी केंद्रे आहेत. देवस्थानांकडे केवळ जमीन व्यवस्थापन अथवा महसुलाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक पैलूंवर विचार करणे आवश्यक आहे. हिंदू संघटनांच्या दबावामुळे सरकारला हा प्रारूप मसुदा मागे घ्यावा लागला. पण, हा मसुदा केवळ स्थगित केला गेला आहे. तो रद्द झालेला नाही. तो रद्द केल्याचे आणि आता अभ्यास केल्याशिवाय या विषयाला हात लावला जाणार नाही, असे सरकारने जाहीर केले पाहिजे. कायद्याच्या नवीन प्रारूपासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली गेली आहे हे खरे. पण, सरकारने सर्वप्रथम देवस्थानांच्या जमिनींवरील अतिक्रमणे हटवावीत; जमिनींची मोजणी करून देवस्थानच्या ताब्यात द्याव्यात आणि नंतर हा कायदा आणावा. त्यासाठी या समितीत जाणत्या लोकांचा समावेश करावा. हिंदू समाजाच्या प्रतिनिधींना समाविष्ट करून घ्यावे. सल्लामसलत करावी. कायदा असो वा कायद्याचे प्रारूप, ते चर्चेतूनच पुढे आणले जाते. कायदा तयार करण्याची प्रक्रिया घिसाडघाईची नसते. एखाद्या विषयावर कायदा करायचा असल्यास त्याच्या सर्व बाजू विचारात घ्याव्या लागतात. कोणता मुद्दा समाजाच्या हिताचा आणि कोणता समाजाला घातक असेल, हे ठरवावे लागते. त्यासाठी मुक्त चर्चा व्हावी लागते. नागरिकांची मते ऐकून घ्यावी लागतात. यापूर्वी अनेक वेळा अनेक कायद्यांच्या बाबतीत हे टप्पे पाळले गेले आहेत. हिंदूंची देवस्थाने देखील याच प्रक्रियेच्या माध्यमातून पाहिली व हाताळली गेली पाहिजेत. त्याची पुरेशी काळजी यापुढे सरकारने घ्यावी आणि मंदिरे ही समाजाच्या धार्मिक आणि आध्यात्मिक स्वायत्ततेची प्रतीके आहेत, हे समजून पुढचे पाऊल टाकावे, असेही यानिमित्ताने सुचवावेसे वाटते. तसे झाले तरच देवस्थानांवर आलेले सरकारी बालंट टळेल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# पेंटागॉन विरुद्ध ॲक्टागॉन

क्रेमलिन विरुद्ध व्हाईट हाऊस! दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत युनियन यांच्यात सुरू झालेल्या शीतयुद्धाची व जागतिक महाशक्तींची ही दोन प्रतीके होती. व्हाईट हाऊस पांढऱ्या रंगाचे असल्याने त्याला हे नाव पडले आणि क्रेमलिन हे नाव 'क्रेमल्या' या शब्दावरून देण्यात आले. रशियन भाषेत किल्ल्यासाठी 'क्रेमल्या' हा शब्द वापरला जातो.

सोवियत युनियनचे पतन झाल्यानंतर क्रेमलिनचेही महत्त्व कमी झाले, त्याचे बुरुज भुसभुशीत झाले तर व्हाईट हाऊस मात्र अद्याप दिमाखात उभे आहे. सध्याच्या लघु तिसऱ्या महायुद्धानंतर पेंटागॉन विरुद्ध ॲक्टागॉन ही अमेरिका व चीन या दोन महाशक्तींमध्ये सुरू होणाऱ्या शीतयुद्धाची प्रतीके राहणार आहेत.

**पेंटागॉन** : पेंटागॉन हे अमेरिकन लष्कराचे मुख्यालय. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते विक्रमी अशा १६ महिन्यांमध्ये बांधण्यात आले. जवळपास २५ एकर जागेवर बांधण्यात आलेल्या या वास्तूमध्ये २५ किलोमीटर लांबीची दालने आहेत. पंचाकृती आकाराचे पेंटागॉन प्रसिद्धीस आले ते २००१ च्या सप्टेंबर महिन्यात अल कायदाच्या अतिरेक्यांनी केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर. अल कायदाच्या दहशतवाद्यांनी अमेरिकन एअरलाईन्सचे विमान पेंटागॉनवर आदळविले होते. यात पेंटागॉनचा काही भाग उद्ध्वस्त झाला, नंतर त्याची नव्याने बांधणी करण्यात आली. हा हल्ला एका इमारतीवर नव्हता, तर अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्यावर होता. सहा मजले असलेल्या पेंटागॉनमध्ये २४ हजारांवर लोक काम करतात. साऱ्या जगावर नियंत्रण ठेवण्याचे काम या वास्तूतून केले जाते. अमेरिकन लष्कर, वायुदळ आणि नौदल या तिन्ही दळांची कार्यालये या एका वास्तूत आहेत. यामुळे पेंटागॉन हे अमेरिकेच्या सामर्थ्याचे जणू प्रतीक झाले आहे.

**चीनचे ॲक्टागॉन** : चीनने आपल्या नव्या लष्करी मुख्यालयाची अधिकृत घोषणा वगैरे केलेली नसली तरी शियान जियांग या वाळवंटी प्रांतात तीन इमारती बांधल्या गेल्याचे चित्र उपग्रहांनी टिपले आहे. या इमारती अष्टकोनी असून त्यांची छायाचित्रे प्रथमच जगासमोर आली आहेत. या इमारतींमध्ये प्रामुख्याने लष्करी अधिकारी व सैन्य यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय त्यात अवजड लष्करी वाहने सुरक्षितपणे ठेवण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या दोन्ही इमारतींच्या बाजूला भरभक्कम बांधकाम करण्यात आले असून त्यात शस्त्रास्त्रे साठविण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे म्हटले जाते. हा भाग हवाई मार्ग व रेल्वे मार्ग यांनी जोडण्यात आला आहे. हा सारा भाग चीनच्या हामी या अण्वस्त्रे असलेल्या भागापासून १३० किलोमीटर असल्याचे मानले जाते तर तिसरी इमारत २४० किलोमीटर अंतरावर बांधण्यात आली आहे. इंटर कॉंटिनेंटल बॅलेस्टिक मिसाईल्स म्हणजे आयसीबीएम वाहून नेण्याची क्षमता असणारे ट्रकही या परिसरात दिसून आले आहेत.

**अमेरिकेला धक्का?** : चीनच्या या ॲक्टागॉनने अमेरिकेला जरा आश्चर्यचकित केले असून, आपल्या लष्करी वर्चस्वाला यामुळे धक्का बसण्याची त्याला चाहूल झालेली दिसते. काहीच दिवसांपूर्वी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी बीजिंगला भेट दिली. सरकारी मेजवानीत त्यांचे भाषण झाले. एका सम्राटासमोर एका मांडलिक राजाने भाषण करावे असे ते भाषण होते. त्यांनी चीन व त्यांच्या राष्ट्रपतींवर स्तुतिसुमने उधळली असली तरी त्यात एक महत्त्वाचा मुद्दा होता. चीन आता केवळ आर्थिक ताकद राहिलेला नाही तर एक लष्करी ताकद म्हणूनही त्याचा उदय झाला असल्याचे प्रतिपादन शाहबाज शरीफ यांनी केले. शरीफ यांचे प्रतिपादन बरोबर आहे. भारत-पाकिस्तान यांच्यात मागील वर्षी झडलेल्या संघर्षात चीनने पाकिस्तानला अद्ययावत तंत्रज्ञान पुरविले होते. त्यात बीव्हीआर म्हणजे बियाँग व्हिजुअल रेंज तंत्रज्ञान पाकिस्तानी वैमानिकांना पुरविण्यात आले होते. सध्या सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धातही चीन आपले लष्करी तंत्रज्ञान इराणला पुरवीत असल्याचे दिसून आले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करीत इराणने अमेरिकेचे एफ-१५ विमान पाडण्यात यश मिळविले तर आजवर अभेद्य मानल्या जाणाऱ्या एफ-३५ या विमानाला जायबंदी करण्यात यश मिळविले. या युद्धात इराणने अमेरिकेची २० लष्करी ठिकाणे बेचिराख करण्यात यश मिळविले. इराणला हे सारे करता आले ते केवळ चीनकडून सतत पुरविल्या जाणाऱ्या लष्करी साहित्यामुळे व त्यासोबत पुरविलेल्या तंत्रज्ञानामुळे.

**शांग्रिला डायलॉग** : सिंगापूरमध्ये मागील काही वर्षांपासून 'शांग्रिला डॉयलाग' नावाचा एक कार्यक्रम आयोजित केला जातो. त्यात देशादेशांचे लष्करी प्रतिनिधी सहभागी होतात व आपली भूमिका मांडतात. मागील वर्षी या कार्यक्रमात भारताच्या सरसेनापतींनी ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने काही लढाऊ विमाने गमावल्याचे मान्य केले होते व त्यावरून मोठा गदारोळ झाला होता. यावर्षीच्या आयोजनात अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांचे भाषण चर्चेचा विषय राहिले.

**'शांततेसाठी युद्ध'** : पीट हेगसेथ हे स्वत: लष्करात होते. 'चिर शांततेसाठी युद्ध' हे आपल्या पलटणीचे ब्रीदवाक्य होते असे सांगत त्यांनी आपल्या भाषणाचा प्रारंभ केला आणि या ब्रीदवाक्यानेच त्यांनी आपल्या भाषणाचा शेवटही केला. हेगसेथ यांचे भाषण चांगले होते, पण काही दिवसांपूर्वीच अमेरिकन सिनेट समितीच्या बैठकीत हेगसेथ यांच्या व्यभिचाराच्या चिंधड्या उडविण्यात आल्या होत्या.

**चीनचा उल्लेख** : आपल्या भाषणाचा मुख्य मुद्दा चीन हा ठेवताना हेगसेथ म्हणाले, चीनने ज्याप्रकारे लष्करी सामर्थ्याची जमवाजमव चालविली आहे त्याने सर्वांच्या मनात चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. चीनने आशियावर आपला एकछत्री अंमल स्थापन करण्याचा प्रयत्न करू नये अशी अमेरिकेची स्पष्ट भूमिका आहे. पश्चिम युरोपातील देश व नाटो देश यांना इशारा देताना हेगसेथ म्हणाले, अमेरिकेने या देशांच्या लष्करी खर्चाचा भार वाहण्याचे दिवस आता सरले आहेत. प्रत्येक देशाने आपल्या सरंक्षणाचा भार उचलला पाहिजे. आर्थिक संपन्न असलेल्या देशांनी तर याचे विशेष भान ठेवले पाहिजे. दक्षिण कोरिया, मलेशिया, जपान, थायलंड, ऑस्ट्रेलिया या देशांचे कौतुक करताना हेगसेथ म्हणतात, या सर्व देशांनी आपापल्या सरंक्षण खर्चात वाढ केली आहे.

**केवळ चर्चा नकोत** : केवळ चर्चा, परिषदा याचे दिवस आता संपले आहेत. थोडक्यात शांग्रिला भरविण्याचे दिवस संपलेले आहेत. तर याउलट युद्धनौका, पाणबुड्या बांधण्याचा काळ आता आला आहे. अमेरिकेने आपल्या सरंक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून आम्ही १.५ ट्रिलियन डॉलर एवढी रक्कम संरक्षणावर खर्च करण्याचे ठरविले आहे. अमेरिकन लष्कराचे सामर्थ्य वाढविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

**शस्त्र-स्पर्धा वाढणार?** : अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांनी सिंगापूरच्या शांग्रिला परिषदेत केलेल्या भाषणाचा स्पष्ट अर्थ म्हणजे जगात आता शस्त्र-स्पर्धा वाढणे अटळ आहे. प्रत्येक देशाने आपल्या संरक्षण खर्चात वाढ करावी असेच त्यांनी सुचविले आहे. यातील गूढ अर्थ म्हणजे ही शस्त्रे खरेदी करण्यासाठी त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरावा हेही त्यांनी सुचविले आहे.

**शस्त्र कंपन्यांची चांदी!** : अमेरिका-इराण युद्धामुळे साऱ्या जगावर मंदीचे सावट पडले आहे. याचा भारतासह काही देशांना चांगला फटका बसत आहे आणि बसणार आहे. पण याची चिंता ना राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना आहे आणि ना त्यांच्या संरक्षणमंत्र्यांना. त्यांनी उघडपणे जगाला शस्त्रसज्ज होण्याचा मंत्र दिला आहे. याने लॉकहीड मार्टिन, आरटीएक्स, नॉर्थरॉप ग्रुमन, जनरल डायनामिक्स आणि बोईंग डिफेन्स या पाच प्रमुख शस्त्र उत्पादन करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांची मात्र चांदी की सोने होणार आहे.

अमेरिका-इराण युद्ध सुरू होण्यापूर्वी हेगसेथ यांनी काही शस्त्र कंपन्यांचे शेअर्स खरेदी केल्याचे वृत्त अमेरिकेच्या 'वॉल स्ट्रीट जर्नल' या वृत्तपत्राने प्रसिद्ध केले होते, ते काही उगाच नाही.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# एसटीचे उत्पन्न वाढावे हीच इच्छा

सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी अर्थात एसटीच्या हितसंरक्षणाची जबाबदारी म्हणून बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात अवैध वाहतूक केल्यास संबंधितांना तुरुंगवासाची शिक्षा होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागाला शहराशी जोडणाऱ्या एसटीच्या उत्पन्नात वाढ होईल अशी आशा आहे. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीचे आर्थिक नुकसान तर होतेच, पण प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे बसस्थानक परिसरात कायद्याचे काटेकोर पालन करून अवैध वाहतुकीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी प्रशासनाने काही नियमांचे पालन करणे अपेक्षित असल्याने समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षा परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे. ही अपेक्षा व्यक्त करतानाच प्रवाशांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि दर्जेदार सेवा देणे हे एसटी महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. ५ ते १५ जून या दरम्यान विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील शिस्त वाढण्यास, एसटीचे उत्पन्न वाढण्यास आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुव्यवस्थित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, यात शंका नाही.

सर्वांची लाडकी एसटी ही नेहमीच तोट्यात असते. तिचे उत्पन्न वाढावे यासाठी शासनातर्फे नेहमीच उपाय शोधले जातात. पण फारसा उपयोग होताना दिसत नाही. त्याला अनेक कारणे असली तरी बसस्थानकाबाहेरून होणारी अवैध प्रवासी वाहतूक हेही एक मुख्य कारण आहे. आता या अवैध प्रवासी वाहतुकीलाच चाप बसणार आहे. सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घातला जाणार आहे. त्यासाठी राज्यभर विशेष अंमलबजावणी मोहीम राबवली जाणार आहे. ही अवैध वाहतूक रोखली गेल्यास एसटी महामंडळाच्या उत्पन्नात आपोआप भर पडणार आहे. या मोहिमेअंतर्गत पुढील दहा दिवस सर्व विभागांमध्ये संयुक्त तपासणी व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. तसे परिपत्रक एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने जारी केले आहे. राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहने उभी करून प्रवाशांची वाहतूक करणे यावर बंदी राहणार आहे. असा नियम केला तरी यापुढे अवैध प्रवासी वाहतूक होणार नाही हे कशावरून? काही लोक यातून पळवाट काढतीलच. त्यांना कोण रोखणार?



ग्रामीण भागाला शहराशी जोडणारी अशी एसटीची ओळख आहे. कितीतरी निकृष्ट दर्जाच्या बसेसमधून आजही लोक प्रवास करीत आहेत. ग्रामीण भागात आजही एसटीला पर्याय नाही. त्यामुळे लोक त्यानेच प्रवास करतात. पण शहरात अशी परिस्थिती आहे का? नागपूर किंवा मोठ्या शहरांच्या बसस्थानकाबाहेरून अवैध प्रवासी वाहतूक सुरूच असते. अनेक जण जवळपासच्या जिल्ह्यात जाण्यासाठी खाजगी चारचाकी वाहनांचा उपयोग करतात. त्यात एकटे जाण्यापेक्षा एसटीच्या भाड्याएवढे पैसे देऊन लोक प्रवास करतात आणि आपल्या नियोजित स्थळी पोहोचतात. काही जण म्हणतील यात गैर काय आहे? त्यांच्या दृष्टीने असा प्रवास करणे सोयीस्कर ठरेल. निकृष्ट दर्जाच्या बसने जाण्यापेक्षा वातानुकूलित कारने जाणे कधीही चांगले, असेच मत त्यांचे असणार. पावसाळ्यात गळती लागलेल्या बसपेक्षा खाजगी वाहनाचा प्रवास कधीही चांगला, हाच विचार ते करतील. दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वेळ वाचणे. उत्तम सुविधा आणि वेळेची बचत होत असेल तर लोक खाजगी वाहतुकीचा पर्याय निवडतील.

चांगल्या सुविधा मिळाल्या तर लोक अधिकचे पैसे देऊनही प्रवास करतात हे शिवाई बसने सिद्ध केले आहे. आरामदायक सीट, वातानुकूलित यंत्रणा आणि नियोजित स्थळी लवकर पोहोचण्याची हमी असल्याने लोकांनी शिवाई बसला पसंतीची पावती दिली आहे. आता शासनाने अनेक पर्यावरणपूरक बसेस विकत घेण्याचे ठरवले आहे. त्यासोबतच ती योग्यरीत्या चालवणारे चालक आणि प्रवाशांना सौजन्यपूर्ण वागणूक मिळाली तर लोक जास्तीचे पैसे देऊनही एसटीला पसंती देतील. मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतूक सुविधा असतानाही लोक अधिकचे पैसे मोजून कॅबने जातातच. नियम कडक करून काही दिवसांसाठी अवैध वाहतुकीला चाप बसेलही पण सुविधा मिळाल्या नाही तर येरे माझ्या मागल्या अशी स्थिती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतरांची रेष लहान करण्यापेक्षा आपली रेष कशी मोठी होईल याकडे परिवहन मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकांची पावले बसस्थानकांकडे वळतील आणि एसटीचे उत्पन्नही वाढेल.

९८५०७५३२८१

## कानोसा


**अमोल पुसदकर**

# झेप आमुची यशाकडे

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी या तुलनेने मागास समजल्या जाणाऱ्या गावातील एक तरुण, तेजकुमार सत्यनारायण बंडीवार, यांची भारतीय वायुसेनेत फ्लाईंग ऑफिसर म्हणून निवड झाल्याची बातमी प्रेरणादायी ठरली आहे. सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या परीक्षेतून दहा हजार विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले आणि त्यामध्ये तेजकुमार यांना अखिल भारतीय स्तरावर ८० हा क्रमांक मिळाला. ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नसून आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी लागणारी दुर्दम्य इच्छाशक्ती, ध्येयाकरिता समर्पण, मेहनत, शिस्त आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण आहे. त्याने जेव्हा उत्तीर्ण झाल्याची बातमी दिली, त्यावेळेस मी त्याचे अभिनंदन केले व त्याला विचारले की, पगार आणि इतर सोई काय असतात? त्यावर त्याने त्याला माहीत असलेली माहिती सांगितली व शेवटी तो म्हणाला की, पगार आणि सुखसोईंपेक्षा देशासाठी काम करायला मिळणे व भारतीय वायुसेनेचा गणवेश अंगावर घालायला मिळणे हाच मोठा सन्मान आहे.

आज अनेक क्षेत्रांमध्ये आपले भविष्य घडवायला निघालेले विद्यार्थी हे त्या क्षेत्रात कितीचे पॅकेज मिळते, याचाच पहिले विचार करतात. माझी आवड काय आहे, माझ्यामध्ये कोणते अंगभूत गुण आहेत, कोणते कौशल्य मी आत्मसात करू शकतो, माझ्या गुणांचा इतरही अनेक क्षेत्रांमध्ये कुठे कुठे चांगला उपयोग होऊ शकतो, त्याच्याबद्दलचा विचार बरेचदा कमी आढळतो. गर्दी जिकडे जात आहे, तिकडे अनेक विद्यार्थी हे ढकलले जातात.

आज देशात विविध क्षेत्रांमध्ये प्रचंड स्पर्धा आहे. अभियांत्रिकी क्षेत्रासाठी होणाऱ्या जेईई परीक्षेला दरवर्षी लाखो विद्यार्थी बसतात. त्यामधून आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना देशातील सर्वोत्तम रँकमध्ये स्थान मिळवावे लागते. वैद्यकीय क्षेत्रात तर स्पर्धा आणखी तीव्र आहे. नीट परीक्षेला २० लाखांहून अधिक विद्यार्थी बसतात आणि सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश मिळवण्यासाठी अत्यंत उच्च गुण आणि चांगली श्रेणी आवश्यक असते.



प्रशासकीय सेवांचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यूपीएससी ही देशातील सर्वांत प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते. लाखो उमेदवार अर्ज करतात; परंतु अंतिम निवड काहीशे जणांचीच होते. त्यामध्येही आयएएस कॅडर मिळवण्यासाठी देशातील सर्वोच्च रँक मिळवावी लागते. यावरून स्पष्ट होते की कोणतेही मोठे यश सहज मिळत नाही; त्यामागे अनेक वर्षांची तयारी, सातत्य आणि मानसिक ताकद असते. मात्र, एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो. प्रत्येक विद्यार्थ्याने फक्त इंजिनीअर, डॉक्टर किंवा आयएएस होण्याचाच विचार करावा का? वास्तविक पाहता, आज अनेक क्षेत्रांमध्ये उत्तम करीअर संधी उपलब्ध आहेत. डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सायबर सुरक्षा, संरक्षण संशोधन, व्यापारी जहाज सेवा, औद्योगिक सुरक्षा, कृषी तंत्रज्ञान, दळणवळण आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन (सप्लाय चेन मॅनेजमेंट) यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. अनेकदा विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे लक्ष काही मोजक्या पारंपरिक क्षेत्रांकडेच केंद्रित राहते; त्यामुळे इतर संधींकडे दुर्लक्ष होते. मोठ्या परीक्षा आणि स्पर्धांमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला तर काही गुण समान दिसून येतात. त्यांच्याकडे स्पष्ट ध्येय असते. ते नियमित आणि सातत्यपूर्ण अभ्यास करतात. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करतात. वेळेचे योग्य नियोजन करतात आणि सोशल मीडियासारख्या विचलित करणाऱ्या गोष्टींपासून आवश्यक अंतर राखतात. आत्मविश्वास आणि शिस्त हे त्यांच्या यशाचे मुख्य आधारस्तंभ असतात.

यामध्ये पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असते. मुलांवर अनावश्यक दबाव टाकण्याऐवजी त्यांना प्रोत्साहन देणे, इतर मुलांशी तुलना टाळणे, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे आणि त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे, ही पालकांची जबाबदारी आहे. तेजकुमार बंडीवार यांचे यश हे केवळ एका विद्यार्थ्याचे यश नाही. ते प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांसाठी प्रेरणेचा स्रोत आहेत. आजच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेची भीती न बाळगता स्वतःची क्षमता ओळखली पाहिजे.

अनेक वेळा भारत सरकार पद्म पुरस्कारांचे वितरण करते. त्यावेळेस ज्यांना तो पुरस्कार मिळालेला आहे, त्या व्यक्तींबद्दलची माहिती जेव्हा आपण वाचतो, तेव्हा असे लक्षात येते की समाजमान्य अभ्यासाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये यापैकी अनेक लोक कुठेही नव्हते; तरीही त्यांना इतका प्रतिष्ठेचा पद्म पुरस्कार मिळालेला आहे. यावरून आपल्या लक्षात येते की विद्यार्थी म्हणून सर्वसामान्य कामगिरी करताना त्यांनी मात्र माणूस म्हणून असामान्य कामगिरी केलेली असते.

तेजकुमारसारख्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या बातम्या ज्यावेळेस आपण वाचतो, त्यावेळेला नकळत पालकांच्या मनामध्ये इच्छा निर्माण होते की, आपल्याही मुलांनी अशा पद्धतीचे यश संपादन केले पाहिजे. ही भावना बरोबर आहे; परंतु अभ्यास मुलाला करायचा आहे, तुम्हाला नाही. यशस्वी त्याला व्हायचे आहे, तुम्हाला नाही. पालक त्याला यशस्वी होण्यासाठी मदत करू शकतात; परंतु त्याला चालायचे त्याच्याच पावलांनी आहे, उडायचे त्याला त्याच्याच पंखांनी आहे. ज्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो, ते एक दिवस काही काळासाठी प्रकाशामध्ये येतात; परंतु हा प्रकाश पाहण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे स्वतःला मातीच्या अंधकारात गाडून घेतलेले असते. त्यावेळेस हे सर्व अप्रसिद्ध लोक असतात. अनेक वेळा लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात; त्यामध्ये तू कसा काय उत्तीर्ण होणार, अशा पद्धतीने त्यांची उपेक्षाही होते. अनेकांना यश हुलकावणी देत असते. अनेक वेळा संधींचा उपयोग करूनसुद्धा यश मिळत नाही. अशा वेळेस नैराश्याचा घोर अंधकार, त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला असतो. अशा वेळेस त्यातून मार्ग दाखवणारा कोणी मिळत नाही.

''तिमिरातून तेजाकडे'' जाण्याच्या त्यांच्या या मार्गात पालक आणि समाजाने साहाय्यभूत होण्याची, देशसेवेसाठी असे अनेक 'तेजकुमार' घडविण्याची आवश्यकता आहे, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### संकटात... एक दिलासा

सध्या जगात इराण व अमेरिका यांच्यामधील युद्धामुळे तेल संकट तीव्र झाले आहे. जगभर तेलाचे भाव तर वाढले आहेत याशिवाय महागाईचा डोंब उठला आहे. आपल्या भारतातही परिस्थिती काही वेगळी नाही. इंधनाचे दर वाढले आहेत. इंधनाचे दर वाढताच इतर अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले. मुलांचे शैक्षणिक साहित्य, गणवेशांची भाववाढ झाली आहे. याचा फायदा अनेकांनी घेतला आहे. हे सारे चालू असतानाच एक दिलासादायक बातमी हाती आली आहे. अंदमान बेटाच्या पूर्वेला १५ किलोमीटरवर खोल समुद्रात नैसर्गिक वायूचे मोठे साठे ऑईल इंडिया लिमिटेड या सरकारी तेल कंपनीला सापडले आहेत. या अस्थिरतेच्या काळात ऊर्जा सुरक्षा बळकट होण्याची शक्यता आहे. अंदमान बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर खोल समुद्रात २५५ मीटरवर हे नैसर्गिक वायूचे साठे सापडले आहेत. याला केंद्राचे पेट्रोलियम खात्याचे मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी पुष्टी दिली आहे. सध्याच्या संकट काळात ही मोठी दिलासादायक बातमी आहे.

**शांताराम वाघ**/पुणे

### ...तर भारत काँग्रेसमुक्त होणार!

जागतिक तणावातही जीडीपी सुसाट, ही बातमी वाचली. जगात सर्वत्र सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीतही भारताने वार्षिक विकासदर ७.७ टक्के आणि जानेवारी २६ ते मार्च २६ या चौथ्या तिमाहीतील विकासदर ७.८ टक्के राखून आजही भारत हा जगातील सर्वांत जास्त दराने वाढणारी समर्थ अर्थव्यवस्था असल्यावर शिक्कामोर्तब केले आहे. या तिमाहीत एक महिना अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या काळाचाही आहे. अर्थात हा विकासदर योगायोगाने आलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारची विकास धोरणे, दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, निर्णयक्षमता, राष्ट्र सर्वोपरी धोरण, आत्मनिर्भर भारताचा ध्यास, भ्रष्टाचारविरहित कारभार, पराकोटीची देशनिष्ठा, जनताजनार्दनाने पंतप्रधानांना दिलेली समर्थ साथ आणि गेली बारा वर्षे एकही दिवस सुट्टी न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या अथक परिश्रमांचा हा परिणाम आहे.

या पृष्ठभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी नुकत्याच दिलेल्या भाषणात देशात भयंकर आर्थिक त्सुनामी येणार असल्याचा इशारा दिला होता. त्यांनी आरोप केला की, केंद्रातील भाजप सरकारने देशाची सुरक्षा यंत्रणा कमकुवत केल्यामुळे अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय धोक्यांपासून असुरक्षित झाली आहे. याचबरोबर त्यांनी येत्या एक वर्षात नरेंद्र मोदी सरकार जाणार असल्याचे आणि आगामी काळात ते देशात आणिबाणी लागू करण्याची शक्यता असल्याचे अभ्यासपूर्ण जावईशोधही लावले आहेत. देशातील घटनात्मक संस्था असलेल्या सर्वोच्च न्यायालयातील काही न्यायमूर्ती आणि भारतीय निवडणूक आयोगातील काही आयुक्तदेशातील गंभीर परिस्थितीबद्दल आपल्याला धडाधड मेसेज पाठवत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. अर्थात त्यांच्या या शोधांवर आणि भविष्यावर खुद्द काँग्रेस पक्षातील नेतेही विश्वास ठेवणार नाहीत तर जनतेने त्यांच्या वक्तयाला किंमत देणे दूरच राहिले.

राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसचा आजवर शंभरावर निवडणुकांमध्ये पराभव झाला आहे. या पराभवाची जबाबदारी राहुल गांधींनी घेऊन आत्मपरीक्षण करायला हवे होते. मात्र त्याऐवजी राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शेलक्या शब्दांत टीका करण्याचा सपाटाच लावला आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राहुल गांधींना आता एका ज्येष्ठ आणि हुशार मानसोपचारतज्ज्ञाची गरज आहे. ''परिवारमुक्त काँग्रेस झाली नाही तर काँग्रेसमुक्त भारत होणारच'', हे काँग्रेसच्या नेत्यांनी पक्के लक्षात ठेवावे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### व्लादिमिर पुतिन यांची रणनीती चीनच्या हिताची

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीन भेटीनंतर तातडीने रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी चीनबरोबर महत्त्वाचे करार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सध्या जगभरात इंधन टंचाईमुळे मोठ्या संकटाची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी आर्थिक क्षेत्रातही मंदीचे वारे घोंगावत आहे. या सर्व परिस्थितीला तोंड देण्यासाठी रशिया आणि चीन या दोन्ही देशांत आगामी काळात मोठ्या प्रमाणात आदानप्रदान होण्याची शक्यता दिसत आहे. रशियाच्या सायबेरियन प्रदेशातून मंगोलियामार्गे चीनला नैसर्गिक वायू वाहून नेण्याची योजना पुतीन यांनी आखली आहे. परिणामी चीनसारख्या राष्ट्राला पुढील अनेक वर्षे नैसर्गिक वायूचा तुटवडा भासणार नाही. पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थितीमुळे जगामधील तेल बाजारातील समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. होर्मुझमधून होणारी जहाजांची वाहतूक ठप्प झाल्यामुळे भारतासह अनेक देशांपुढे इंधन टंचाईचे संकट निर्माण होऊ शकते. चीनलादेखील या अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्या पृष्ठभूमीवर रशियाकडून होणारे सहकार्य दीर्घकालीन हिताचे ठरणार आहे.

रशियाला स्वतःची अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी आशियाई देशांवर विशेषतः चीनवर अवलंबून राहावे लागत आहे. २०२९ पर्यंत चीनचे वार्षिक ५२.५ अब्ज घनमीटर रशियन गॅसचा पुरवठा करण्याचे लक्ष्य आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

# सासुबाईचे दागिने घेऊन पोबारा केलेल्या 'त्या' नववधूकडून जप्त करण्यात आले सोने

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ७ जून-**

सासूबाईचे दागिने व रोख रक्कम घेऊन पोबारा केलेल्या 'त्या' नववधूकडून पोलिसांनी सोने जप्त केले. पोउनि डॉ.आरती कणिरे यांच्या हस्ते सदर दागिने संबंधित कुटुंबास परत करण्यात आले. यातील फिर्यादी नामदेव जाधव (वय-३८, रा.बावची) यांचे लग्न होत नव्हते. त्यांचा भाचा संतोष भोसले (रा.भोसे) यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पिंटू उर्फ नाना कोळेकर, शिवाजी कोळेकर, युवराज कांबळे (सर्वजण रा.रड्डे) यांच्याशी बोलणी केली.

सर्व आरोपींनी फिर्यादीचा विवाह अश्विनी मारुती दानोळे (रा.देवरुख, जि.रत्नागिरी) हिच्यासोबत दि.२२ फेबुवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता भोसे येथे साध्या पध्दतीने लग्न केला. मुलीचा पहिला नवरा मारुती दानोळे हा वारला आहे. असे खोटे सांगितले होते. लग्न जमविण्यासाठी



फिर्यादीकडून १ लाख ५० हजार रुपये घेतले होते.

चार महिने संसार व्यवस्थित चालू असताना आरोपी तथा नववधू अश्विनी दानोळेने १० मे २०२६ रोजी रात्री ११.३० वाजता सासूचे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण व रोख रक्कम घेवून पोबारा केला. रात्री १ वाजता फिर्यादीस जाग आल्यावर आजूबाजूला पाहिले असता पत्नी अश्विनी आढळून आली नाही. पहाटे ३ वाजता अश्विनीने कॉल करुन सांगलीला असून सकाळी चिपळूणला जाणार आहे. चार दिवसाने परत येत आहे, असे सांगितले. तेव्हा असे अचानकपणे का गेलीस? असे फिर्यादीने विचारले असता जुन्या कामाचा हिशोब बाकी आहे. पगार घेवून येते, असे ती म्हणाली. मात्र आली नाही. पोह कोष्टी यांनी तपास करुन नववधूने लांबवलेले सोने जप्त करुन नववधूस मंगळवेढा पोलिस स्टेशन येथे हजर केले.

## महत्वाचे...



## महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. ७ जून-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळांमध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यात्रसंगी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, प्रमुख लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, लेखापाल महेश वालावलकर, पर्यवेक्षक सुरेश कासार, रजनी राऊळ, गणेश कोळी, तरंगिणी कोंडा, सारंग अंजीखाने, अबरार डोंगरी, मारुती भोसले, रियाज आतार, अमोल गायकवाड, सतीश सरवदे, आनंद हिरेमठ, भालचंद्र साखरे, नासिर खान, सायली ढोले, सचिन साखरे उपस्थित होते.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त वारकऱ्यांना आमरस वाटप

**सांगोला, दि .७ जून-**



शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून अधिक मासानिमित्त निघणाऱ्या दिंड्यांना प्रशांत पाटील यांनी सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमरस वाटप केला. शहरातून विठ्ठल नामाचा गजर करत जाणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांचे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यापाशी आगमन होताच त्यांना प्रशांत पाटील यांनी स्वतःच्या बागेतील हापूस व केसर आंब्यांचा मधुर रस प्रसाद म्हणून वाटप केला.

## मॉडेल अकॅडमीचा करियर अकॅडमीवर दणदणीत विजय

**विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा : विवेक अणचीचे नाबाद अर्धशतक**

**सोलापूर, दि. ७ जून -**

विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमीने करियर अकॅडमीचा ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. करियर अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मॉडेल अकॅडमीच्या अचूक गोलंदाजीसमोर करियर अकॅडमीचा डाव २९ षटकांत १२३ धावांवर आटोपला. करियर अकॅडमीकडून खिजर शेखने ३३ धावा, विजयानंदने २९ धावा आणि झैद नदाफने २६ धावा केल्या.

मॉडेल क्रिकेट अकॅडमीकडून गोलंदाजी करताना अक्षय हावळे आणि स्वराज वाले यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर सत्यजित जाधव, यश बोरामणी आणि प्रथमेश राठोड यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. विजयासाठी मिळालेले १२४ धावांचे आव्हान मॉडेल क्रिकेट अकॅडमीने अवघ्या ११.१ षटकांत २ गडी गमावित १२५ धावा करत पूर्ण केले. सलामीवीर विवेक अणची याने ५८ धावांची तर मारुती कांबळे याने ४४ धावांची नाबाद खेळी करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या सामन्यात पंच म्हणून अशोक डोंबाळे आणि शुभम मुत्तुर यांनी कामगिरी बजावली, तर गुणलेखन अनिल सलगर यांनी केले.

## युपीच्या कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. ७ जून -**

अज्ञात कारणावरुन युपीच्या एका कामगाराने घरातील छताच्या फॅनला गमछाच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. उत्तर सोलापूर तालुक्यातील सोमनाथ नगरात शनिवारी रात्री नऊ वाजता ही घटना उघडकीस आली. राज कुमार (वय ४१, रा. झांसी, उत्तरप्रदेश, सध्या रा. सोमनाथ नगर, उत्तर सोलापूर) असे गळफास घेतलेल्या त्या व्यक्तीचे नाव आहे. गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याला शेजारी व नातेवाईकांनी खाली उतरवून येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.




## मंगळवेढेकर महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

येथील प्रा. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयातील एमबीए आणि बीसीए अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात विविध प्रबोधनात्मक व रचनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरण व्यवस्थापन' या विषयावर आधारित एका विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या विविध पैलूंची माहिती जाणून घेतली. यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यात्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संस्थेचे संचालक डॉ. ओ. एम. अष्टनकर यांनी 'पर्यावरण संरक्षणाची आजची गरज आणि आवश्यकता' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा संतोष कुलकर्णी, प्रा. श्रीदेवी बऱ्हाणपुरे यांनी परिश्रम घेतले.

## 'लोकमंगल'च्या शैक्षणिक कर्ज योजनेतून विद्यार्थी घडतील

**विजय कुलकर्णी; लोकमंगल परिवारातर्फे सांगोल्यात विद्यार्थ्यांचा गौरव**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ जून-**

केवळ आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आ.सुभाषबापू देशमुख यांच्या कल्पनेतून शैक्षणिक कर्ज योजना सुरू केलेली आहे. लोकमंगल बँकेच्या या योजनेतून समाजातील गरजू विद्यार्थी घडतील असे प्रतिपादन बँकेचे संचालक विजय कुलकर्णी यांनी केले. ते लोकमंगल बँकेच्या सांगोला शाखेच्या वतीने इ. १० व १२ वी परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक रामहरी लेंडवे, शाखा सल्लागार अॅड. गजानन भाकरे, यतिराज सुरवसे उपस्थित होते.

यात्रसंगी श्रीयस ठोंबरे, भाग्यश्री इंगवले, तन्वी घोरपडे, स्वराज्य जांगळे, श्रेयस सुरवसे, संचिता देशमुख, सोहम माळी, समृद्धी माळी, गणेश आदलिंगे, सिद्धी उकळे, अर्जुन सावंत, जिज्ञासा घोंगडे, वैदेही देशपांडे या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी अॅड.गजानन भाकरे यांनी मार्गदर्शन तर पालक विष्णू माळी व मनोज जांगळे, वैदेही देशपांडे, सोहम माळी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन ज्योती गुळिमरे यांनी केले. आभार सुहास वालीकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय महामुनी, विजय स्वामी यांनी परिश्रम घेतले.

# नागपूरचा मारस सहजवीरसिंग व मुंबईची त्वेषा जैन विजेते

## चॅम्पियन चषक १३ वर्षाखालील राज्य निवड बुध्दिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

चॅम्पियन चषक एचटूई पॉवर सिस्टिम्स १३ वर्षांखालील खुल्या व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम आठव्या फेरीनंतर मुलांच्या गटात नागपूरच्या मारस सहजवीर सिंगने आठ पैकी सात गुण करून अजिंक्यपद पटकाविले. मुलींच्या गटात मुंबईच्या आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त खेळाडू त्वेषा जैन हिने स्पर्धेमध्ये आठ पैकी साडेसात गुण मिळवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. दोन्ही विजेत्यांना रोख ४ हजार रुपये, आकर्षक चषक व पदक देऊन गौरविण्यात आले. तसेच तसेच मुलांच्या गटात पुण्याचा राम लथीक याने साडेसहा गुणांसह तर मुलींच्या गटात छत्रपती संभाजीनगरच्या भूमिका वाघळे हिने देखील सात गुणांसह स्पर्धेचे उपविजेतेपद प्राप्त केले.

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच हेरिटेज समूह, चॅम्प चेस स्कूल आणि नेक्स्ट मुव्ह चॅम्पियन ऑनलाइन चेस अकॅडमी यांच्या सहकार्याने सोलापूर चेस अकॅडमीतर्फे




गांधीनगर येथील द हेरिटेज येथे आज उत्साहात संपन्न झाल्या. स्पर्धेचा बक्षीस समारंभ नवी मुंबईचे सहा. पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, प्रमुख पंच पुण्याचे आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, आंतरराष्ट्रीय गुनांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, फिडे मार्गदर्शक शशिकांत मक्तेदार, वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

स्पर्धा यशस्वीतेसाठी रोहिणी तुम्मा-राठी, युवराज पोगुल, गणेश मस्कले, जयश्री कोंडा, विजय पंगुडवाले, भरत वडीशेरला, प्रज्वल कोरे, यश इंगळे, नितीन अग्रवाल, अभिजीत बावळे, नागराज वडीशेरला यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले. विजेत्या खेळाडूंना रु. ३६ हजार रुपयाची रोख पारितोषिके, मेडल्स तसेच आकर्षक ङ्गचॅम्पियन चषकङ्ग देऊन गौरविण्यात आले. स्पधेतील सर्वात लहान खेळाडू सहा वर्षीय अनिरुद्ध नागरकर (पुणे), अनय कुमार व श्रीनिधी देशमुख (परभणी), श्रुती भारती यांना देखील मेडल्स प्रदान करण्यात आले.

तेरा वर्षाखालील राष्ट्रीय निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवडण्यात आलेला *महाराष्ट्राचा पाच मुले व चार मुलींचा संघ:*

*मुले :-* मारस सहजवीरसिंग - ७ नागपूर, लथीक राम- ६.५ (४२) पुणे, विवान सोनी - ६.५ (४१.५) कोल्हापूर, कुशाग्र पालीवाल - ६.५ (३९.५) कोल्हापूर, अनय घुले - ६.५ (३९) मुंबई उपनगर

*मुली :-* त्वेषा जैन - ७.५ मुंबई, भूमिका वागळे - ७ छ. संभाजीनगर, प्रिशा घोलप - ६.५(३९.५) नाशिक, तिस्या पट्ट - ६.५(३४.५) ठाणे.

*अंतिम निकाल याप्रमाणे:* (अनुक्रमे ६ ते १०) १३ वर्षे मुले : विहान अग्रवाल - ६.५(३८.५) मुंबई उपनगर, वरद पाटील - ६.५(३७), सांगली, निर्वाण शहा - ६.५(३६) मुंबई शहर, आरव धायगुडे - ६(४०) पुणे, सामविद पासबोला - ६(३९.५) मुंबई उपनगर. मुली: सिद्धी कर्वे - ६(३९.५) कोल्हापूर, अनुष्का देशपांडे - ६(३७.५) नागपूर, महुआ देशपांडे - ६(३३) मुंबई उपनगर, व्येघा बैजू - ६(३२.५) रायगड, सान्वी गोरे - ५.५(४१.५) सोलापूर, गिरीषा पै - ५.५(३८) मुंबई उपनगर.

११ वर्षे वयोगट मुले: शौर्य भोंडवे पुणे (६), वेदांत पुजारी मुंबई (५.५), अन्वित गायकवाड अहिल्यानगर (५.५). मुली: आदिना मोहंती - ५.५ पुणे, रीवा खुडे - ५ मुंबई, मिष्का त्रिपाठी - ५ मुंबई.

८ वर्षे वयोगट मुले: अद्वैत कुलकर्णी कोल्हापूर (५.५), अनिरुद्ध नगरकर पुणे (४), अर्णव वाघमारे ठाणे (३.५). मुली: आरिषा वाघमारे - ३ ठाणे, श्रीनिधी देशमुख- ३ परभणी, ईशा पटवर्धन - १ सोलापूर.

उत्कृष्ट सोलापूर मुले: देवदत्त पटवर्धन (५), श्रेयस कुदळे (४.५), सिद्धांत कोठारी (४.५)

उत्कृष्ट सोलापूर (मुली): संस्कृती जाधव - ५, सिद्धी देशमुख - ४.५, अदिती इनानी - ४.






# 'वॉरियर्स' व 'ईगल्स' संघास विजेतेपद

## एनजीसीए इंटर क्लब क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅडमी (एनजीसीए )आयोजित इंटर क्लब लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत १२ व १४ वर्षांखालील वयोगटात 'वॉरियर्स' संघाने, तर १६ वर्षांखालील वयोगटात 'ईगल्स' संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यात विजेतेपद पटकावले.

डोणगाव रोडवरील पुष्प जिमखाना येथे झालेल्या या स्पर्धेत १२ व १४ वर्षांखालील गटात 'वॉरियर्स' संघाने 'पँथर्स' संघावर ५ गडी राखून विजय मिळिवला. दुसऱ्या सोळा वर्षाखालील गटातील अंतिम सामन्यात 'ईगल्स'ने 'किंग्स' संघावर ३ धावांनी मात केली.

पारितोषिक वितरण समारंभ स्टेट बँक ऑफ इंडियाचे मुख्य प्रबंधक अनिकेत फळे व प्रबंधक धनंजय होनमाने यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी ज्येष्ठ क्रीडा संघटक सुदेश मालप, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी विनोद पाटील, एनआरएमयूचे संघटक नेते मनोज वाल्मिकी, युवा काँग्रेसचे नेते राहुल म्हेत्रे, सामाजिक कार्यकर्ते राहुल सर्वगोड, शिवाजी नाईट कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. वाल्मीक कीर्तीकर आणि श्री. शेख आदी मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दीपक सुरवसे, आनंद पाटील आणि अविनाश चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक अॅकॅडमीचे संचालक निलेश गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन विष्णू गायकवाड सर यांनी केले. उपस्थितांचे आभार गणेश पवार यांनी मानले.

अंतिम सामन्यांचे संक्षिप्त धावफलक

१२ व १४ वर्षांखालील : पँथर्स: २५ षटकांत ५ बाद ११३ धावा. (कबीर कीर्तीकर ४४, श्रेयश शितळ १६, आदिराज कोनापुरे १२. गोलंदाजी: आदित्य चटके २/१७, विराज टकले व यशराज टेकाळे प्रत्येकी १ बळी).

पराभूत विरुद्ध वॉरियर्स: २४.२ षटकांत ५ बाद ११७ धावा. (आदित्य चटके नाबाद २२, दुर्वांक पाटील २०, आदित्य सुरवसे १२, विराज टकले १०, नकुल होनमाने ८. गोलंदाजी: श्रीकार चव्हाण २/२७, शांभवी शिंदकर व अथर्व पाटील प्रत्येकी १ बळी).

१६ वर्षाखालील : ईगल्स: २६.४ षटकांत सर्वबाद १६२ धावा. (सोहम कुलकर्णी ४०, ऋग्वेद पाटील ३०, श्रवण म्हेत्रे २५, आर्यन हांगे १८. गोलंदाजी: श्रवण माळी व आनंद शेंडे प्रत्येकी ३ बळी, अभिजीत सरवदे २/१७, अर्जुन चटके १/१७). विजयी विरुद्ध किंग्स: २५.३ षटकांत सर्वबाद १५९ धावा. (आनंद शेंडे ५८, विराज पांढरे नाबाद २८, अभिजीत सरवदे २७. गोलंदाजी: अनुज वाल्मिकी व चेतन मांडलो प्रत्येकी ३ बळी, ऋग्वेद पाटील व सोहम कुलकर्णी प्रत्येकी १ बळी).


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर, बर्शी तालुका व आसपासचे लोकांस आमचे अशिलानी कागदपत्रे दाखवून जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस सांगितलेवरुन सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. बार्शी पैकी मौजे बार्शी ता. बार्शी नगरपालिका हद्दीतील अ) गट कमांक ५३८/१ पैकी प्लॉट नं. ९३ याचे क्षेत्रफळ १४५.१० चौ.मी. याचे मोजमाप पूर्व बाजू १०. ०० मी., दक्षिण बाजू १४.५१ मी., पश्चिम बाजू १०.०० मी., उत्तर बाजू १४.५१ मी. हा विनशेती खुला प्लॉट. सदरच्या प्लॉटची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत पूर्वेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस - प्लॉट नं. ९२, पश्चिमेस - प्लॉट नं. ८०, उत्तरेस - प्लॉट नं. ९४. याचे पाणी व वागणूक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. ब) गट क्रमांक ५३८/१ पैकी प्लॉट नं. ९४ याचे क्षेत्रफळ १४५.१० चौ.मी. याचे मोजमाप पूर्व बाजू १०.०० मी., दक्षिण बाजू १४.५१ मी., पश्चिम बाजू १०.०० मी., उत्तर बाजू १४.५१ मी. हा बिनशेती खुला प्लॉट. सदरच्या प्लॉटची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत पूर्वेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस - प्लॉट नं. ९३, पश्चिमेस - प्लॉट नं. ७९, उत्तरेस - प्लॉट नं. ९५. याचे पाणी व वागणूक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

वरील दोन्ही प्लॉट आमचे अशिल यांनी श्री. अशोक शांतीलाल गुंदेचा यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेणेबाबत तोंडी करार केलेला आहे व इसाराची रक्कमही रोख स्वरुपात दिलेली आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक विनशेती २ खुले प्लॉट व आतील झाड-झाडोरा, माती, दगड वगैरे तंदगभूत वस्तुसह वहिवाटीचे हक्कासह.

तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकती वायत कोणाचा काही हक्क, हितसंबंध, मालकी वहिवाट, कब्जा, अतिक्रमण असल्यास अथवा सदर जमीनीचा करार-मदार, पोटगी, गहाण, दान, लीन, लीज अथवा साठेखत, नोटरी इसारपावती किंवा कोणत्याही बँकेचे अथवा खाजगी सावकाराचे कर्ज असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा वाद, भावकीवाद, बांधाचा वाद वगैरे असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह कळवाव्यात. असे न केल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही तकार चालणार नाही त्याकरीता सदरची जाहीर नोटीस दिली आहे.
तारीख: ०७/०६/२०२६

सही/-
श्री. नितिन अरुण मोरे
अॅडव्होकेट
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी
ता. बार्शी जि. सोलापूर
मो. नं. ९९२२४७२२१५/७९७२१३७४४६
(अशिलातर्फे अॅडव्होकेट)

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील व पंचायत समिती ता. दक्षिण सोलापूर येथील मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कुंभारी येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६५१/१ यापैकी भगवान गौतम बुध्द मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित नं. ५, कोंढवा बुद्रुक, पुणे या गृहनिर्माण संस्थेमधील बिनशेती प्लॉट नं. ३ याचे हद्दी पुर्वपश्चिम दक्षिण अंगास २२.२५ मी, उत्तर अंगास २२ मी. आणि दक्षिणोत्तर पूर्व अंगास २५ मी, पश्चिम अंगास २२ मी. असे एकूण क्षेत्र ५१९.९० चौ.मी. अथवा ५५९४ चौ. फुट, ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ५.१९.९० आर.चौ.मी. इतके आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस : रस्ता, दक्षिणेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ४,५ व ६, उत्तरेस : प्लॉट नं. २ असे आहे. सदर मिळकत ही भगवान गौतम बुध्द मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित संस्था मर्यादित नं. ५, कोंढवा बुद्रुक, पुणे तर्फे १) अध्यक्ष-श्री. मल्लेश रानप्पा कांबळे, २) सचिव - श्री. दिलीप संतराम कांबळे यांचे मालकीची असून त्यांचे नावाची नोंद ७/१२ उताऱ्यावर फेरफार क्र. ११५४२ ने नोंद झालेली आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल भगवान गौतम बुध्द मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, तर्फे अध्यक्ष-मनोहर रामचंद्र बदामे यांना देण्याचे कबुल करुन इसारा रक्कम स्विकारुन इसारा पावती लिहून दिलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जाकरार, मदार, या संबंधीचा हक्क असलेस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा वित्तीय अथवा सावकाराचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून दयावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल मिळकती संबंधीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर सदर व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार उपस्थित झाल्यास ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणुक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. ०६/०६/२०२६.

सही/-
अॅड. सलाम मोहम्मदसाब बगलुर
बी.ए., एलएल.बी., एम.एस.डब्ल्यु., डी.एम.
सी.जे. अॅडव्होकेट ऑफीस पत्ता. गाळा
नं. १०, पहिला मजला, दारुस्सलाम अपार्टमेंट,

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सुथारच्या 'सुंदर' कामगिरीमुळे भारताची घट्ट पकड

### भारत ८ बाद ५६४ डाव घोषित, अफगाणिस्तान ५ बाद ११३

### पंतचे शतक हुकले, सुंदरचे नाबाद अर्धशतक

### मानव सुथारचे पदार्पणात ३ बळी



फटकेबाजी करताना वॉशिंग्टन सुंदर



मानव सुथारची पाठ कौतुकाने थोपटताना यशस्वी यसस्वाल

**मुल्लानपूर, ७ जून**

येथे सुरू असलेल्या एकमेव कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, भारताने अफगाणिस्तानविरुद्ध आपला पहिला डाव ५६४ धावांवर ८ बाद घोषित केला. या डावात ऋषभ पंतचे शतक थोडक्यात हुकले, तर वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ५२ धावांची खेळी केली. भारताच्या पाचशे धावांच्या डोंगराला प्रत्युत्तर देताना अफगाणिस्तानने दिवस अखेरपर्यंत ३९.५ षटकांत ५ बाद ११३ धावा काढत आपला निम्मा संघ गमावला. अफगाणिस्तान अजूनही ४५१ धावांनी पिछाडीवर आहे. कसोटी पदार्पणात भारताचा डावखुरा फिरकी गोलंदाज मानव सुथार याने २१ धावांत ३ बळी टिपण्याची लक्षवेधक कामगिरी केली. वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाने २ बळी टिपण्यात यश मिळविले.

सामन्याच्या पहिल्या दिवशी के.एल. राहुलने १६५ चेंडूंत संयमी १०० धावा केल्या होत्या, तर साई सुदर्शनने ८१ धावांचे योगदान दिले होते.

रविवारी सकाळच्या सत्रात बाद होण्यापूर्वी कर्णधार शुभमन गिलने १२६ धावांची दमदार खेळी करत संघाचे नेतृत्व केले. गिलने पंतसोबत चौथ्या गड्यासाठी १६९ धावांची भागीदारी केली. मोहम्मद सलीमच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी गिलने १७७ चेंडूंत १५ चौकार व एका षट्कारसह १२६ धावांची खेळी केली.

कालच्या ३ बाद ३६८ या धावसंख्येवरून पुढे खेळताना, भारताच्या वरच्या आणि मधल्या फळीतील फलंदाजांनी अफगाणिस्तानच्या गोलंदाजीवर वर्चस्व गाजवले; मात्र पंतचे शतक थोडक्यात हुकले. हशमतुल्लाह शाहिदीच्या गोलंदाजीत अझमतुल्लाह ओमरझाईकडून झेलबाद होण्यापूर्वी पंतने १२१ चेंडूंत ८१ धावांची मनोरंजक खेळी केली, यात त्याने ६ चौकार व ३ षट्कार खेचलेत.

वॉशिंग्टन सुंदरचे अर्धशतक पूर्ण होताच भारताने आपला पहिला डाव घोषित केला. सुंदरने ६८ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह नाबाद ५२ धावांची खेळी केली. मानव सुथारने २८ आणि मोहम्मद सिराजने जलद गतीने २२ धावा जोडल्या. १२७ षटकांचा खेळ झाल्यानंतर कर्णधार गिलने फलंदाजांना परत बोलावले व भारताचा १२७ षटकांत ८ बाद ५६४ धावांवर पहिला डाव घोषित केला.

अफगाणिस्तानतर्फे वेगवान गोलंदाज मोहम्मद सलीमने २७ षटकांत ६ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली. झियाउर रहमान आणि हशमतुल्ला शाहिदी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला, परंतु फलंदाजीसाठी अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर भारताच्या फलंदाजीचा बहर रोखण्यात पाहुण्या संघाला संघर्ष करावा लागला.

प्रत्युत्तर देताना अफगाणिस्तानने अतिशय सावधगिरीने भारतीय गोलंदाजांचा सामना करत डावाची सुरुवात केली. पदार्पण करणाऱ्या मानव सुथारने आपला पहिला आंतरराष्ट्रीय बळी मिळविला; त्याने टी-ब्रेकच्या अगदी आधी सलामीवीर अब्दुल मलिकला १६ धावांवर बाद केले. त्यानंतर प्रसिध कृष्णाने सेदिकउल्लाह अटलचा (१७) त्रिफळा उडविला. त्यामुळे अफगाणिस्तानची अवस्था ८.४ षटकांत २ बाद ४० धावा अशी झाली. त्यानंतर सुथारने रहमनुल्लाह गुरबाजच्या (१२) रूपात आपला दुसरा बळी घेतला. रहमत शाह व कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने संयमाने फलंदाजी करत संघाला शंभर धावांच्या जवळपास आणले असताना प्रसिध कृष्णाने शाहिदीला पायचीत केले. शाहिदगीने ४८ चेंडूंचा सामना करीत ४ चौकारांच्या मदतीने २० धावांचे योगदान दिले. पुढे रहमत शाह व अफसर झाझईने अफगाणिस्तानला शंभर धावांचा उंबरठा ओलांडून दिला. मानव सुथारने आपल्या गोलंदाजीत अफसर झाझईला (३) झेलबाद केले आणि येथेच दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला, तेव्हा अफगाणिस्तानने ३९.५ षटकांत ५ बाद ११३ धावांची नोंद केली. रहमत शाहने ८१ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारसह नाबाद ४३ धावांची खेळी केली.

भारताकडून मानव सुथारने २१ धावांत ३ बळी, तर प्रसिध कृष्णाने २७ धावांत २ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

# कर्णधारपदाच्या जबाबदारीसाठी व्यक्तिमत्त्व बदलण्याची गरज नाही

### श्रेयस अय्यर यांचे प्रतिपादन



**मुंबई, ७ जून**

लहानपणापासूनच मला आव्हानांचा सामना करायला आवडते आणि देशाचे सर्वात छोट्या फॉरमॅटमध्ये नेतृत्व करण्याची नवीन जबाबदारी मिळाली असली, तरी याचा अर्थ मला माझे व्यक्तिमत्त्व बदलावे लागेल असा होत नाही, असे भारताचा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघ कर्णधार श्रेयस अय्यर याने रविवारी सांगितले.

३१ वर्षीय अय्यरची शनिवारी भारतीय टी-२० संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली. त्याने सूर्यकुमार यादवची जागा घेतली आहे. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने मार्चमध्ये टी-२० विश्वचषक जिंकला होता.

मुंबईतील आव्हानात्मक क्रिकेट वातावरणात वाढलेला तोच माणूस राहणे आपल्याला आवडेल. मला माझे व्यक्तिमत्त्व बदलण्याची गरज नाही. मी आधी जसा होतो तसाच राहीन; मी कोणीतरी वेगळे बनण्याचा किंवा कोणाच्या सावलीखाली वावरण्याचा प्रयत्न करणार नाही, असे अय्यरने येथील एका कार्यक्रमात सांगितले.

**मानसिकता नेहमीच विजयाचीच**

लहानपणापासूनच मला आव्हाने आवडत आली आहेत, विशेषतः मुंबईसारख्या शहरातून आल्यामुळे, जिथे क्रिकेटचे महत्त्व खूप मोठे आहे आणि स्पर्धाही तीव्र असते. रस्त्यावरील प्रत्येक मुलाला मुंबईचे प्रतिनिधित्व करायचे असते. आपली मानसिकता नेहमीच विजयाची राहिली आहे आणि ज्यांच्याशी आपण स्पर्धा केली, त्या सर्वांविरुद्ध जिंकण्याचाच विचार आपण केला आहे, असे तो म्हणाला.

विशेषतः क्रिकेट किंवा इतर कोणताही खेळ खेळताना तुमची वृत्ती जितकी स्पर्धात्मक असते, तितके ते महत्त्वाचे ठरते, असे अय्यर म्हणाला.

आता मला ही भूमिका किंवा कर्णधारपदाची जबाबदारी मिळाली आहे, तेव्हा ते एकाच वेळी एक मोठे आव्हानही आहे, असेही तो म्हणाला.

**अय्यरने कामगिरीच्या बळावर कर्णधारपद मिळविले : गांगुली**

दरम्यान, भारताचे माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी म्हटले आहे की, अय्यरने राष्ट्रीय संघाचे कर्णधारपद आपल्या कामगिरीच्या जोरावर मिळविले आहे.

कर्णधार म्हणून आपल्या पहिल्या कामगिरीत आयर्लण्डविरुद्ध दोन टी-२० सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज असलेल्या अय्यरने, संघातून स्थान गमावण्यापूर्वी डिसेंबर २०२३ मध्ये आपला शेवटचा टी-२० सामना खेळला होता. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तैपेई सिटी ॲथ्लेटिक्समध्ये अनिमेश कुजूरला रौप्य

**तैपेई** : येथे सुरू असलेल्या न्यू तैपेई सिटी ॲथ्लेटिक्स स्पर्धेत रविवारी भारतीय धावपटू अनिमेश कुजूरने पुरुषांच्या २०० मीटर शर्यतीत रौप्यपदक पटकावले आणि आणि २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. कुजूरने ही शर्यत २०.४७ सेकंदात पूर्ण केली; ही वेळ त्याच्या २०.३२ सेकंदांच्या




राष्ट्रीय विक्रमापेक्षा काहीशी जास्त असली, तरीही ही त्याची या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ठरली. तसेच, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी आवश्यक असलेली पात्रतेची अट (२०.६१ सेकंद) पूर्ण करण्यासाठी ही वेळ पुरेशी ठरली. तो थायलंडच्या पुरीपोल बूनसनच्या मागे राहिला. पुरीपोलने २०.०३ सेकंदांची वेळ नोंदवत सहजपणे पहिले स्थान मिळवले. लांब उडीपटू शैली सिंग आणि महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिले संघाने प्रत्येकी सुवर्णपदक जिंकले, तर तेजस शिर्से याने ११० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत रौप्यपदक मिळविले.

### स्नायूंच्या थकव्यामुळे मेस्सीची माघार

**टेक्सास** : आगामी विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर, स्नायूंचा थकवा आणि डाव्या पायाच्या सौम्य ताण यांमुळे लिओनेल मेस्सी होंडुरास विरुद्धच्या मैत्रीपूर्ण सामन्याला मुकला. तीन आठवड्यांत ३९ वर्षांचा होणारा मेस्सी सामन्यापूर्वी टेक्सास ए अँड एम कॅम्पसमधील काइल फील्डवर सहकाऱ्यांसोबत वॉर्म-अप करताना दिसला होता. मात्र, सामना सुरू असताना तो बाकावरच बसून राहिला व बाहेरूनच त्याने अर्जेंटिनाचा २-० असा विजय पाहिला. मेस्सीच्या बरे होण्याचा कालावधी हा त्याच्या 'वैद्यकीय आणि शारीरिक कार्यक्षमतेतील प्रगतीवर' अवलंबून असेल, असे संघाने म्हटले आहे. कॅन्सस सिटीमध्ये पुन्हा सराव सुरू करण्यापूर्वी, अर्जेंटिनाचा पुढील सामना मंगळवारी ऑबर्न, अलाबामा येथे आइसलँडविरुद्ध होणार आहे; हा विश्वचषकापूर्वीचा त्यांचा अंतिम सराव सामना असेल. अर्जेंटिना आपल्या विश्वचषक विजेतेपदाच्या बचावासाठी १६ जून रोजी ॲरोहेड स्टेडियमवर अल्जेरियाविरुद्धच्या सामन्याने मोहिमेची सुरुवात करेल.

### स्विस चॅलेंज गोल्फमध्ये वीर अहलावतचा संघर्ष

**ल्यूसर्न** : स्वित्झर्लंडच्या गोल्फ सेम्पॅक येथे सुरू असलेल्या स्विस चॅलेंज स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत कोर्स रेकॉर्ड प्रस्थापित केल्यानंतर वीर अहलावतला तीच लय कायम राखता आली नाही, तिसऱ्या फेरीनंतर तो १२ स्थानांनी घसरून संयुक्त १३ व्या क्रमांकावर आला. अहलावतने तिसऱ्या फेरीत ३-ओव्हर ७४ असा स्कोअर नोंदवला, ज्यामुळे तीन फेऱ्यांनंतर त्याची एकूण धावसंख्या ९-ओव्हर पार अशी राहिली. तो आघाडीवरील खेळाडू जॉर्ज ब्लूर (६७) याच्यापेक्षा सहा शॉट्सने मागे होता. अहलावतने तिसऱ्या फेरीची सुरुवात पहिल्या आणि चौथ्या होलवर बर्डीज मिळवून चांगली केली, मात्र पाचव्या होलवर त्याने एक शॉट गमावला. सहाव्या होलवर त्याने गमावलेला शॉट भरून काढला, पण सातव्या होलवर दिवसातील पहिली डबल बोगी करत दोन शॉट्स गमावले. त्यानंतर आठव्या होलवर त्याने दुसरी बोगी केली. हॉटेल प्लॅनर टूरवर अद्याप कोणतेही विजेतेपद न मिळवलेल्या अहलावतला या आठवड्यात विजेतेपदासाठी आव्हान द्यायचे असेल, तर त्याला दुसऱ्या फेरीतील आपली जादू पुन्हा एकदा दाखवावी लागेल.

### आर्केया लेडीज ओपनमध्ये नयनिका सांगा आघाडीवर

**माँटोबन** : एलईटी ॲक्सेस सिरीज अंतर्गत सुरू असलेल्या आर्केया माँटोबन लेडीज ओपन स्पर्धेत, सलग दुसऱ्यांदा इव्हन-पार फेरी खेळून नयनिका सांगा आघाडीची भारतीय गोल्फर ठरली आहे.



गोल्फ द माँटोबन येथे संयुक्त २१ व्या स्थानावरून दिवसाची सुरुवात करणाऱ्या नयनिकाने, स्पर्धेची एक फेरी शिल्लक असतानाच अव्वल २० खेळाडूंमध्ये स्थान मिळवले. आता ती इव्हन-पार स्कोअरसह संयुक्त १८ व्या स्थानावर आहे. सान्वी सोमू (७२-७३) ही या स्पर्धेतील दुसरी भारतीय खेळाडू आहे. दुसऱ्या फेरीत ७३ (१-ओव्हर) गुणांची नोंद केल्यामुळे ती सहा स्थानांनी खाली घसरली आणि आता संयुक्त २७ व्या स्थानावर आहे. अंतिम फेरीपूर्वी जेनेव्हीव्ह लिंग, सारा स्कोव्हगार्ड बिल्स, मरीन ग्रिफॉट आणि लुसी मालचिरांड या खेळाडूंनी ६-ओव्हर पार स्कोअरसह संयुक्त आघाडी घेतली आहे. नयनिका सांगाला दुसऱ्या फेरीतील दुसऱ्याच होलवर सुरुवातीला बोगीचा सामना करावा लागला, मात्र सातव्या होलवर बर्डी मिळवून तिने ती कसर भरून काढली.

# इंग्लंडचा न्यूझीलंडवर चार दिवसांत विजय

### पहिल्या कसोटीत वेगवान गोलंदाजांचा दबदबा



सामनावीर ऑली रॉबिन्सन

**लंडन, ७ जून**

रविवारी लॉर्ड्सच्या उसळी व चेंडूला बळण मिळणाऱ्या खेळपट्टीचा पुरेपूर फायदा घेत इंग्लंडने न्यूझीलंडविरुद्धची पहिली कसोटी लढत चार दिवसांतच जिंकली. पावसाचा व्यत्यय आलेल्या या पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडचा ११५ धावांनी पराभव केला; हा सामना संपायला अजून एक दिवस आणि दोन सत्रे शिल्लक होती.

तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकण्यासाठी न्यूझीलंडसमोर २५४ धावांचे कठीण आव्हान होते. जागतिक क्रिकेटचे माहेरघर असलेल्या लॉर्ड्सवर खेळल्या जाणाऱ्या या १५० व्या कसोटी सामन्यात, चौथ्या दिवशी ५५ धावांत ५ बाद अशा स्थितीतून खेळ सुरू केल्यानंतर, न्यूझीलंडचा संपूर्ण संघ १३८ धावांत गारद झाला.

पहिल्या डावांत ३९ धावांत ५ बळी व दुसऱ्या डावांत ३८ धावांत २ बळी टिपणारा तसेच २९ धावा काढणारा इंग्लंडचा ऑली रॉबिन्सन सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

विजयाचे लक्ष्य गाठून देण्यासाठी न्यूझीलंडच्या डेव्हॉन कॉनवे (४१), ग्लेन फिलिप्स ( नाबाद ४४) आणि केन विल्यम्सनने (१८) आटोकाट प्रयत्न केले, परंतु उर्वरित फलंदाज इंग्लंडच्या प्रभावी गोलंदाजीसमोर टिकाव धरू शकले नाहीत. गस अटकिन्सनने ३० धावांत ५ बळी टिपलेत. ऑली रॉबिन्सन व जोश टोंगने प्रत्येकी २ बळी, तर बेन स्टोक्सने एक बळी मिळविला. (वृत्तसंस्था)

# भारताचा सहा सदस्यीय गोल्फ संघ घोषित

### आशियाई क्रीडा स्पर्धा





आदिती अशोक युवराज संधू

**नवी दिल्ली, ७ जून**

या वर्षाच्या उत्तरार्धात जपानमधील आइची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी, रविवारी जाहीर करण्यात आलेल्या सहा सदस्यीय भारतीय गोल्फ संघात युवराज संधू आणि अदिती अशोक यांचा समावेश आहे.

एलपीजीए टूरवरील नियमित खेळाडू असलेल्या अदितीने चीनमधील हॅण्गझोऊ येथे २०२२ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक रौप्यपदक जिंकले होते.

इंडियन गोल्फ युनियनने जाहीर केलेल्या संघात युवराज संधू (जागतिक क्रमवारी ४५१), वीर अहलावत (जागतिक क्रमवारी ५५८) आणि सप्तक तलवार (जागतिक क्रमवारी ५७६) हे तीन पुरुष खेळाडू, तर अदिती अशोक (जागतिक क्रमवारी १३५), दीक्षा डागर (जागतिक क्रमवारी २२१) आणि प्रणवी उर्स (जागतिक क्रमवारी २७०) या तीन महिला खेळाडूंचा समावेश आहे.

पुरुष आणि महिलांच्या गोल्फ स्पर्धा ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर या कालावधीत कासुगाई कंट्री क्लबच्या ईस्ट कोर्सवर होणार आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या निवडीच्या धोरणानुसार या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे, असे भारतीय गोल्फ संघटनचे प्रमुख ब्रिजिनदर सिंग यांनी सांगितले.

आम्हाला अत्यंत प्रतिभावान आणि सक्षम संघ मिळाला आहे. यात युवराज संधूसारख्या खेळाडूचा समावेश आहे, संधूने गत वर्षी पीजीटीआय सर्किटवर सात वेळा विजय मिळवला होता. तसेच अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांच्यासारख्या खेळाडू आहेत, तिने लेडीज युरोपियन टूरवर अनेकदा विजय मिळविले आहेत. खेळाडूंची निवड पूर्णपणे जागतिक क्रमवारीच्या आधारे करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले.

आशियाई खेळांमधील गोल्फ प्रकारात भारताचा इतिहास गौरवशाली राहिला असून, भारताने आतापर्यंत तीन सुवर्ण आणि तीन रौप्य पदके जिंकली आहेत.

नवी दिल्ली येथे १९८२ मध्ये झालेल्या आशियाई खेळांमध्ये लक्ष्मण सिंग, ऋषी नारायण, अमित लुथरा आणि राजीव मोहता या चौघांच्या भारतीय संघाने सांघिक सुवर्णपदक जिंकले होते. लक्ष्मण सिंगने वैयक्तिक सुवर्णपदकही पटकावले होते.

शिव कपूरने २००२ च्या बुसान आशियाई खेळांमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले होते. २००६ च्या दोहा आशियाई खेळांमध्ये अनिर्बान लाहिरी, गगनजीत भुल्लर आणि जोसेफ चाकोला यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने रौप्य पदक जिंकले होते. २०१० च्या ग्वांगझू आशियाई क्रीडा स्पर्धेत, रशीद खान, राहुल बजाज, अभिनव लोहान आणि अभिजीत सिंग चड्ढा यांच्या भारतीय संघाने रौप्य पदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# सिनियाकोव्हा, टाऊनसेंड जोडीने महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले

### फ्रेंच ओपन



महिला दुहेरीच्या चषकासह सिनियाकोव्हा व टाऊनसेंड टेलर

**पॅरिस, ७ जून**

अव्वल मानांकित कॅटेरिना सिनियाकोव्हा आणि टेलर टाऊनसेंड या महिला जोडीने रविवारी झालेल्या दुहेरीच्या अंतिम सामन्यात दुसऱ्या मानांकित ॲना डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिक या जोडीचा ६-२, ७-५ असा पराभव करून एकत्रितपणे आपला पहिला फ्रेंच ओपन विजय साकारला.

दुसऱ्या सेटमध्ये सुरुवातीला काहीशा अडथळ्यानंतर झेक प्रजासत्ताकच्या सिनियाकोव्हाचे अनेक रिटर्न्स जाळीत अडकले होते, मात्र त्यानंतर या अव्वल मानांकित जोडीने सावरत मुसंडी मारली. अमेरिकन टाऊनसेंडच्या अचूक विनर्समुळे त्या सामन्यात परतल्या आणि त्यानंतर सिनियाकोव्हाच्या दमदार सर्व्हिसच्या जोरावर त्यांनी जोडी म्हणून आपले तिसरे ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद निश्चित केले.

३० वर्षीय सिनियाकोव्हाने आतापर्यंत महिला दुहेरीत ११ ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदे जिंकली आहेत, यात रोलँड गॅरोसवरील चार विजेतेपदांचा समावेश आहे. जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनची अंतिम फेरी गमावल्यानंतर, कझाकस्तानची डॅनिलिना आणि सर्बियाची क्रुनिक यांना आता सलग दुसऱ्यांदा फ्रेंच ओपनची अंतिम फेरी गमवावी लागली आहे. (वृत्तसंस्था)

# सूरज, हिमांशू, दीक्षाची सुवर्णपदकावर मोहर

### राष्ट्रीय नेमबाजी चाचणी




लक्ष्य साधताना सूरज शर्मा

**डेहराडून, ७ जून**

रविवारी येथे रायफल आणि पिस्तूल नेमबाजांसाठी आयोजित टी-४ राष्ट्रीय नेमबाजी निवड चाचणी स्पर्धेत पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत हरयाणाच्या हिमांशू ढिल्लनने महाराष्ट्राच्या पार्थ राकेश मानेवर शेवटच्या शॉटवर रोमांचक विजय मिळविला. मध्य प्रदेशच्या सूरज शर्माने पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल प्रकारात २९ गुणांसह अव्वल स्थान मिळवून सुवर्णपदक पटकावले. उत्तराखंडचा अंकुर गोयल २७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला, तर भावेश शेखावत २५ हिट्ससह तिसऱ्या स्थानावर राहिला.

अंतिम फेरीतील २४ व्या आणि शेवटच्या शॉटपूर्वी हिमांशू हा पार्थपेक्षा ०.२ गुणांनी मागे होता; मात्र शेवटच्या शॉटमध्ये हिमांशूने १०.६ गुण मिळविले, तर पार्थला १०.३ गुण मिळाले. यामुळे हिमांशूने अत्यंत कमी फरकाने विजय निश्चित केला. हिमांशूने एकूण २५२.२ गुणांसह स्पर्धा पूर्ण केली. दिल्लीच्या पार्थ मखीजाला कांस्यपदक मिळाले. महिलांच्या एअर रायफल प्रकारात, उत्तर प्रदेशच्या दीक्षा वैश्यने दमदार सुरुवात केली. पाच शॉट्सच्या दुसऱ्या फेरीत तिने आघाडी घेतली आणि प्रतिस्पर्ध्यांचे तगडे आव्हान असूनही तिने आपली पकड कायम राखली. तिने २५२.७ गुणांसह स्पर्धा पूर्ण करत आशी चौकसेवर १.२ गुणांनी मात केली. रेल्वेच्या सोनम उत्तम मस्करने कांस्यपदक पटकावले. (वृत्तसंस्था)

# कार्लसेनपेक्षा प्रज्ञानंद अधिक धोकादायक : प्रवीण ठिपसे

**नवी दिल्ली, ७ जून**

प्रतिष्ठित नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू, रमेशबाबू प्रज्ञानंद हा जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या मॅग्नस कार्लसेनपेक्षाही अधिक धोकादायक खेळाडू आणि जगातील सर्वाधिक प्रगती करणारा बुद्धिबळपटू आहे, असे मत अर्जुन पुरस्कार विजेते ग्रॅण्डमास्टर प्रवीण ठिपसे यांनी व्यक्त केले.

नॉर्वे चेसमधील प्रज्ञानंदच्या ऐतिहासिक विजयामुळे जागतिक स्तरावरील अव्वल खेळाडूंमध्ये त्याचे स्थान अधिक बळकट झाले आहे. ठिपसे यांच्या मते, सध्याचा जागतिक विजेता डी. गुकेश आणि अर्जुन एरिगासी यांच्या तुलनेत प्रज्ञानंद हा भारताचा सर्वात शक्तिशाली खेळाडू आहे. प्रज्ञानंद हा सध्याचा सर्वोत्तम भारतीय बुद्धिबळपटू आहे. त्याच्या सध्याच्या कामगिरीचा विचार करता, त्याला जगातील सर्वात धोकादायक प्रतिस्पर्ध्यांपैकी एक मानले जाऊ शकते; तो कार्लसेनपेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकतो, असे ठिपसे यांनी सांगितले. त्यांनी नॉर्वेजियन दिग्गज खेळाडूविरुद्धच्या प्रज्ञानंदच्या प्रभावी कामगिरीकडे लक्ष वेधले आणि नमूद केले की, अलीकडच्या काळात फार कमी खेळाडूंना कार्लसेनविरुद्ध असे यश मिळाले आहे. (वृत्तसंस्था)

# कठोर परिश्रम, चिकाटी हीच यशाची गुरुकिल्ली

### प्रज्ञानंदची आई नागलक्ष्मी यांचे प्रतिपादन




**ओस्लो, ७ जून**

खेळ आणि शिक्षण यांसारख्या कोणत्याही क्षेत्रात कठोर परिश्रम, चिकाटी आणि प्रक्रियेचा आनंद घेणे या गोष्टी यशासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या विजयामुळे जागतिक स्तरावरील अव्वल खेळाडूंमध्ये रमेशबाबू प्रज्ञानंदचे स्थान अधिक दृढ झाले आहे, असे नॉर्वे बुद्धिबळ २०२६ स्पर्धेतील ऐतिहासिक विजयानंतर, भारतीय ग्रॅण्डमास्टर प्रज्ञानंद याची आई नागलक्ष्मी यांनी रविवारी सांगितले.

प्रवीण थिपसे यांनी तर आर. प्रज्ञानंदला विद्यमान जागतिक विजेता डी. गुकेश आणि अर्जुन एरिगासी यांच्याही पुढे जाऊन, सध्याचा भारताचा सर्वात तगडा खेळाडू असल्याचे म्हटले आहे.

केवळ निकालांवर अति-लक्ष केंद्रित केल्यामुळे खेळासाठी घेतलेल्या मेहनतीचे महत्त्व कमी होऊ नये. जर एखाद्याने प्रक्रियेचा आनंद घेतला आणि अपयश येऊनही कठोर परिश्रम करणे सुरू ठेवले, तर यश नक्कीच मिळते, असे नागलक्ष्मी म्हणाल्या.

प्रज्ञानंदचे प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी बुद्धिबळाशी संबंधित तांत्रिक बाबी सांभाळतात, तर घरी त्याला आधार देणे ही आपली भूमिका आहे, असेही त्या म्हणाल्या.

**विश्वनाथन् आनंदचा भावंडांवर प्रभाव**

प्रज्ञानंद व वैशाली यांच्या प्रवासावर भाष्य करताना, त्यांनी पाच वेळा जागतिक विजेतेपद पटकावणाऱ्या विश्वनाथन् आनंद यांच्या महत्त्वपूर्ण प्रभावाचा उल्लेख केला. प्रज्ञानंद जेव्हा वेलम्मल स्कूलमध्ये इयत्ता पहिलीत होता, तेव्हा त्याची आनंद यांच्याशी भेट झाली होती आणि ते आजही त्याची सर्वात मोठी प्रेरणास्थान आहेत.वैशाली सध्या आनंद यांच्या अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे, असे त्यांनी सांगितले.

१५ दिवसांची बुद्धिबळ स्पर्धा जिंकल्यानंतर प्रज्ञानंदचे तात्काळ लक्ष इंटरनॅशनल चेस फेडरेशनच्या मानांकनामध्ये (रँकिंगमध्ये) आपली लाइव्ह रेटिंग सातत्याने सुधारण्यावर आहे. प्रज्ञानंदची बहीण ग्रॅण्डमास्टर आर. वैशाली, सध्या जपानमध्ये सुरू असलेल्या महिला बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होत आहे. जागतिक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी स्पर्धा करण्याच्या दृष्टीने पुढील सहा महिन्यांत तयारी करणे हे तिचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, असेही त्यांनी नमूद केले. नागलक्ष्मी यांनी या दोघांमधील भावंडांमधील स्पर्धेची (किंवा वैमनस्याची) कोणतीही शक्यता फेटाळून लावली; त्या म्हणाल्या की, ते एकमेकांविरुद्ध स्पर्धा करत नाहीत आणि जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये एकमेकांना पूर्ण पाठिंबा देतात. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...




### रोटरी क्लबतर्फे सहारा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी साहित्य पेट्यांचे वाटप

**बार्शी, दि. ७ जून-**

रोटरी क्लब धाराशिवच्यावतीने उपळे दु. येथील सहारा वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी साहित्य ठेवण्यासाठी लोखंडी पेट्यांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत रोटरी क्लबने नेहमीप्रमाणे यावेळीही सेवाभावी उपक्रम राबविला. सहारा वृद्धाश्रमाच्या आवारात झालेल्या कार्यक्रमास वृद्धाश्रमातील आजी-आजोबा मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोटरी क्लब धाराशिवचे अध्यक्ष रणजित रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली व सचिव प्रदीप खामकर यांच्या नियोजनाने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी बोलताना अध्यक्ष रणजित रणदिवे यांनी सांगितले की, समाजातील ज्येष्ठ नागरिकांची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहे. रोटरी क्लब धाराशिव नेहमीच अशा उपक्रमांसाठी पुढाकार घेत असतो. सचिव प्रदीप खामकर यांनीही वृद्धांच्या सेवेसाठी रोटरी क्लब नेहमी तत्पर असल्याचे सांगितले. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांनी रोटरी क्लबच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आणि आभार मानले.




### संत नामदेव शिंपी समाजातर्फे भाविकांना महाप्रसाद वाटप

**पंढरपूर, दि. ७ जून-**

येथील श्रीसंत नामदेव शिंपी समाजाच्या वतीने पंढरीत आलेल्या भाविकांना खिचडी व जिलेबी या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अधिक महिन्याचे औचित्य साधून समाज वर्गणीतून राबविण्यात आलेल्या या महाप्रसादाचे वाटप चौफाळा येथे करण्यात आले. प्रारंभी संत नामदेव महाराजांचेविद्यमान वंशज हभप केशव महाराज नामदास यांच्या हस्ते विठ्ठल व संत नामदेव महाराजांच्या प्रतिमांचे पूजन करून महानैवेद्य दाखविण्यात आला. यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले. यावेळी पंढरपूर मर्चन्ट बँकेचे संचालक आदित्य फतेपुरकर, अभयसिंह कुलकर्णी-इचगावकर, पंढरपूर शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे, उपाध्यक्ष संजय जवंजाळ, सचिव विलासपोरे, विश्वस्त राजेश धोकटे, संजय चांडोले, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर भावलेकर गुरुजी, दत्तप्रसाद निपाणकर, उध्दव लटके, जयवंत कांबळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद लटके, वाघेश म्हैंदरकर, सुनिल भावलेकर, शिवकुमार भावलेकर, प्रकाश मेटकर, प्रसाद निकते, पांडुरंग गणबोटे, शशिकांत बुरांडे, आकाश जवंजाळ, दत्ता चांडोले, सचिन बुरांडे, प्रशांत काकडे, आप्पा बंगाळे, अनिल घट, निलेश धोकटे, सतीश निपाणकर, अनिकेत उंडाळे, संजय निपाणकर, संकेत उंडाळे, विष्णू पोरे, राजू म्हैंदरकर, नितीन जवंजाळ, अॅड. विनायक उंडाळे, देवीदास बोधे, समर्थ जवंजाळ, संजय उंडाळे, गौरव बंगाळे, पुकाळे (खर्डी), माऊली निकते, रत्नाकर पिसे, राजू नायकू, अमोल राऊत, सचिन लटके, रामचंद्र गुरव, बालाजी गुरव, अभिनव व्हटकर यांनी परिश्रम घेतले.

### टायर फुटल्याने ट्रक अपघात; ड्रायव्हर जखमी

**सोलापूर, दि. ७ जून-**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील केगाव येथील विद्यापीठ जवळ अचानक टायर फुटून ट्रक डिव्हायडरला धडकल्याने सुरेश कुमार (वय ४० रा.हमीरपुर, उत्तर प्रदेश ) हा ड्रायव्हर गंभीर जखमी झाला. हा अपघात शनिवारी सकाळी ९ वाजता घडला. तो आपला ट्रक घेऊन पुणे ते सोलापूरच्या दिशेने निघाला होता. विद्यापीठजवळ अचानक टायर फुटल्याने हा अपघात घडला. त्याला अॅम्बुलन्स मधून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# वळसंग परिसरात वादळी पावसामुळे केळीच्या बागा जमीनदोस्त



### हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग दि. ७ जून :**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग आणि चिंचोळी परिसरात शनिवारी झालेल्या अवकाळी म सळधार पाऊस आणि तीव्र वादळी वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. शेतकरी रमेश चिंचोळी व काशिनाथ म णकोजी यांच्या हातातोंडाशी आलेली केळीची बाग वादळामुळे पूर्णपणे उपटून पडली आहे. त्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

शेतकरी माणकोजी यांनी कर्ज काढून आणि रात्रंदिवस मेहनत करून केळीची बाग जोपासली होती. बहुतांश झाडांना मोठे घड आले होते. काही दिवसांतच काढणी सुरू होणार होती. मात्र, काल सायंकाळी झालेल्या वादळी पावसामुळे केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली. काही झाडे मधोमध तुटली आहेत. संपूर्ण घड मातीत लोळत असून लागवडीचा खर्चही निघणे अशक्य झाले आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकरी माणकोजी व चिंचोळी यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

**प्रशासकीय दिरंगाई; पंचनाम्याची प्रतीक्षा**

घटना घडून २४ तास उलटत आले तरी अद्याप कृषि किंवा महसूल विभागाकडून या भागाची पाहणी झालेली नाही. वळसंग परिसरातील तलाठी समाधान काळे, मंडळ अधिकारी संतोष प लारी आणि तहसीलदार किरण जम दाडे यांनी या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ बांधावर येऊन नुकसानीचे पंचनामे करावेत, तरच शेतकऱ्याला पीक विमा आणि शासकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

**शेतकऱ्यांची आर्त हाक**

बँकेचे कर्ज आणि उधारी घेऊन केळीची बाग उभी केली होती. डोळ्यांदेखत सर्व कष्ट मातीमोल झाले. आता कर्ज कसे फेडायचे आणि कुटुंब कसे चालवायचे, हाच मोठा प्रश्न आहे. तहसीलदार किरण जमदाडे यांनी तात्काळ पंचनाम्याचे आदेश देऊन आम्हाला आर्थिक मदत मि ळवून द्यावी, अशी प्रतिक्रिया डोळ्यात पाणी आणून पीडित शेतकरी माणकोजी व चिंचोळी यांनी दिली आहे.

# शेटफळच्या लेझीम संघाचा शिवराज्याभिषेक सोहळ्यात सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ७ जून-**

दुर्गराज रायगडावर झालेल्या ३५२व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात शेटफळ (ता. करमाळा) येथील नागनाथ लेझीम संघाने सहभागी होऊन उत्कृष्ट लेझीम सादरीकरण केल्याबद्दल या लेझीम संघाला सन्मानचिन्ह देऊन युवराज संभाजी छत्रपती महाराज व महाराणी संयोगीताराजे महाराज यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील प्राचीन कला संस्कृती जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या विविध लोक कलावंत कलाकार शाहीर गोंधळी वासुदेव आपापली कला सादर करतात शेटफळ येथील नागनाथ लेझीम संघाने प्राचीन लेझीम कला जतन केले असून पारंपारिक हलगीच्या ठेक्यावर होत असलेल्या या लेझीम कलेचे सर्वत्र कौतुक केले जाते. सोलापूर जिल्ह्यातील शेटफळ (ता. करमाळा) येथील तरुणांनी प्राचीन लेझीम परंपरा जोपासलेले आहे गावातील २०० सदस्य असलेला हा लेझीम संघ रायगड शिवराज्याभिषेक सोहळ्याला जाण्यापूर्वी पंधरा ते वीस दिवस दररोज संध्याकाळी सराव करून या सोहळ्याला जाण्यासाठी तयारी करत असतात यावर्षीही १२५ जणांनी शिवराज्याभिषेक सोहळ्यात लेझीम सादरीकरणात सहभाग नोंदविला राज्याभिषेक सोहळ्यानंतर होळीच्या माळावर युवराज संभाजी राजे व प्रमुख म ान्यवरांसमोर भर पावसात लेझीम संघाने उत्कृष्ट सादरीकरण केले या सादरीकरण बदल या संघाला गौरवण्यात आले आहे. राज्याभिषेक सोहळ्यासाठी गेलेल्या शेटफळ येथील लेझीम पथकातील तरुणांनी केवळ लेझीमचे सादरीकरण केले नाही तर या ठिकाणी दोन दिवस स्वयंसेवक म्हणून किल्ल्यावर येणाऱ्या शिवभक्तांची गर्दी नियंत्रणाचे स्वयंसेवक म्हणून काम पाहिले तर येताना गडावर कार्यक्रमाच्या वेळी झालेला कचरा प्लॅस्टिक याची स्वच्छता केली. संघाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# मध्य रेल्वे परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूट उपांत्य फेरीत

### रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : इम्रान हक सामनावीर




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

रेल्वेच्या ७९ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत रविवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात 'सेंट्रल रेल्वे परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूट' संघाने 'श्री स्वामी समर्थ अक्कलकोट क्लब'वर मात करत उपांत्य फेरी गाठली.

श्री स्वामी समर्थ अक्कलकोट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूटच्या शिस्तबद्ध आणि भेदकगोलंदाजीसमोर अक्कलकोटचा डाव पत्त्यासारखा कोसळला. संपूर्ण संघ केवळ ६८ धावांवर तंबूत परतला. अक्कलकोटकडून संकेत गायकवाडने सर्वाधिक १६, विठ्ठल गुंडेने ११ तर अविनाश फटाटेने ७ धावा केल्या. परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूटच्या इम्रान हक याने अवघ्या ४ षटकांत केवळ ७ धावा देत ४ महत्त्वाचे बळी टिपले. त्याला मन्मद हाशिम (२-०), आर्यन देशमुख (२-७) आणि कासिम मलिक (२-१६) यांनी सुरेख साथ दिली.

६९ धावांचे सोपे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूट संघाने ८ व्या षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात ७० धावा करत विजयश्री खेचून आणली. सुरज कुरमेने ३४ धावांची धडाकेबाज नाबाद खेळी केली, तर आर्यन देशमुखने २७ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. अक्कलकोट क्लबकडून गोलंदाजीत अविनाश फटाटेने १ षटकात अवघ्या १ धावेच्या मोबदल्यात २ बळी घेतले, तर जफर आतारला १ बळी मिळाला. उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन करणाऱ्या इम्रान हक याला 'सामनावीर' पुरस्कार अतुल बांदेवाडीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विक्रांत पवार, नवीन माने आणि रामबसू माळव उपस्थित होते.

कै. सुरेश मालप यांच्या स्मरणार्थ सुदेश मालप व सुनील मालप यांनी ही आकर्षक ट्रॉफी पुरस्कृत केली आहे. सामन्याचे पंच म्हणून सोहेल शेख आणि प्रवीण कुलकर्णी यांनी काम पाहिले, तर गुणलेखन सचिन गायकवाड यांनी केले.

**आजचे उपांत्य फेरीचे सामने**

**सकाळी** : साउथ सोलापूर आपटे ब्लू विरुद्ध मॉडेल क्रिकेट अॅकॅडमी **दुपारी**: मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूट विरुद्ध परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूट


सत्यजित जाधव


रोहित जाधव


स्नेहल जाधव

# सोलापूरचे ३ जाधव 'एमसीए'च्या समित्यांमध्ये

### स्नेहलसह रोहित व सत्यजित यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

येथील माजी रणजीपटू रोहित जाधव, माजी महिला खेळाडू स्नेहल जाधव तसेच माजी खेळाडू सत्यजित जाधव या तिघांची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन च्या २०२६-२७ या वर्षासाठी अनुक्रमे रणजी निवड समिती सदस्य, वरिष्ठ महिला निवड समिती प्रमुख आणि २३ वर्षाखालील मुलींच्या संघाच्या क्षेत्ररक्षण प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रोहित व स्नेहल हे गेली ४ वर्षे सदर समितीपदी यशस्वी रित्या काम पाहत आले असून सत्यजीत हे मागील वर्षीपासून प्रशिक्षक आहेत. रोहित हे यापूर्वी महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाच्या निवड समिती मध्ये प्रमुख म्हणून देखील होते.

या तिघांच्या खेळाडू म्हणून त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि खेळाडू घडविणे, निवडीच्या प्रकियेत असलेल्या योग्यतेचा अनुभवाच्या जोरावर पुन्हा एकदा समितीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांच्या या निवडी बदल सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन-रणजीतसिंह मोहिते पाटील, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख, सचिव धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेंबर्सू आणि खजिनदार संतोष बडवे व कार्यकारणी सभासदांनी शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले.

# कुत्रे मागे लागल्याने दुचाकीवरून पडून वृद्ध महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

कुत्रे मागे लागल्याने दुचाकी वर मागे बसलेल्या महिलेचा खाली पडून मृत्यू झाला. शिलाबाई मनोहर मुळे (वय ६५ वर्ष, राहणार तुगाव , उम रगा ,जी धाराशिव ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे. त्या शनिवारी दुपारी येणेगुर येथून दुचाकी वर मागे बसून घराकडे निघाल्या असताना वाटेत तूगाव पाटी जवळ काही कुत्रे त्यांच्या दुचाकीच्या पाठीमागे लागले. त्यामुळे त्या घाबरून खाली पडल्या. यात डोक्याला, कानाला, नाकाला मार लागून त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उमरगा एका खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा ब्रह्मानंद याने सायंकाळी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्यांचा तासभरातच मृत्यू झाला.

# जगताप यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ७ जुन**


महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मिडीया सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्ष पत्रकार राजेश जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील विविध सामाजिक संघटना संस्था, श्री वटवृक्षस्वामी महाराज देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष महेश इंगळे, पत्रकार संघटना यांच्या वतीने राजेश जगताप यांचा व पत्रकार विश्वनाथ चव्हाण यांचा भारतीय लहुजी सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार रमेश भंडारी, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघटना तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, लहुजी सेना अध्यक्ष अनिल झंपले, क्षीरसागर, सोहेल फरास आदी उपस्थित होते .

# सरसकट कर्जमाफीसाठी आ. रोहित पवार करणार पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ जून-**

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना दोन लाख रुपयापर्यंत कर्जमाफी केली आहे. मात्र हीकर्जमाफी लागू करण्यासाठी जाचक नियम व अटी घातल्या आहेत. यामुळे यातून अनेक शेतकऱ्यांनावगळण्यात येणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने सरसकट म्हणजे सर्व शेतकऱ्यांना या योजनेचा द्यावा यामागणीसाठी आमदार रोहित पवार १२ जूनपासून पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन करणारआहेत.






पंढरपूरचा विठ्ठल हा शेतकरी तसेच कष्टकरी, दिनदुबळ्या समाजातील लोकांचे दैवत आहे. त्यामुळेच शेतकरी, कष्टकरी सम ाजातीललोकांच्या मागण्यासाठी राज्यातील कोणतेही आंदोलन श्रीविठ्ठलाचे दर्शन घेऊन पंढरपुरातून सुरू करण्याचीपूर्वापार प्रथा आहे. त्यामुळेच आज पर्यंत येथून जी जी आंदोलने केली गेली त्या सर्वआंदोलनाला यश आल्याचे दिसून येत आहे. दरम्यान स्वाभिमानी शेतकरी संघटनेने या अगोदरही सर्व आंदोलने पंढरपुरातून सुरू केली होती. यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला चांगले यशमिळाले असल्याचे दिसून आले होते. विठ्ठल हा सर्वसामान्य शेतकऱ्यांचा देव आहे. यामुळे विठ्ठलाच्यादर्शनाला शेतकरी येतात म्हणून शेतकऱ्यांच्या अडचणी विठ्ठलासमोर मांडून त्या सोडवूनघेण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथून अन्नत्याग आंदोलन १२ जून पासून सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटातील खासदार, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. आमदार रोहित पवार १२ जून रोजी पंढरपूरयेथे येणार असून विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर ते नगरप्रदक्षिणा करणार आहेत. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून येथील शिवतीर्थावर अन्नत्याग आंदोलन करण्यास सुरवात करणारआहेत. दरम्यान राज्य शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख रुपयापर्यंत कर्जमाफी करण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. मात्र ही कर्जमाफी करताना जाचक नियम व अटी घालण्यात आल्या आहेत.यामुळे याचा लाभ ५०% हून अधिक शेतकऱ्यांना मिळणारनाही. त्यामुळे सर्वचशेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, या मागणीसाठी आम दार रोहित पवार पंढरपुरातून अन्नत्याग आंदोलन करणार आहेत.

**पिकविमा योजना पुन्हा सुरु करावी**

सरसकट कर्जमाफी बरोबरच केंद्र व राज्य शासनाने बंद केलेली एक रुपया मध्ये मिळणारी पीकविमा ही योजना पुन्हा सुरु करण्यात यावी, अशी मागणी देखीलआमदार रोहित पवार हे अन्नत्याग आंदोलनाच्यानिमित्ताने लावून धरणार आहेत.

# स्वेरी कॉलेजमध्ये पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ जून-**

येथील स्वेरी कॉलेजऑफ इंजिनिअरिंगमध्ये जागतिक पर्यावरण दिना निमित्त वृक्षारोपण हा उपक्रम संपन्न झाला. यामध्ये विविध प्रकारच्या रोपट्यांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शुक्रवारी (दि.५ जून) स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी स्वेरी कॅम्पसमध्ये रोपट्यांची लागवड केली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इस्कॉन, कोल्हापूर येथील पुरुषोत्तम आनंददास महाराज तसेच केरले (जि. कोल्हापूर) मधील हनुमान हायस्कूलचे रणदिवे उपस्थित होते. या बरोबरच कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतीश मांडवे, प्रशासन अधिष्ठाता डॉ. रणजित गिड्डे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवलकर, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या डॉ. वनिता जाधव, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. संदीप वांगीकर आणि एमबीएच्या डॉ. मिनल भोरे, ग्रीन टीमचे समन्वयक प्रा. कुलदीप पुकाळे, प्रा. अमोल चौंडे उपस्थित होते.

**आठ हजार झाडांनी बहरला स्वेरी कॅम्पस**

स्वेरीचा संपूर्ण कॅम्पस हा ग्रीन कॅम्पस म्हणून ओळखला जातो. भारताचे ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी स्वेरीच्या प्रांगणात लावलेल्या झाडांचे आजही संगोपन केले जात आहे. स्वेरीत आजपर्यंत सुमारे आठ हजार झाडे लावण्यात आलेली आहेत.

## महत्वाचे...

### कारखान्यावरील पत्र्यावर काम करताना खाली पडल्याने कामगाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. ७ जून-**

कारखान्याच्या पत्र्यावर वेल्डिंगचे काम करीत असताना तोल जाऊन खाली पडल्याने एका ३१ वर्षीय तरुण कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील लेक एक्झीम या कारखान्यात ६ जून रोजी दुपारी चार वाजता घडली. प्रवीण हणमंत अंजनाळकर (वय ३१ वर्ष, रा.समरा नगर, बसवेश्वर चौक, एमआयडीसी, सोलापूर ) असे त्या मयत कामगाराचे नाव आहे . प्रवीण हा मागील अनेक वर्षापासून एमआयडीसी येथील लेक एक्झीम या कारखान्यात कामाला होता .नेहमीप्रमाणे शनिवारी ही तो कामावर आला होता . त्यानंतर दुपारी घरात जेवण करून तो कामावर आला होता .दुपारी चार वाजेच्या सुमारास तो कारखान्याच्या पंधरा ते वीस फुटावरील पत्र्यावर चढून काम करीत असताना अचानक जाऊन तो खाली पडला . यात डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो जागेवर बेशुद्ध होऊन पडला .त्याला त्वरित उपचारासाठी सोलापूर मार्कंडेय रुग्णालयात सायंकाळी पावणे पाच वाजता दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यानंतर सदरचा मृतदेह शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी दाखल करण्यात आला . दरम्यान घटनेची माहिती समजतात नातेवाईक व मित्रांनी शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. मयत प्रवीण याच्या मागे आई-वडील, पत्नी, दोन मुले आणि भाऊ असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली .



### कुत्रा आडवा आल्याने पती-पत्नी जखमी; विजापूर महामार्गावरील घटना

**सोलापूर, दि. ७ जून-**

अचानक कुत्रा आडवा आल्याने मोटार उलटून पती-पत्नी जखमी झाले. हा अपघात विजापूर महामार्गावरील एसआरपी कॅम्पजवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडला. निकिता गायकवाड (वय २३) आणि त्यांचे पती रोहित गायकवाड (वय २५) अशी जखमीची नावे आहेत. ते दोघे आपल्या मुलासह मोटारीतून विजापूर येथे निघाले होते. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास अचानक मोटारी समोर कुत्रा आडवा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात मोटार उलटल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### शेळीला कुत्रा चावल्याच्या कारणावरुन मारहाण

**सोलापूर, दि. ७ जून-**

शेळीला कुत्रा चावल्याच्या कारणावरून चाकू आणि दगडाने केलेल्या मारहाणीत हसीना जमादार (वय ४०) ही महिला जखमी झाली. ही घटना बिंजगेर (ता.अक्कलकोट) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. शेळीला कुत्रा चावल्याच्या कारणावरून कस्तुरी बंदीछोडे, यल्लाप्पा विराजदार आदींनी मारहाण केली. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### जांभळे तोडताना मधमाशाचा हल्ला; तरुण जखमी

**सोलापूर, दि. ७ जून-**

जांभळे तोडताना झाडावरील आगी मोहोळच्या मधमाश्याने हल्ला केल्याने एक तरुण जखमी झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथे आज रविवारी दुपारी दीड वाजता घडली. सुदर्शन अनिल मोरंडे ( वय २० वर्ष , रा. मुस्ती ) असे त्या तरुणाचे नाव आहे . तो आज रविवारी दुपारी मुस्ती येथील शेतामध्ये जांभळे तोडण्यासाठी झाडावर चढला होता . त्यावेळी बाजूला असलेल्या आगी मोहोळ अचानक उडाले आणि त्या माशा या तरुणाला चावल्या . त्यात सर्व अंगाला आग होत असल्याने त्याला गावामध्ये प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात चुलते अण्णाराव यांनी दुपारी तीन वाजता दाखल केले.

### आरोग्य विभागातील ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**सोलापूर दि. ७ जून-**

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, या प्रक्रियेमुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेचा नवा आदर्श निर्माण झाला आहे. राज्यातील ४,५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी तब्बल ४,१९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया यशस्वी ठरली आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पारदर्शक बदली व्यवस्थेच्या अपेक्षांना मूर्त स्वरूप मिळाले आहे. सेवा ज्येष्ठता, कर्मचाऱ्यांचा पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय कारणे आणि कौटुंबिक परिस्थिती यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचा विचार करून बदल्या करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रधान सचिव, सचिव-२ आणि आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) यांनी संपूर्ण प्रक्रियेचे काटेकोर नियोजन केले. प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वेळापत्रक तयार करण्यात आले. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, हरकतींचे तातडीने निवारण, प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण आणि राज्यस्तरीय निरीक्षकांची नियुक्ती यामुळे संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि वादमुक्त राहिली. या बदल्यांमध्ये परिचारिका संवर्गातील १,५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) संवर्गातील ८०८, कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९७, औषध निर्माण अधिकारी संवर्गातील १६० आणि प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गातील १४९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे कर्मचारी संघटनांनीही या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले आहे. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करत सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रशासनातील कार्यक्षम व्यवस्थापनाचा नवा मापदंड निर्माण केल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी सांगितले की, यंदाच्या बदली प्रक्रियेला कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य लाभले. त्यामुळे सर्वांच्या सहभागातून आणि नियोजनबद्ध पद्धतीने बदल्या पारदर्शकपणे पूर्ण करता आल्या.

# वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने काढले झोडपून

### करमाळ्यात पिकांचे प्रचंड नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ७ जून-**

काही दिवसांपासून असह्य उकाड्याने हैराण झालेल्या करमाळा शहर आणि परिसराला आज वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसाने अक्षरक्षः झोडपून काढले. दुपारच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि विजांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. पहिल्याच मोठ्या पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शहरासह ग्रामीण भागात मोठी पडझड झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

दुपारी दोन वाजेपर्यंत करमाळ्यात कडक ऊन पडले होते. मात्र, दुपारी तीनच्या सुमारास अचानक आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि संपूर्ण परिसरात अंधारून आले. काही वेळातच वादळी वारा सुरू झाला. त्यानंतर ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सुमारे तास-दीड तास चाललेल्या या जोरदार पावसामुळे शहरातील मुख्य रस्ते जलमय झाले होते. हवामान विभागाने पुढील दोन दिवस परिसरात अशाच प्रकारच्या पावसाची शक्यता वर्तवली असून, नागरिकांनी सतर्क राहावे आणि वादळाच्या वेळी झाडांखाली किंवा पक्क्या नसलेल्या शेडखाली आसरा घेऊ नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.





#### पत्रे उडाले; चिंता वाढली

हा पाऊस उष्णतेपासून सुटका करणारा ठरला असला, तरी अचानक आलेल्या या वादळाने शेतकऱ्यांची मात्र दाणादाण उडवली. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे शेतातील काढणीला आलेली पिके आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. वाऱ्यामुळे बहुतांश पिके भुईसपाट झाली आहेत. ग्रामीण भागात काही घरांचे आणि जनावरांच्या गोठ्यांचे पत्रे उडून गेल्याच्या घटना घडल्या आहेत.

#### विक्रेते, ग्राहकांची तारांबळ; पालिकेच्या कामाची पोलखोल

अचानक आलेल्या पावसामुळे रस्त्यावरील लहान विक्रेते आणि ग्राहकांची एकच तारांबळ उडाली. प्लास्टिक कापड आणि आडोशाचा शोध घेण्यासाठी नागरिकांची पळापळ सुरू होती. अचानक आलेल्या या पावसाने पालिकेच्या मान्सूनपूर्व नियोजनाचीही पोलखोल केली असून, शहरातील काही सखल भागांत गटारींचे पाणी रस्त्यावर आले होते.

#### झाडे उन्मळून पडली; वीज खंडित

वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, शहरातील काही भागांत झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. काही ठिकाणी जुनी झाडे उन्मळून पडली. रस्त्यांवर झाडे पडल्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. सुरक्षिततेचा उपाय म्हणून आणि काही ठिकाणी वीजवाहिन्यांवर झाडांच्या फांद्या पडल्यामुळे महावितरणकडून शहराचा वीज पुरवठा तातडीने खंडित करण्यात आला.

## भीमा नदी प्रदुषण : सोलापूरकरांना विषारी पाणी

### महापौर कोंड्याल यांच्याकडे अहवाल सुपुर्द



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

भीमा नदीतील वाढत्या प्रदूषणाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी तयार केलेला '८० पाणी अहवाल' सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याळ यांना सुपुर्द करण्यात आला. हा धक्कादायक अहवाल स्वीकारल्यानंतर महापौरांनी या गंभीर समस्येवर लवकरच एक विशेष बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले आहे. अहवालातील माहितीनुसार, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रक्रिया न केलेले ड्रेनेजचे सांडपाणी थेट मुळा-मुठा नदीद्वारे भीमा नदीत मिसळत आहे. तसेच, निरा नदीत कत्तलखाने, साखर कारखाने आणि अनेक गावांचे सांडपाणी सोडले जात आहे. याशिवाय, चाकण आणि कुरकुंभ एमआयडीसीमधील रासायनिक कारखान्यांचे विषारी पाणी कोणत्याही प्रक्रियेविना थेट भीमा नदीत सोडले जात असल्याचा खळबळजनक दावा अहवालात करण्यात आला आहे. हेच दूषित पाणी सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ४८ लाख नागरिक रोज पितात. या अत्यंत घाण व रासायनिक पाण्यामुळे गेल्या १६ वर्षांत जिल्ह्यातील ७.५० लाख ते ८ लाख लोकांना कर्करोगासारख्या (कॅन्सर) गंभीर आजाराने आपले प्राण गमवावे लागल्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.हा अहवाल देताना सामाजिक कार्यकर्ते यशवंत पाथरूट, सागर अतनुरे, पर्यावरण संरक्षण गतीविधीचे (पश्चिम महाराष्ट्र) प्रांत मंडळ सदस्य व सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे सीईओ प्रवीण तळे आणि कदम उपस्थित होते.

## म्हेत्रे निलंबन प्रकरण निर्णायक टप्प्यावर; सीईओ कुशल जैन घेणार अंतिम निर्णय

### उपाध्यक्ष इंद्रजीत पवारांनी प्रकरणाची घेतली माहिती; प्रशासकीय वर्तुळात चर्चांना वेग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून**

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांच्या निलंबन प्रकरणाने आता प्रशासकीय स्तरावर महत्त्वाचे वळण घेतले असून, याप्रकरणातील अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित घडामोडींमुळे जिल्हा परिषद प्रशासनासह कर्मचारी वर्गाचे लक्ष आता मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या भूमिकेकडे लागले आहे.

म्हेत्रे यांच्या निलंबनानंतर विविध स्तरांवरून या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. प्रकरणातील अधिकारांचा वापर, तसेच कारवाईची प्रक्रिया याबाबत चर्चा सुरू असतानाच हे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आले असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे संपूर्ण बाबींचा अभ्यास करून पुढील निर्णय वरिष्ठ प्रशासनाकडून घेतला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

जिल्हा परिषद प्रशासनात एखाद्या कर्मचाऱ्यावरील कारवाई करताना अधिकारांची मर्यादा, वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका आणि शासकीय नियमांचे पालन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळे या प्रकरणातही संबंधित सर्व कागदपत्रे आणि घटनाक्रमाची पडताळणी करूनच पुढील निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रशासकीय वतुर्ळात सुरू असलेल्या चर्चेनुसार याप्रकरणातून केवळ एका कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा मुद्दा समोर आलेला नसून, निर्णय प्रक्रिया अधिक सुसंगत आणि पारदर्शक करण्याची गरजही अधोरेखित झाली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्तरावरून होणारी चर्चा भविष्यात अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये मार्गदर्शक ठरू शकते, असे मत व्यक्त केले जात आहे. म्हेत्रे प्रकरणामुळे जिल्हा परिषद प्रशासनातील अधिकारांचे विकेंद्रीकरण, समन्वय आणि कार्यपद्धती याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचा निर्णय आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या स्तरावर होणारी चर्चा याकडे कर्मचारी, अधिकारी आणि प्रशासकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातून कोणता निर्णय पुढे येतो आणि त्याचा प्रशासनिक व्यवस्थेवर काय परिणाम होतो, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. मात्र सध्या तरी हे प्रकरण जिल्हा परिषदेत चर्चेचा प्रमुख विषय बनले असून, अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

## नोकरीस लावतो म्हणून सव्वा ५ लाख घेऊन सहा जणांची फसवणूक; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून -**

सोलापूर : इनकम टॅक्स ऑफीसमध्ये नोकरीस लावतो म्हणून सव्वा ५ लाख घेऊन सहा जणांची फसवणूक केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरूद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ दरम्यान घडला.

संदीप शिवाळ उर्फ संदीप शर्मा (रा. बाळे) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत उशांत कपिल जाधव (रा. न्यू बुधवार पेठ, आंबेडकरनगर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. मागील वर्षी फिर्यादीचे वडील एका दवाखान्यात ॲडमिट होते. तेथे संदीप शर्माशी ओळख झाली होती. संदीपने मी इनकम टॅक्स ऑफिसमध्ये क्लर्क म्हणून नोकरीला आहे. शिवाय माझी पत्नी केंद्रीय विद्यालयात नोकरीला आहे. दोन्ही ठिकाणी नोकरीच्या जागा आहेत, असे सांगितले. तुम्हाला नोकरी लावतो असे सांगून त्याने फिर्यादीसह सहा जणांकडून ५ लाख २५ हजार रुपये घेतले. मात्र, कालांतराने त्यांना नोकरी न लावता टाळाटाळ करू लागला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर याबाबत पोलिसात तक्रार दाखल केली. फौजदार वर्षाराणी सुतार या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

## व्हिएतनाममध्ये गारमेंट ऑटोमेशन अभ्यास दौरा

### सोलापूरच्या युनिफॉर्म उद्योगाची जागतिक झेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून**

सोलापूरच्या युनिफॉर्म उत्पादन उद्योगाची गुणवत्ता, उत्पादन क्षमता आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने दिनांक १३ जून ते १७ जून या कालावधीत व्हिएतनाममधील हानोई आणि हो-ची-मिन्ह सिटी येथे विशेष गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग ऑटोमेशन अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले आहे.

जगातील अग्रगण्य शिवणयंत्र उत्पादक कंपनी, जॅक शिलाई मशीन यांनी आयोजित केलेल्या या अभ्यास दौऱ्यात सोलापूरमधील गारमेंट उद्योजकांना जागतिक दर्जाच्या उत्पादन व्यवस्थापन व आधुनिक ऑटोमेशन तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. जॅक कंपनीचे अधिकृत विक्रेते, कोयना शिलाई मशिन्सचे गणेश सुत्रावे यांच्या विशेष प्रयत्नामुळे या दौऱ्यावर जाण्यासाठी या शिष्टमंडळाला संधी मिळाली आहे. अभ्यास दौऱ्यात सोलापूरमधील गारमेंट उद्योगाशी संबंधित प्रमुख उद्योजकांचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ सहभागी होणार आहे. दौरा 'एसजीएम'चे अध्यक्ष सतीश पवार यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे.



शिष्टमंडळामध्ये 'एसजीएम'चे उपाध्यक्ष रमेश डाकलिया, खजिनदार श्रीकांत अंबुरे, संचालक आनंद झाड, 'सीएमआय' वेस्टर्न रिजनचे डायरेक्टर अमितकुमार जैन तसेच असोसिएटेड गारमेंट क्लस्टर फाउंडेशनचे डायरेक्टर अजय रंगरेज यांचा समावेश आहे. दौऱ्यादरम्यान प्रतिनिधी मंडळाला अत्याधुनिक ऑटोमेटेड उत्पादन प्रणाली, ॲडव्हान्सड मशीन, डिजिटल उत्पादन व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया, उत्पादन क्षमता वाढविण्याच्या आधुनिक पद्धती आणि मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

उत्पादन खर्च कमी करणे आणि जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक स्थान निर्माण करणे यासाठी हा अभ्यास दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सोलापूरच्या युनिफॉर्म उद्योगाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि प्रगत बनविण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## श्री शंकर-पार्वती विवाह सोहळ्याने डोळ्यांचे फिटले पारणे

### श्रध्दा महिला मंडळातर्फे शिवमहापुराण कथा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

दमाणी नगरातील श्रद्धा महिला मंडळाच्यावतीने गड दर्शन समाज मंदिरात सुरू असलेल्या ह. भ. प. भालचंद्र महाराज केजकर यांच्या शिव महापुराण कथेप्रसंगी रविवारी सायंकाळी साक्षात श्री.शंकर आणि पार्वती विवाह सोहळा पार पडला. हजारो शिवभक्तांच्या साक्षीने झालेल्या विवाह सोहळ्याने अनेकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. दिया धूत हिने भगवान शंकराची तर आरोही कराळे हिने पार्वती मातेची वेशभूषा परिधान केली होती.



माता पार्वती यांनी भोलेनाथ यांच्याशीच विवाह होईल असा त्यांचा निर्धार होता. देवदेवतांनाही तेच हवे होते. माता पार्वती यांनीही त्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. यामुळे तिन्ही लोकात हाहाकार माजला. शिव-पार्वती यांचा विवाह त्याग, समर्पण आणि आदर्श संसाराचे प्रतीक मानला जातो, असे भालचंद्र महाराज यांनी सांगितले.

श्रध्दा महिला मंडळाच्यावतीने आयोजित श्री शिव महापुराण कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यावेळी श्रद्धा महिला मंडळाच्या सदस्या जयश्री पिंगळे, रजनी कुलकर्णी, शोभा बिडला, सुमित्रा स्वामी, अलका गवळी, शिला थिटे, पुष्पा होळकर, वैशाली शेटे, उज्वला कुलकर्णी, मृदुला बाद्रायणी, सुनंदा म्हेत्रे, जयमाला रजपूत, निर्मला कराळे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | सोमवार, ८ जून २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# झाडे खुशाल तोडा अन् केवळ दंड भरा!

## ● वनखात्यानुसार ११८ झाडे तोडल्यावर ४ लाख २१ हजार दंड; महापालिकेने केला होता १ कोटी १८ लाखांचा दंड

**यंदाच्या उन्हाळ्यात सोलापुरात सूर्यनारायणाचा प्रचंड कोप पहावयास मिळाला, तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांचे तापमान ४८ अंशावर पोहचून अनेकांचे उष्माघाताने बळीही घेतले. उच्च तापमानांच्या १०० शहराच्या जगाच्या यादीत भारतातील ९९ शहरांचा समावेश होता तर महाराष्ट्रातील अनेक शहरे यात होती. एकीकडे सूर्यनारायणाचा पारा वाढत असल्याने प्रत्येकाने पर्यावरण जतनासह किमान एक तरी वृक्षरोपण करणे काळाची गरज आहे. राज्य सरकारने देखील राज्यात यंदा ३०० कोटी वृक्षलागवडीची घोषणा केली आहे. वाढत्या उन्हाचा प्रश्न इतका गंभीर होत असतानाही सोलापुरात मात्र एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल ११८ मोठ्या झाडांची कत्तल समाजातील प्रतिष्ठीत म्हणवणाऱ्या उद्योजकांनी केल्याचे उघडकीस आले आहे. शोकांतिका म्हणजे प्रसारमाध्यमांनी हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर जागा झालेला महापालिकेचा उद्यान विभाग आणि बघ्याची भूमिका घेणारे वनखाते अद्यापही याप्रकरणी गांभीर्य दाखवत नाही. ज्या जागेवरची झाडे तोडली त्यांची नावे उघड करण्यास उशीर झाला, पोलिसात गुन्हा दाखल करण्यात विलंब केला. वैयक्तिक हितासाठी शेकडो झाडांची कत्तल झाल्यानंतर काही लाख दंड होत असेल तर यापुढे लोकांनी खुशाल झाडे तोडली आणि दंड भरल्यास आश्चर्य वाटायला नको.**




केवळ पर्यावरणाप्रती प्रेम आणि सजगता नसल्यामुळेच सोलापूरच्या तापमानात सातत्याने वाढ होते आहे. सोलापुरातील काही वृक्ष आणि पर्यावरण प्रेमींकडून सातत्याने वृक्षारोपणासह पर्यावरण जतनाचा आग्रह धरला जातो. गेल्या काही वर्षात बऱ्यापैकी पाऊस पडत असला तरी तत्पूर्वी सोलापूर जिल्हा दुष्काळी म्हणूनच ओळखला जायचा. अद्यापही पुण्यात मुबलक पाऊस पडला तरच सोलापूरचे वरदायिनी उजनी धरण भरते हे वास्तव आहे. असह्य उन्हाळा सुसह्य बनवायचा असेल तर प्रत्येक सोलापूरकराने किमान एक तरी झाड लावावे आणि ते जतन करुन मोठे करणे काळाची गरज आहे. अन्यथा यापुढे असाच असह्य उन्हाळा जाणवल्यास उन्हाळ्याचे काही महिने तरी सोलापूरकर गाव सोडतील हे मात्र नक्की.

नागरिकांनी तर पर्यावरण जतनासह वृक्षारोपण करणे अपरिहार्य आहेच, परंतु याबाबत खरी महत्वाची जबाबदारी आहे ती म्हणजे महापालिका, जिल्हा परिषद, वनविभाग आणि जिल्हा प्रशासनाची होय. सोलापूर जिल्ह्याचे वनक्षेत्र किती असून शासन नियमानुसार ते किती पाहिजे याबाबत गांभीर्य दाखवणे अपेक्षित आहे. वनविभाग, महापालिका, जिल्हा परिषद आणि जिल्हा प्रशासनाने वृक्षारोपणाबाबतची श्वेतपत्रिका काढली पाहिजे म्हणजे पर्यावरण जतन आणि वृक्षारोपणाबाबत सोलापूर शहर व जिल्हा नेमका कुठे आहे हे सर्वश्रुत होईल.

एखाद्या नागरिकाने घराच्या अंगणातील झाडाच्या फांद्या तोडल्या तरी महापालिकेचा उद्यान विभाग थेट गुन्हा दाखल करण्याची कारवाई करीत होता. परंतु शहराच्या प्रमुख भागात तब्बल ११८ मोठ्या झाडांची कत्तल दिवसाढवळ्या झाल्यानंतरही महापालिका प्रशासनाला काहीच कसे कळले नाही, याबाबत साशंकता आणि आश्चर्य व्यक्त होत आहे. महापालिकेचा उद्यान विभाग नेमके काय काम करतो? हा देखील संशोधनाचा विषय आहे. कारण ११८ झाडांची कत्तल झाल्यानंतर तरुण भारतच्या पत्रकाराने उद्यान विभाग प्रमुखांना याप्रकाराची माहिती दिली आणि वृक्षतोडीचे फोटो देखील व्हॉटसअपला पाठवले. त्यानंतर जागृत झालेल्या मनपा उद्यान विभागाने कार्यवाही सुरु केली. तोपर्यंत अनेक झाडे तोडून लाकूड विक्रीसाठी रवानाही झाल्याचे वृत्त आहे. उद्यान विभागाने तातडीने थेट कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु याप्रकरणात काही बडी धेंड असल्याने दबावामुळे कार्यवाहीदेखील संथगतीने झाल्याचे स्पष्ट होते. सुरुवातीला तर ज्या जागेवरील झाडे तोडली ती जागा कोणाची? याचा शोध घेण्यात वेळ गेला. जागा मालक शोधल्यानंतरही पुढे गुन्हा दाखलची कारवाई संथगतीने झाली. कायद्यानुसार पोलिसांनी राजेंद्र हजारे, आशा हजारे, शिवानंद पाटील आदींना नोटीस देण्याची कार्यवाही केली.


महापालिका आयुक्तांनी हा प्रकार गांभीर्याने घेत थेट जागेवर पाहणी करून संबंधितांना तब्बल एक कोटी १८ लाखांचा दंड आकारल्याचे सांगण्यात आले. दरम्यान हे प्रकरण वनखात्याकडे चौकशीसाठी गेले आणि वनखात्याच्या चौकशी अहवाल महापालिकेला दिला असून वनखात्याने ११८ झाडांच्या कत्तलीसाठी ४ लाखांचा दंड आकारण्याचे अहवालात नमूद केल्याचे सांगण्यात येते. ११८ मोठी झाडे तोडल्यानंतर जर चार लाख दंड होणार असेल तर यापुढे आता कोणीही झाडे खुशाल तोडतील आणि दंड भरतील, असे जर झाले तर पर्यावरण प्रेमींनी आश्चर्य वाटून घेवू नये. कायदा सर्वांसाठी समान असतो असे ठणकावून सांगण्यात येते. मग ११८ झाडांची कत्तल करणारे मोठे उद्योजक असो अथवा बड राजकारणी असो कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे.

महापालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आणि त्यांचे कुटुंबिय पर्यावरण आणि वृक्षप्रेमी आहे, त्यांनी याप्रकरणी लक्ष घालून संबंतधितांवर ठोस कारवाईसाठी महापालिका प्रशासनावर दबाव आणला पाहिजे. सोलापूरच्या राजकारणा व्यतिरिक्त प्रत्येक घटना घडामोडींवर बारील लक्ष ठेवून असणारे पालकमंत्री यांनी या गंभीर वृक्षतोड प्रकरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सोलापूर शहरात भाजपाचे तीन आमदार असून त्यांनी देखील वृक्षतोडीचा विषय लावून धरला पाहिजे. सत्ताधाऱ्यांवर तर याप्रकारची जबाबदारी आहेच पण दुर्दैवाने विरोधी पक्षाचे सोलापूरचे खासदार आणि नगरसेवक, पदाधिकारी यांनीदेखील हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

निवडणुकीत अर्ज बाद झाल्यानंतर त्रागा करणाऱ्या विरोधी पक्षाने ११८ झाडांची कत्तल दुर्लक्षून चालणार नाही. पर्यावरण प्रेमी संघटना, नागरिकांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली पाहिजे. हे प्रकरण जर प्रशासकीय पातळीवर दडपण्याचा प्रयत्न होत असेल तर जागृतपणे असे होवू दिले नाही पाहिजे.

वर्षातील १२ महिन्यांपैकी तब्बल आठ ते नऊ महिने सोलापुरात कडक उन्हाळा असतो. सोलापूरचे तापमान कमी करावयाचे झाल्यास वृक्षारोपण ही काळाची गरज ठरणार आहे.





### सोलापूर शहर-जिल्ह्यातील आजपर्यंतच्या वृक्षारोपणाची श्वेतपत्रिका काढावी

सोलापूर वनखाते, महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समित्या, ग्रामपंचायती आदीमधून गेल्या पाच ते दहा वर्षात वृक्षारोपण आणि पर्यावरण जनतासाठी किती खर्च करण्यात आला. शासनाकडून याअनुषंगाने आजपर्यंत किती निधी प्राप्त झाला. किमान शासकीय कार्यालयांमध्ये तरी वृक्षारोपण करून ती जतन करण्यात आली आहेत का याची माहिती उघड व्हावी. महापालिकेला शासनाकडून किती निधी मिळाला आणि तो कुठे खर्च झाला. खर्च करून केलेल्या उपाययोजनांची सद्याची अवस्था काय आहे यासंदर्भातील सविस्तर माहिती श्वेतपत्रिका प्रसिध्द झाल्यास उघड होण्यास मदत होईल. यासंपूर्ण विषयात वनखात्याची जबाबदारी खूपच महत्वाची आहे. श्वेतपत्रिका प्रसिध्द होण्यासाठी पाठपुरावा होणे आवश्यक आहे.

---

## ▶▶ महत्वाचे...

### १८ वर्षाच्या तरुणीसह तरुणाने विष पिऊन केला आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ७ जून-**

प्रेम प्रकरणातून एका अठरा वर्षाच्या तरुणीसह एका तरुणाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना रविवार पेठ भागात आज रविवारी दुपारी घडली. पहिल्या घटनेत अठरा वर्षाच्या मुलीने प्रेमप्रकरणाच्या कारणावरून शांती चौक येथील स्मशानभूमीत आज रविवारी सकाळी दहा वाजता मुंग्या मारण्याचे विषारी औषध पिले.त्यामुळे तिला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात दुपारी आईने दाखल केले. तर दुसऱ्या घटनेत प्रभाकर तुळशीदास मंजेली ( वय २४ वर्ष, रा.रविवार पेठ, सोलापूर ) याने प्रेम प्रकरणातून राहत्या घरात उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. त्यामुळे त्याला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ लक्ष्मण याने दुपारी पावणे दोन वाजता दाखल केले .

-----------------------------

### शेतातील बांध तोडण्याच्या वादातून एकास मारहाण

**सोलापूर, दि. ७ जून-**

शेतातील बांद तोडण्याच्या कारणावरून एका शेतकऱ्याला दगड, लोखंडी रॉड व लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना करमाळा तालुक्यातील वरकुटे येथे शनिवारी रात्री साडेआठ वाजता घडली. केशव श्रीमंत दिरंगे (वय ४० वर्ष , रा. वरकुटे )असे त्या मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून शनिवारी रात्री ते घरासमोर असताना शेतातील बांध तोडण्याच्या कारणावरून त्यांना रमेश दिगंबर चव्हाण, दत्तात्रय महादेव चव्हाण व इतर आठ जणांनी मारहाण केली. त्यात चेहऱ्याला जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्यांना करमाळा येथील आरोग्य केंद्राचा प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात काका ज्योतीराम यांनी पहाटे तीन वाजता दाखल केले .

-----------------------------

### शेतजमिनीच्या वादातून वृध्द शेतकऱ्याला मारहाण

**सोलापूर, दि. ७ जून-**

शेतजमिनीच्या वादातून एका वृद्ध शेतकऱ्याला पाईप व काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कामती ( खू) येथे शनिवारी रात्री दहा वाजता घडली. मल्लिकार्जुन निवृत्ती माने (वय ७२ वर्ष, राहणार कामती ) असे त्या मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून ते शनिवारी रात्री दहा वाजता गावात असताना त्यांना मेघनाथ गोविंद माळी, साजन मेघनाथ माळी यांनी पाईप, काठी व लाथा बुक्क्याने मारहाण केली. यात दोन्ही पायाला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना कामती येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून पुतण्या दत्तात्रय याने आज रविवारी पहाटे दीड वाजता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

---

# ११८ वृक्षतोड प्रकरणात वन विभागाचा अहवाल सादर

**वृक्षतोडीच्या मूल्यांकनानंतर आता महापालिकेच्या दंडात्मक कारवाईची प्रतीक्षा**

**एकूण ४ लाख २१ हजार रुपये मूल्यांकन तर महापालिका किती दंड ठोठावणार?**

**कोणता कायदा ठरणार निर्णायक?**
- वन विभागाने मूल्यांकन केले १९६४ च्या कायद्यानुसार
- शहरातील वृक्षतोडीसाठी १९७५ चा नागरी क्षेत्र कायदा लागू
- हेरिटेज वृक्षतोडीला दंड व कारावासाची तरतूद
- महापालिकेच्या निर्णयावर दंडाची रक्कम अवलंबून
- पर्यावरणप्रेमींसह नागरिकांच्या नजरा आता प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे

**ठळक बाबी अशा...**
- ११८ झाडे व जप्त मुद्देमालाचे ४.२१ लाखांचे मूल्यांकन
- वन विभागाचा अहवाल महापालिकेकडे सादर
- नागरी क्षेत्रातील कायद्यात दंडाची अधिक कठोर तरतूद
- विक्री झालेल्या किंवा गायब लाकडाच्या मूल्यांकनाचा प्रश्न कायम
- अंतिम दंडात्मक कारवाईबाबत महापालिकेच्या निर्णयाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून -**

महापालिका हद्दीत काही दिवसांपूर्वी उघडकीस आलेल्या मोठ्या वृक्षतोड प्रकरणात वन विभागाने झाडे आणि जप्त मुद्देमालाचे मूल्यांकन पूर्ण करून अहवाल महापालिकेला सादर केला आहे. या अहवालानुसार ११८ झाडे आणि घटनास्थळी सापडलेल्या मुद्देमालाचे एकूण ४ लाख २१ हजार ३०० रुपये मूल्यांकन करण्यात आले आहे.

आता सोलापूर महापालिका प्रशासन काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वन विभागाने हे मूल्यांकन १९६४ च्या कायद्यानुसार केले असून त्यात बाभूळ, कडुलिंबसह विविध प्रकारच्या झाडांचा समावेश आहे.

मात्र, शहरातील वृक्षसंवर्धनासाठी लागू असलेल्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत दंडाची तरतूद अधिक कठोर असल्याने अंतिम कारवाईबाबत सर्वांचे लक्ष लागले आहे. वन विभागाच्या मूल्यांकनातील रक्कम तुलनेने कमी असल्याने नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दुसरीकडे, घटनास्थळी सापडलेल्या लाकूड व इतर मुद्देमालाचे मूल्यांकन झाले असले तरी यापूर्वी तोडून विक्री करण्यात आलेल्या किंवा घटनास्थळावरून गायब झालेल्या झाडांचे आणि लाकडाचे मूल्यांकन कोण करणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. सन २०२१ मध्ये झालेल्या सुधारणांनुसार हेरिटेज अथवा दुर्मिळ वृक्षांची अनधिकृत तोड केल्यास १० हजार रुपयांपर्यंत दंड आणि एक वर्षापर्यंत कारावासाची तरतूद आहे. तसेच तोडलेल्या प्रत्येक झाडाच्या बदल्यात दोन झाडे लावणे बंधनकारक असून त्याचे पालन न झाल्यास अतिरिक्त दंड आकारला जाऊ शकतो. मुंबई व पुणे महापालिका क्षेत्रात प्रति झाड २५ ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येत असल्याची उदाहरणे आहेत.

वन विभागाने आपली प्रक्रिया पूर्ण करून अहवाल महापालिकेकडे सुपूर्द केला असून पुढील दंडात्मक कारवाईचे अधिकार आता महापालिका प्रशासनाकडे आहेत. त्यामुळे महापालिका आयुक्त ग्रामीण भागासाठी लागू असलेल्या कायद्याचा आधार घेणार की नागरी क्षेत्रातील कठोर कायद्यानुसार दंड आकारणार आता याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# चिमुकल्याच्या खून प्रकरणाची दोन तासांत उकल

**मंद्रूप पोलिसांची झंझावाती कारवाई; आरोपी गजाआड**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ७ जून-**

बरूर येथील पाच वर्षाच्या निष्पाप चिमुकल्याच्या खूनामुळे संपूर्ण परिसर हादरला असताना, मंद्रूप पोलिसांनी विलक्षण तत्परता, तांत्रिक कौशल्य आणि धाडसी तपासाच्या जोरावर केवळ दोन तासात खुनाचा छडा लावत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. या कामगिरीमुळे मंद्रूप पोलिसांचे कौतुक होत आहे.

६ जून रोजी समर्थ कास्तार (वय ५) या चिमुकल्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती मंद्रूप पोलिसांना मिळताच पोलीस यंत्रणा सक्रिय झाली. मंद्रुप पोलीसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान समर्थला अंकुश परशराम कास्तार (वय-२५, रा.हलसंगी, ता.तडी, जि.विजयपूर, कर्नाटक) याच्यासोबत पाहिल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत तांत्रिक माहिती, स्थानिक माहितीदार आणि गोपनीय यंत्रणेच्या मदतीने आरोपीचा माग काढला.

दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशी केली असता आरोपीने चिमुकल्या समर्थचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली.

अत्यंत गंभीर, संवेदनशील आणि जनमानसाला अस्वस्थ करणाऱ्या या गुन्ह्याची अवघ्या दोन तासांत उकल करून आरोपीला अटक करणे ही मंद्रूप पोलिसांच्या तपास कौशल्याची आणि सजगतेची प्रचिती देणारी कामगिरी ठरली आहे.

आरोपी यास न्यायालयाने दि.११ जून २०२६ पर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, पोलीस उपनिरीक्षक राज डांगे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संदीप काशीद, सहायक फौजदार बापू शिंदे, पोलीस हेड कॉन्स्टेबल श्रीराम आदलिंग, कॉन्स्टेबल लखन पवार , माजिद शेख, अश्फाक मियावाले, किरण तोडेकर, चालक पोलीस कॉन्स्टेबल श्रीशैल शिवणे तसेच बरूर गावचे पोलीस पाटील श्रीशैल स्वामी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. निष्पाप चिमुकल्याला न्याय मिळवून देण्यासाठी मंद्रूप पोलिसांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि तपासाचे कौतुक होत आहे.

---

# शहरातील ५४ मीटरचा रस्ता अंधाराच्या साम्राज्यात


**अपघातांच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये भीती**

## मुक्ताई मंदिर ते सीएनएस हॉस्पिटल परिसरात एकही पथदिवा नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून**

शहरातील मारिआई चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक दरम्यानचा ब्रिटिशकालीन रेल्वे पूल पाडल्यानंतर विकसित करण्यात आलेला ५४ मीटर रुंदीचा रस्ता सध्या रात्रीच्या वेळी अंधाराच्या साम्राज्यात सापडला आहे. मुक्ताई मंदिर ते सीएनएस हॉस्पिटल या परिसरात एकही पथदिवा नसल्याने वाहनचालक, पादचारी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

हा रस्ता शहरातील प्रमुख वाहतूक मार्गांपैकी एक मानला जातो. दररोज हजारो वाहनांची ये-जा या मार्गावरून होत असते. परिसरात बस थांबा असल्याने रात्री उशिरापर्यंत प्रवाशांची वर्दळ असते. तसेच नागरिक सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी या मार्गाचा



वापर करतात. मात्र, रात्री पडताच संपूर्ण परिसर अंधारमय होत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. काही दिवसांपूर्वी अंधारामुळे गतिरोधकाचा अंदाज न आल्याने एका चारचाकी वाहनाचा अपघात झाला. वाहन उलटल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. सुदैवाने चालक बचावला; मात्र या घटनेनंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

या मार्गावर किरकोळ अपघातांची मालिका सुरू असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाला जाग येण्यासाठी आणखी किती अपघात व्हावे लागणार? असा सवाल परिसरातील रहिवासी उपस्थित करत आहेत.

**अंधारामुळे तळीरामांचा अड्डा**

रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडत असल्याने काही ठिकाणी दारुड्यांचा वावर वाढल्याची नागरिकांची तक्रार आहे. उघड्यावर मद्यप्राशन करणाऱ्यांमुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना असुरक्षित वाटत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पथदिव्यांची सुविधा उपलब्ध झाल्यास अशा प्रकारांना आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

**तातडीने उपाययोजनांची मागणी**

वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या मार्गावर तातडीने पथदिवे बसवून प्रकाशव्यवस्था सुरू करावी, तसेच अपघात टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अंधारामुळे वाढणारा धोका लक्षात घेता प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**या आहेत ठळक बाबी**
- मुक्ताई मंदिर ते सीएनएस हॉस्पिटल परिसर पूर्णपणे अंधारात
- प्रमुख रस्त्यावर दररोज हजारो वाहनांची वर्दळ
- बसथांबा असल्याने रात्री प्रवाशांची मोठी ये-जा
- महिलांमध्ये व नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना
- तातडीने पथदिवे बसविण्याची मागणी जोर धरतेय

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६५

**जे कां रंजले गांजले।**
**त्यासी म्हणे जो आपुले।।**

आस्तिक आणि नास्तिक असे मानवाचे दोन प्रकार पाडले तर चुकीचे होणार नाही. आस्तिकांना देव आहे ही कल्पना मान्य असते आणि नास्तिकांना देव ही कल्पनाच मान्य नसते. देव मानणाऱ्यांना देव कुठे आहे, हे नेमके समजत नाही. ज्यांना खरोखर देव कोठे आहे हे समजते तो प्राणीमात्रात भेद करीत नाही. आपला-परका ही वृत्ती ज्याच्याकडे शिल्लक रहात नाही, त्यालाच खऱ्या अर्थाने देवाच्या अस्तित्वाची जाणीव होते. त्याचा देव दगडा-धोंड्यात नसून जीवमात्रात असतो. जीवमात्रात भेद करण्याचे तो जाणत नसल्याने म्हणजेच समत्वाची दृष्टी तो जोपासत असल्याने त्याला सर्व जीव ईश्वरी अंश दिसतात. सुख-समाधानात रंगलेला असो की दुःखाने जर्जर झालेला असो, या सर्वांना आपले मानून त्यांची सेवा करणे किंवा त्यांच्या योग्य त्या कामी येणे यातच असा समत्व जोपासणारा सत्पुरुष स्वतःला धन्य समजत असतो. असा सत्पुरुष दुसरा तिसरा कोणी नसून तोच खरा साधू, खरा संत असतो आणि चालता बोलता ईश्वर खऱ्या अर्थाने त्याच्या ठिकाणी असतो. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, **जे कां रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा।।**



जेव्हा माणसाला स्वतःचा खरा परिचय होत नाही, तेव्हा देवाचा परिचय होईलच कसा? आपणाला आपला परिचय होण्यासाठी ज्याला त्याचा परिचय झाला आहे, असा महात्मा भेटावा लागतो. स्वतःचा परिचय होणे ही सहज किंवा साधी गोष्ट नाही. ही अत्यंत अवघड पण आवश्यक गोष्ट आहे. स्वतःचा परिचय करून घेण्याऐवजी दगडा-धोंड्यातील देवाचा परिचय करून घ्यायला माणूस निघतो, तेव्हा फार आश्चर्य वाटते. चालत्या-बोलत्या जीवाला लाथाडून निर्जिव दगडा-धोंड्यासाठी सर्वस्व लुटण्याची तयारी दर्शविणारा माणूस पाहिला म्हणजे मानवतेवरील विश्वास उडू लागतो. मानवाच्या या चुकीच्या प्रवृत्तीचा सर्वांगिण विचार करूनच संतांनी साधू-संतांची लक्षणे व आवश्यकता सांगण्याचा प्रयत्न केला आहे. संपूर्ण जीवमात्रात भगवंताला पाहून झाल्यावर उरल्या सुरल्या दगडा-धोंड्यातही त्याला पाहण्याची पातळी म्हणजे अत्युच्च पातळी होय. पण माणूस मात्र सरळ ही अत्युच्च पातळी गाठण्याचा प्रयत्न करतो आणि या पातळीचा आधारस्तंभ असणाऱ्या जीवनमात्राकडेच दुर्लक्ष करतो. बाहेरच्या दुःखी लोकांना तर सोडाच घरातील सुनेला, सासूला, आई-वडिलानांही माणूस आपले मानत नाही. रक्ताची नाती असणाऱ्या सदस्यांशी टोकाला जाऊन वाद करायचे आणि सुख-समाधानासाठी तीर्थयात्रेला जायचे हे कोणत्याही पंथात बसणारे नाही. अनेक दुष्कत्याला माणूस स्वतःच जबाबदार असतो. हे याप्रसंगी लक्षात ठेवायला हरकत नाही. जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. ८ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. अष्टमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- शततारका (०९.०९)**
**योग - विष्कंभ (०९.२७)**
**करण - बालव (१५.२९)**
**राहू काल : सोमवार**
**सायं. ७.३० ते ०९.००**

**दिनविशेष : ✻ जागतिक महासागर दिन.**
**१६७० (मराठा साम्राज्य): छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला मुघलांकडून जिंकला.**
**१९१५: लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात असताना लिहून पूर्ण केलेल्या प्रसिद्ध 'गीतारहस्य' या ग्रंथाचे प्रकाशन झाले.**
**१९१७: प्रसिद्ध भावगीत गायक गजाननराव वाटवे यांचा जन्म.**

# वाचन संस्कृती संवेदनशील मन घडवते; कविताेलाही रियाजाची गरज

## सुनील व स्नेहा शिनखेडे; प्रिसिजन वाचन अभियानात साहित्य, कविता आणि जीवनप्रवासाचा सुरेल उलगडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

वाचन माणसाला केवळ ज्ञान देत नाही, तर त्याच्या मनाला संवेदनशील आणि समृद्ध बनवते. गायनाला जसा सातत्यपूर्ण रियाज आवश्यक असतो, तसाच कवितेलाही रियाज हवा असतो, असे मत ज्येष्ठ साहित्यिक सुनील शिनखेडे यांनी व्यक्त केले. प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत आयोजित विशेष मुलाखत कार्यक्रमात सुनील शिनखेडे आणि स्नेहा शिनखेडे या साहित्यिक दांपत्याने आपल्या जीवनप्रवासातील, साहित्यसाधनेतील आणि कवितेतील अनेक संस्मरणीय अनुभव रसिकांसमोर उलगडले.

माधव देशपांडे यांनी घेतलेल्या या मुक्तसंवादात सुनील शिनखेडे यांनी ब्रह्मपुरीसारख्या छोट्या गावातून सुरू झालेल्या आपल्या साहित्यप्रवासाची कहाणी सांगितली. सातवीत असताना पहिली कविता लिहिली, तर अकरावीत असताना 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांची मुलाखत घेण्याची संधी मिळाल्याचा अनुभव त्यांनी कथन केला. विद्यार्थी दशेत साहित्य संमेलनांमध्ये सहभाग घेतल्याने साहित्याची आवड अधिक वृद्धिंगत झाली. पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना दिवाळी अंक, अग्रलेख आणि विविध साहित्यप्रकार हाताळण्याची संधी मिळाली. 'मौज'सारख्या प्रतिष्ठित दिवाळी अंकात कविता प्रसिध्द होणे हा आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरल्याचे त्यांनी सांगितले.




सोलापूरबद्दल बोलताना त्यांनी, सोलापूरला एक ऋतू जास्त आहे आणि तो म्हणजे जिव्हाळा, असे सांगत शहराविषयीची आत्मीयता व्यक्त केली. कवी ग्रेस, ना. धों. महानोर, महेश एलकुंचवार, वामनराव चोरघडे आणि मा.गो. वैद्य यांच्यासारख्या दिग्गज साहित्यिकांचा सहवास लाभल्याच्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला.

स्नेहा शिनखेडे यांनी महाविद्यालयीन काळात सुनील यांच्याशी झालेला परिचय, ओळख, त्यातून फुललेले प्रेम आणि त्या नात्यात ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी निभावलेली महत्त्वाची भूमिका त्यांनी सांगितली.

साड्यांना विविध कवींची नावे देण्याचा आपला अनोखा छंदही त्यांनी रसिकांसमोर मांडला. वाचन संस्कृतीबाबत बोलताना स्नेहा शिनखेडे म्हणाल्या, भाषिक संवेदना विकसित झाल्याशिवाय कविता, कथा आणि भावविश्वाचा खरा अर्थ समजत नाही. म्हणून प्रत्येकाने वाचनातूर वृत्ती जपली पाहिजे. डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या साहित्याचा आपल्यावर खोल प्रभाव पडल्याचे सांगत त्यांनी 'काळजातले दिवे' या आपल्या पहिल्या पुस्तकाच्या निर्मितीमागील आठवणीही सांगितल्या.

कार्यक्रमात साहित्य आणि संगीताचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. प्रशांत देशपांडे यांनी सुनील शिनखेडे यांच्या निवडक कवितांचे सुमधुर काव्यगायन सादर केले. त्यांच्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. तसेच ऐश्वर्या हिबारे आणि यश गोसावी यांनी शिनखेडे दांपत्याच्या साहित्यकृतींमधील निवडक उताऱ्यांचे प्रभावी अभिवाचन करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी नितीन फलटणकर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. वैशाली बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले.

# देवस्थान इनाम जमिनीचे हस्तांतरण, निर्मूलन किंवा खासगीकरण करू नये

## महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याविरोधात 'राष्ट्रवादी'ची हरकत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६' या कायद्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून तीव्र हरकत नोंदविण्यात आली आहे. या प्रस्तावित अधिनियमामुळे राज्यातील शेकडो वर्षांची धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा धोक्यात येण्याची शक्यता असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.



निवेदनानुसार राज्यातील अनेक प्राचीन मंदिरे, देवस्थाने, गड-दुर्ग आणि धार्मिक संस्थांचे दैनंदिन व्यवस्थापन इनाम जमिनींच्या उत्पन्नावर चालते. पूजाअर्चा, वीजबिल, स्वच्छता, अन्नदान, महाप्रसाद, यात्रा-महोत्सव, वेदपठण, वारकरी सेवा तसेच गरीब आणि गरजू भक्तांना मदत यांसारखे विविध उपक्रम याच उत्पन्नाच्या आधारे राबविले जातात. इनाम जमिनींचे निर्मूलन झाल्यास या धार्मिक आणि सामाजिक सेवा विस्कळीत होतील. शासनाने हा प्रस्तावित कायदा तात्काळ मागे घ्यावा, देवस्थानांच्या जमिनींना कायदेशीर संरक्षण द्यावे, राज्यभर सार्वजनिक सुनावण्या घ्याव्यात तसेच देवस्थान जमिनींचे संरक्षण, अतिक्रमण निर्मूलन आणि महसुली अभिलेख अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे. शहराध्यक्ष महेश गादेकर, भारत जाधव, शंकर पाटील, सुनिता रोटे, गौरा कोरे, जावेद खरेदी, दिनेश शिंदे, अजित पात्रे, सरफराज शेख, पद्मश्री शिंदे, संजय जाबा, वीरप्पा बंडगर, सोपान खांडेकर, मल्हार शिंदे, नरेश येमूल, संपन्न दिवाकर, अल्ताफ बुऱ्हान, लाडजी नदाफ, संदीप साळुंखे, अमित मोतेवार, नागनाथ मेंगाने, राकेश सोनी आदी उपस्थित होते.




# सह्याद्री फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ जल्लोषात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ जून-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथील अंतिम वर्ष बी व एम.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ जल्लोषात साजरा झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, सचिवा सुवर्णा इंगवले, विश्वस्त विश्वजीत इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील, डॉ.एस.एम.मोरे यांच्या हस्ते सरस्वतीमातेच्या फोटोचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते अंतिम वर्ष बी व एम.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा तसेच विविध स्पर्धेत व परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थी स्वप्नील गायकवाड व प्राची पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सावर द बँडचे मंदार जोशी यांच्या म्युझिकल बॅण्डचा परफॉर्मन्स शो झाला. सूत्रसंचलन डॉ.एन. ए.तांबोळी यांनी केले. आभार प्रा.एस.पी.जोकार यांनी मानले.

# सांगोला नगर परिषदेकडून वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सांगोला नगरपरिषद कडून सांगोला येथील एस.टी.डेपो परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, महिला व बालकल्याण सभापती छाया मेटकरी, नगरसेवक चैतन्य राऊत, काशिलिंग गावडे, गणेश बनकर, विवेक पाटील, नगरसेविका राणी माने, आशादेवी यावलकर, शोभा फुले यांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न झाले. एस.टी. महामंडळातर्फे आगार व्यवस्थापक विकास पोफळे व सहा.वाहतूक निरीक्षक सागर कदम यांनी सहभाग घेतला. यावेळी नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे, सिटी कोऑर्डिनेटर अजितकुमार पवार, योगेश गंगाधरे, बिराप्पा हाके उपस्थित होते.

# 'संजय राऊत अंतराळातून उडालेलं विमान'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

विधान परिषदेच्या निवडी यापूर्वी देखील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बिनविरोध झाल्या होत्या. ज्या ज्या वेळी बिनविरोध निवडी होतात त्यावेळेस संजय राऊत यांना घोडे बाजार दिसतो. संजय राऊत हे अंतराळातून उडालेल विमान आहे.

ते कुठे जाऊन लँड होईल याचा काही अंदाज लागत नसल्याचे संपर्क प्रमुख खा. धैर्यशील माने यांनी विधान परिषदेमध्ये घोडेबाजार होत असल्याच्या संजय राऊत यांच्या टीकेला प्रति उत्तर दिले.



सोलापूरमधील शिंदेसेनेची जुनी कार्यकारणी बरखास्त केली असून नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी मुलाखती त्यांनी घेतल्या. नवीन कार्यकारणी तयार करण्यासाठी इच्छुकांकडून मुलाखती घेण्यात आल्या. तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देऊन संघटना बळकट करणे हा यामागचा मुख्य हेतू असल्याचे माने यांनी सांगितले. सोलापूरच्या राजकारणात सध्या या बदलामुळे अनेक नवीन चेहऱ्यांना पक्षात संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनीष काळजे, ज्ञानेश्वर सपाटे आदी शिवसैनिक उपस्थित होते.



# छत्रपती शिवरायांची 'अष्टक्रांती' राष्ट्रनिर्मितीचा आदर्श मार्ग

## ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे; शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ स्वराज्याची स्थापना केली नाही, तर कृषी, सामाजिक, आर्थिक, लष्करी, सांस्कृतिक आणि प्रशासकीय क्षेत्रांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणत भारतीय इतिहासात 'अष्टक्रांती' घडविली. शिवरायांच्या या क्रांतिकारी कार्याचा विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवरायांची 'अष्टक्रांती' राष्ट्रनिर्मितीचा आदर्श मार्ग आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक तथा शिवचरित्र व्याख्याते पांडुरंग बलकवडे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बलकवडे हे बोलत होते. विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, हिंदकेसरी पैलवान महेंद्र गायकवाड, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या पद्मजादेवी मोहिते पाटील, प्रा. देवानंद चिलवंत, समन्वयक डॉ. अनिल घनवट यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यासन केंद्राचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. डॉ. राजेंद्र गायकवाड यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. हिंदकेसरी पैलवान महेंद्र गायकवाड याचा विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

बलकवडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा ऐतिहासिक संदर्भांसह उहापोह केला. त्यांनी सांगितले की, शिवरायांनी अन्याय, अत्याचार आणि परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करत स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरविली. लोककल्याणाला केंद्रस्थानी ठेवत त्यांनी पारदर्शक आणि जबाबदार शासनव्यवस्था निर्माण केली. स्त्री सन्मानाचे संरक्षण, शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण, सशक्त आरमाराची उभारणी, किल्ल्यांचे जाळे, सक्षम गुप्तचर व्यवस्था, धार्मिक सहिष्णुता आणि न्यायनिष्ठ कारभार या माध्यमातून त्यांनी आधुनिक राष्ट्रकारभाराचे आदर्श निर्माण केले. त्यांच्या चरित्रातून राम आणि कृष्णाचा संगम दिसून येतो, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. 'छत्रपती शिवरायांची अष्टक्रांती' या विषयावर बोलताना त्यांनी शिवरायांच्या कार्यामुळे भारतीय समाजात निर्माण झालेल्या आत्मविश्वासाची जाणीव करून दिली. सूत्रसंचालन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अनिल घनवट यांनी केले. शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित या विशेष व्याख्यानाला विद्यार्थी, संशोधक आणि इतिहासप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

> सोलापूरला हिंदकेसरीची गदा मिळवून देणारे पैलवान महेंद्र गायकवाड हे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे खेळाडू विद्यार्थी असून ते विद्यापीठाचे स्वाभिमान आहेत. त्यांना विद्यापीठाच्या वतीने पुढील स्पर्धेच्या तयारीसाठी भक्कम आर्थिक सहकार्य मिळवून देणार.
>
> **- प्रा. सचिन गायकवाड**
> सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य

# धावत्या रिक्षातून पडल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ७ जून-**

रिक्षातून प्रवास करीत असताना चक्कर येऊन खाली कोसळल्याने ५५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. हा अपघात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास मड्डीवस्ती सर्कल येथे घडला. सुरेखा माळगे (वय ५५ रा.हत्तुरे वस्ती सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांना बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात काशिनाथ (मुलगा) यांनी दाखल केले. त्या शुक्रवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास रूपा भवानी मंदिर येथून आपल्या घराकडे निघाल्या होत्या. मड्डीवस्ती सर्कलजवळ चक्कर येऊन त्या रिक्षातून बाहेर कोसळल्याने जखमी झाल्या.

# सिध्देश्वर जाधव यांच्याकडून सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट

**सांगोला, दि. ७ जून-**

सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक सिद्धेश्वर जाधव यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला नगरपरिषदेस विविध प्रकारची झाडे भेट म्हणून दिली. ती झाडे सांगोला नगरपरिषदेमार्फत शहरामध्ये न.प.समोरील दुभाजकामध्ये लावण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, इंजि.उत्कर्ष पाटील, यश जाधव, किरण मेटकरी, आरिफ मुलाणी, वैभव बडदे उपस्थित होते. याप्रसंगी शहरातील इतरही नागरिक, उद्योगपती यांनाही सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट देण्याचे आवाहन करत नगराध्यक्ष आनंदा माने यांनी जाधव यांचे झाडे दिल्याबद्दल आभार मानले.






# एम.जे. संस्थेतर्फे शालेय साहित्य वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

एम.जे. प्रथम मानव सेवा संस्था व उडान पंख माणुसकी यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू, गरीब व वंचित विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शालेय साहित्य वितरण कार्यक्रम रामानुज कोट हॉल, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर येथे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना दप्तर, टिफिन बँग, क्वायर वही, लहान वह्या, पेन, पेन्सिल, स्केच पेन, कंपास बॉक्स तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या डोळ्यांतील उज्ज्वल भविष्याची स्वप्ने हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अंबदास गोरंटला यांची उपस्थिती लाभली. तसेच विश्व हिंदू महासंघ (भारत) संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी नंदकिशोर रामचंद्र झंवर (प्रदेश अध्यक्ष), सतीश अर्जुन आनंदकर आणि महेश अंबादास जिंदम, शिवा पोतन, लक्ष्मण बत्तुल, नरेश सोमा, विनायक कोटा, गोवर्धन वंगा, निखिल चेन्नुर यांनी विशेष परिश्रम घेतले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. जे. मोहन टालकोकुल, विजय करवा, कन्हैया सोनी, अंकित झंवर, राजेश लाहोटी, महेश कासट, प्रवीण काबरा, धनराज करवा, गणेश दरक, सुमित मर्दा, नरेंद्र करवा आणि उमेश लोया आदी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### विद्यार्थ्यांनी निसर्गाशी मैत्री करत पर्यावरणपूरक सवयी अंगीकाराव्यात : सारिका रुपनर

**सांगोला, दि. ७ जून-**

पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच निसर्गाशी मैत्री करत पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्या पाहिजेत. वृक्षसंवर्धन, पाणी बचत, प्लास्टिकचा कमी वापर आणि स्वच्छता यांसारख्या उपक्रमांमधून पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण होते, असे प्रतिपादन सारिका रूपनर यांनी केले. त्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज, सांगोला येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी प्राचार्य सिकंदर पाटील उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी स्वरांजली नलवडे, वेदिका माने आणि अथर्व बाबर यांनी पर्यावरण संरक्षणाविषयी प्रभावी मनोगते व्यक्त केली. प्राचार्य सिकंदर पाटील यांनीही विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्ता सिदबट्टे यांनी केले. आभार अश्विनी मोरे यांनी मानले.



### उपळाई खुर्दमध्ये एक दिवस गावासाठी स्वच्छता अभियान

**माढा, दि. ७ जून-**

माढा तालुक्यातील उपळाई खु येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवती प्रदेश कार्याध्यक्ष विनंती कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली एक दिवस गावासाठी स्वच्छता अभियान ही संकल्पना राबवली जात असून त्याची सुरुवात रविवार ७ जून रविवार पासून करण्यात आली आहे. गावकऱ्यांकडून पंधरा दिवसातून एक दिवस कायमस्वरूपी गावात स्वच्छता मोहीम राबवली जाणार असल्याचे विनंती कुलकर्णी यांनी सांगितले आहे. स्वच्छता अभियानात सामाजिक कामात अग्रेसर असलेले युवक ज्येष्ठ नागरिक व महिलांनी सहभाग नोंदवत गावातील अनेक ठिकाणची स्वच्छता केली यामध्ये पशुवैद्यकीय दवाखाना जिल्हा परिषद शाळा पिण्याच्या पाण्याची टाकीचा परिसर स्वच्छ केला. या कार्यात अ‍ॅड. सुरेश पाटील, रानबा कदम, राजीव मोहीते, स्वप्नील कदम, नरेश कदम, माऊली कदम, सौदागर फरतडे, आलोक कदम, समर्थ चव्हाण, अनिस सय्यद, मल्हार देवकते, सौरव कदम, ऋषिकेश कदम, सुनील माळी उपस्थित होते.



### श्री स्वामी समर्थ वटवृक्ष मंदिरात सुनील जाजू, प्रशांत तांबे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ७ जून-**

येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानात सन फार्माचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट सुनिल जाजू आणि सिनियर जनरल मॅनेजर प्रशांत तांबे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या शुभहस्ते स्वामी कृपा वस्त्र प्रदान करून मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल काटरे, सुहास सुनिल काटरे तसेच अखिल बिदनूर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले श्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना केली.




### हटगार समाजातर्फे आदर्श व्यक्तींचा सत्कार

**वळसंग, दि. ७ जून-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे श्री मद्विवीरशैव देवसाली हटगार (कोष्टी) समाजाकडून श्री.ष.ब्र.अभिनव रेवणसिध्द पट्टदेवरु गुरुहिरेमठ, मैंदर्गी यांच्या उपस्थितीत आदर्श व्यक्तींचे सत्कार करण्यात आले. प्रथमतः श्री चौडेश्वरी मातेची पूजा करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले. एलआयसी निवृत्त अधिकारी धानप्पा कण्णगी यांच्या हस्ते श्री.ष.ब्र.अभिनव रेवणसिध्द पट्टदेवरु यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मल्लिनाथ कलशेट्टी (उपमहासंचालक यशदा, पुणे) तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते. यावेळी धानप्पा सन्मुखप्पा कण्णगी यांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कोष्टी समाजाकडून विकास रत्न २०२६ चे पुरस्कार मल्लिनाथ कलशेट्टी, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना देऊन सत्कार करण्यात आला. सोलापूर नगरसेविका राजश्री दोडमनी, पंचायत समिती उपसभापती वर्षा पटणे, मैंदर्गी नगरसेविका सुरेखा होळीकट्टी, भौरम्मा गुंडद, मैंदर्गी नगरसेवक शिवचलप्पा मुनोळी, वळसंग पंचायत समिती सदस्य बलवान गोतसुर्वे, दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचेही सत्कार केले. जिल्हा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, बोरामणी जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे,अभियंता राजेश जगताप, एलआयसी अधिकारी प्रशांत पाटील, सुरेश हिप्परगी याही मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. गुणवंत व आदर्श व्यक्तींना सत्कार झाल्यानंतर प्रीती भोजन कार्यक्रम आयोजित केले होते या संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी समस्त हटगार(कोष्टी) समाज, श्री रामलिंग चौडेश्वरी देवस्थान ट्रस्ट, एस.आर.सी.तरुण मंडळ वळसंग यांनी परिश्रम घेतले.

# मोफत वाळू योजनेच्या अंमलबजावणीवरुन नवे वाद

**मोहोळमध्ये वितरण प्रक्रियेवर लोकप्रतिनिधींचे गंभीर आक्षेप**

**मोफत वाळू योजनेच्या अंमलबजावणीत अनियमिततेचा आरोप**

**प्रशासनाच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

मोहोळ तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून देणाऱ्या मोफत वाळू योजनेच्या अंमलबजावणीवरुन नवा वाद निर्माण झाला आहे. घरकुल लाभार्थ्यांना नियमानुसार वाळू मिळत नसल्याचा आरोप करत पंचायत समितीतील लोकप्रतिनिधींनी महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

शासनाच्या धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याची तरतूद आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक लाभार्थ्यांना संपूर्ण वाळू मिळालेली नसून त्यासाठी अतिरिक्त खर्च व वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे शासनाची योजना कागदावर आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात मोठी तफावत असल्याचा आरोप होत आहे. लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार, तालुक्यात हजारो घरकुल लाभार्थी अद्यापही पूर्ण वाळू वितरणाच्या प्रतीक्षेत आहेत. काही ठिकाणी लाभार्थ्यांना मंजूर प्रमाणापेक्षा कमी वाळू मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे उर्वरित वाळू मिळविण्यासाठी वाहन भाडे, मजुरी आणि इतर खर्चाचा अतिरिक्त आर्थिक भार गरीब कुटुंबांवर पडत असल्याचे नमूद आहे. वाळू घाटांच्या नियोजनाबाबतही प्रश्न आहेत. लाभार्थ्यांच्या गावाजवळ उपलब्ध पर्याय असताना दूरच्या घाटांचे पास दिल्यामुळे वाहतूक खर्च वाढत असल्याचा आरोप आहे. काही भागांमध्ये घाटांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक रस्ते आणि सुविधा नसल्याने लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वाळू वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुसूत्रता नसल्यास शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनांवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या मदतीचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि पूर्ण प्रमाणात पोहोचणे आवश्यक असल्याचे मत स्थानिक स्तरावर व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाच्या कामकाजाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच वाळू वितरणाचे वास्तव चित्र समोर आणण्यासाठी लाभार्थ्यांची यादी, मंजूर वाळूचे प्रमाण आणि प्रत्यक्ष वितरण याचा लेखाजोखा सार्वजनिक करण्याचीही मागणी पुढे आली आहे. लोकप्रतिनिधींनी या संदर्भात राज्य शासन, महसूल विभाग आणि जिल्हा प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करण्याचा निर्णय घेतला असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे.

**कारवाई न झाल्यास रस्त्यावर उतरणार**

जिल्हाधिकाऱ्यांसह तहसीलदारांनाही निवेदने दिली. पण प्रशासनाने गेंड्याचे कातडे पांघरले आहे. तहसीलदारांकडून प्रतिसाद मिळाला नाही. उपविभागीय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाईचे आश्वासन दिले आहे. तात्काळ कारवाई न झाल्यास रस्त्यावर उतरावे लागेल.

**संजीव खिलारे,** भाजपा गटनेता, पंचायत समिती मोहोळ

**घरकुल लाभार्थ्यांवरील अन्याय कधी थांबणार?**

वाळू घाटावर घरकुल लाभार्थी स्वतःचे वाहन घेऊन वाळू आणण्यासाठी गेले असताना आष्टे व कोळेगाव परिसरात वाळू माफियांनी अक्षरशः दहशत निर्माण केली आहे. रस्त्यावर आडवी वाहने लावणे, दगड-गोटे टाकणे, लाकडी उंडके टाकून अडथळे निर्माण करणे असे प्रकार खुलेआम सुरू आहेत.

**घाटातून वाळू चोरी**

ज्या घाटातून लाभार्थ्यांना वाळू काढण्याची परवानगी आहे, त्याच घाटातून रात्रीच्या वेळी अवैधरित्या वाळू चोरी होत आहे. संपूर्ण प्रकाराला तहसीलदार सचिन मुळीक, संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांचे अभय असल्याचा आरोप आहे.

**अविनाश क्षीरसागर**
सामाजिक कार्यकर्ते.

## विरोधकांना आत्मपरीक्षण करण्याची गरज

**घोडेबाजाराच्या आरोपांवर खा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा पलटवार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खासदार संजय राऊत यांनी केलेल्या कथित घोडेबाजाराच्या आरोपांवर शिवसेना (शिंदे गट) खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. पराभवाच्या मानसिकतेतून विरोधक अशा प्रकारचे आरोप करत असून त्यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे त्या म्हणाल्या.

सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. वाघमारे म्हणाल्या, ज्यांना निवडणूक लढवता येत नाही, ज्यांच्याकडे उमेदवार उभे करण्याइतकी ताकद नाही, तेच दुसऱ्यांवर आरोप करत आहेत. अनेक ठिकाणी विरोधकांना स्वतःचे उमेदवारही देता आलेले नाहीत. नाशिकमध्ये उबाठा गटाला उमेदवार देता आला नाही, मग तिथे नेमकी कोणती उलाढाल झाली याचे उत्तर त्यांनी द्यावे. विरोधकांनी आपला पराभव आधीच मान्य केला आहे, असा आरोपही त्यांनी केला.

खासदार सुप्रिया सुळे यांनी घोडेबाजार रोखण्यासाठी लोकसभेत विधेयक मांडण्याची भूमिका व्यक्त केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. वाघमारे म्हणाल्या, स्वतःचा पक्ष आणि माणसं सांभाळता येत नसतील तर इतरांवर आरोप करून उपयोग नाही. विधेयक मांडण्याची भाषा करणाऱ्यांनी आधी एक एकर शेतीतून १०० कोटी रुपयांचे वांग्याचे उत्पन्न कसे मिळते, याची माहिती शेतकऱ्यांना द्यावी.

## बुधवारपासून हजरत ख्वाजा वजीरबाशा यांचा उरुस

**१० जून रोजी संदल,११ जून रोजी महाप्रसाद कार्यक्रम**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

हजरत ख्वाजा वजीरबाशा यांचा उरुस दि. १० जूनपासून सुरू होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उरुससाठी महाराष्ट्र राज्यातून व बाहेरील राज्यातून दरवर्षी हजारो भक्त येतात. त्यामध्ये आंध्रप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, गोवा, मुंबई, पुणे इतर अन्य शहरातून आपले नवस फेडण्यासाठी भक्तांच्या रांगा लागलेल्या असतात.

दोन दिवसांच्या उरुसमध्ये धार्मिक विधी होतात. भक्तांसाठी भोजनप्रसादही असतो. या महिन्यात ख्वाजा वजीरबाशा चिश्ती रहमतुल्लाह आलए दरगाह उरुस हजरत ख्वाजा समाजसेवी संस्थेच्या वतीने साजरा केला जातो. उरुसची शोभायात्रा (संदल) दि.१० जून रोजी सायंकाळी ६ वाजता संदल मिरवणूक निघतो.

मार्कंडेय नगर येथून स्वागत नगर दर्गाह येथे आणला जातो. ११ जून रोजी महाप्रसादाचा आहे, अशी माहिती हजरत ख्वाजा समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष सैफी सज्जादेनशीन हारुन पटेल आणि सचिव शफिक पटेल यांनी दिली आहे.

## दामाजी कारखान्याचे उसबिल २ हजार ८५० रुपयांप्रमाणे वर्ग

**चेअरमन शिवानंद पाटील; १ ते १८ फेब्रुवारी दरम्यानचा ऊस पुरवठा**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ७ जून-**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ हंगामातील दि. १ ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पुरवठा झालेल्या ऊसाचे बिल प्रतिटन २८५० रुपयाप्रमाणे संबंधित बँका व पतसंस्थांकडे वर्ग केले आहे.

कारखान्याच्या चेअरमन शिवानंद पाटील यांनी ही माहिती दिली. कारखान्याचे शेती विभागाने दिलेले बिलांचे व्हाऊचर घेऊन मंगळवार दि. ९ जूनपासून बँकेतून रक्कम उचलावी, असेही त्यांनी आवाहन केले आहे. कारखान्याकडे कोणताही उपप्रकल्प नसताना व इतर उत्पन्नाचे साधन नसेल तरी काटकसरीने खर्चाचे नियोजन करून शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र राहणे हेच संचालन मंडळाचे उद्दिष्ट होते. कारखान्याची एफआरपी रु.२६८९.६५ प्रमाणे असताना संचालक मंडळाने हंगामअखेर सर्व ऊसाच्या बिलांसाठी प्रतिटन २८५० रुपयांप्रमाणे बिल दिले आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाचा विचार करत संचालक मंडळाने प्रति मे.टन रु. १६०.३५ जास्तीचा बिल देण्याचे निर्णायक पाऊल उचलले आहे. याशिवाय ऊस तोडणी व वाहतूक ठेकेदारांची बिले व कर्मचाऱ्यांचे वेतन यांसाठी लागणारी देणे आधीच वेळेवर भरली गेली आहेत, असेही ते म्हणाले.

सध्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सुमारे ८२०० हेक्टर ऊस नोंदवला गेला आहे. संचालक मंडळ, व्हाइस-चेअरमन तानाजी खरात, सर्व सभासद शेतकरी, तोडणी-वाहतुक ठेकेदार तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्याने २०२६-२७ हंगामात सुमारे ५ ते ६ लाख टन ऊस गळीत करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी शेतकऱ्यांनी वेळेवर बँकेत जाऊन आपली रक्कम मिळवावी, असे सांगितले. शेवटी चेअरमनने सर्व शेतकऱ्यांचे, संचालक मंडळाचे व कर्मचारी-कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## पोलिस असल्याची बतावणी करुन व्यापाऱ्याची लूट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जून-**

पोलीस असल्याची बतावणी करुन व्यापाऱ्याची गाडी अडवून चारजणांनी कलबुर्गीतील व्यापाऱ्याला लुटले. तसेच आणखी पैशांची खंडणी मागत धमकीही दिल्याची फिर्याद अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाली आहे.

कलबुर्गी (कर्नाटक) येथील व्यापारी ईमहान मेमन (वय ४७ रा. ढंका चौक कलबुर्गी, जि. कलबुर्गी) यांनी गुलाब मुन्ना, महिबूब शेख बंदेनवाज शेख यांच्या विरोधात तक्रार दिली आहे. ते २ जून रोजी (गाडी क्र. एमएच ०४ एफझेड १८८५) ने ड्रायव्हर तौसीफ बागवान (वय ३४, रा. गुरुनानक चौक सोलापूर ) असे दोघे कलबुर्गी येथून रात्री सोलापूरातील नातेवाईका सैफअली सग्गेस यास २ लाख रुपये देण्यासाठी निघाले होते. रात्री ०९:३० ते १०:०० दरम्यान हन्नुर पुल पार करुन सोलापूरकडे निघाले होते. यावेळी मागून पांढऱ्या कारने आलेल्या सादिक मुजावर (रा. कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) याने पोलिस असल्याचे बतावणी करत रस्ता अडवला. तु गुटख्याचा व्यापारी आहेस, तुझी गाडी तपासायची असे बोलू लागले. ड्रायव्हरकडील २ लाख रुपये हिसकावून काढून घेतले. गुन्हा दाखल करायचा नसेल तर आणखी एक लाख रुपये दे म्हणून दमदाटी करत कारमध्ये बसून पळून गेले त्यानंतर घाबरून संबंधित व्यापारी कलबुर्गीला जावून अक्कलकोटला आला.

पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी येत असताना त्याला काठीने मारहाण केलेला सादीक मुजावर कारंजा चौकात सायंकाळी ०७:०० वाजता दिसला. त्यास ताब्यात घेवून पोलिस ठाण्यात हजर करुन तक्रार दाखल केली. दरम्यान या घटनेनंतर तालुक्यात पोलिसांची प्रतिमा उंचावण्यासाठी दोषीवर कठोर कारवाई करुन सत्य जनतेसमोर त्वरीत मांडण्याची मागणी होत आहे.

## पूर्वीच्या भांडणावरुन लोखंडी रॉडने मारहाण; ४ तरुण जखमी

**सोलापूर, दि. ७ जून-**

पूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन लोखंडी रॉड, लाकडी वासा, दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. ही घटना हाजीमाही चौक परिसरातील खाटीक मशिद जवळ शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. जाकीर खान (वय १८) त्याचा भाऊ समीर खान (वय २४ ) तहीन शेख (वय २२) आणि अहमद नदाफ (वय २० सर्व रा.उत्तर कसबा चौपाड) अशी जखमीची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रात्री ११ वाजेच्या सुमारास त्यांना पूर्वीच्या भांडणातून इब्राहिम कुरेशी, शेरू कुरेशी आणि इतर ८ जणांनी मिळून मारहाण केली.

## गाडीत गॅस भरण्याच्या वादातून तरुणास हॉकी स्टिकने मारहाण



**सोलापूर, दि. ७ जून-**

गाडीत सीएनजी गॅस भरण्याच्या वादातून एका तरुणाला हॉकी स्टिक व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी करण्यात आल्याची घटना चिंचोली एमआयडीसी येथील सीएनजी पंपावर आज रविवारी सकाळी सात वाजता घडली. राम राजेंद्र सर्वगोड (वय-२८, रा. बीबीदारफळ, ता.उत्तर सोलापूर ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. आज सकाळी चिंचोली एमआयडीसी येथील सीएनजी पंपावर गॅस भरण्याच्या वादातून त्याला अभिराज पसारे याने मारहाण केली. यात नाकाला जखम व सर्वांगाला मुकामार लागल्याने त्याला उपचार करता शासकीय रुग्णालयात मित्र नागनाथ पवार यांनी दाखल केले.

## बीडीओंच्या कार्यपध्दतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह; विकासाची नांदी की वादाची मालिका?

**करमाळ्यानंतर मंगळवेढ्यातही गटविकास अधिकाऱ्यांच्या उत्तरदायित्वाचा मुद्दा ऐरणीवर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

जिल्ह्यातील पंचायत समिती प्रशासन पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. करमाळा आणि मंगळवेढा या दोन तालुक्यांतील गटविकास अधिकाऱ्यांच्या कामकाजावरून निर्माण झालेल्या वादामुळे ग्रामविकास यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर आणि उत्तरदायित्वावर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. तालुक्याच्या विकास प्रक्रियेत गटविकास अधिकारी हे महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र मानले जाते.

ग्रामपंचायती, पंचायत समिती, विविध विकास योजना आणि शासकीय निधीच्या अंमलबजावणीची प्रमुख जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यांची उपस्थिती, निर्णयक्षमता आणि जनतेशी असलेला समन्वय विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र अलीकडच्या काळात काही तालुक्यांमध्ये गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजीचा सूर उमटत आहे. करमाळा पंचायत समितीतील काही प्रशासकीय निर्णयांवरून वाद निर्माण झाले असतानाच आता मंगळवेढा पंचायत समितीतील कामकाजावरूनही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांच्या वारंवार गैरहजेरी, प्रशासकीय समन्वयाचा अभाव आणि लोकप्रतिनिधींशी संवाद कमी असल्याच्या तक्रारी विविध स्तरावरून समोर येत आहेत.

स्थानिक स्तरावर व्यक्त होत असलेल्या मतांनुसार, पंचायत समिती कार्यालयात अधिकारी नियमित उपलब्ध नसल्यास विकासकामांच्या मंजुरी, प्रशासकीय प्रस्ताव, निधी वितरण आणि नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होतो. परिणामी सामान्य नागरिक, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि कर्मचारी यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे, ग्रामविकास विभागाच्या अनेक महत्त्वाच्या योजना सध्या ग्रामीण भागात राबवल्या जात आहेत. घरकुल, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, रोजगार हमी आणि विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंचायत समितीचे नेतृत्व सक्षम असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होणे ही प्रशासनासाठी चिंतेची बाब मानली जात आहे. यामुळे आता केवळ एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यशैलीचा प्रश्न राहिलेला नसून पंचायत समिती प्रशासनातील जबाबदारी आणि उत्तरदायित्वाचा व्यापक मुद्दा पुढे आला आहे. जिल्हा प्रशासनाने अशा तक्रारींची वस्तुनिष्ठ पडताळणी करून आवश्यक ते निर्णय घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**मंगळवेढा गटविकास अधिकाऱ्यांचीही कारकीर्द वादग्रस्त**

मंगळवेढ्याच्या गटविकास अधिकारी जास्मिन शेख यांना सक्तीच्या रजेवर पाठवल्याची चर्चा आहे. मंगळवेढा पंचायत समिती कार्यालयात नियुक्ती असताना कामावर येत आहे, असे कर्मचाऱ्यांना सांगून दिवसभर दांड्या मारल्याने लोकांची कामे खोळंबली. याबाबत आमदार समाधान आवताडेंपर्यंत तक्रारी गेल्यानंतर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवल्याचे सांगण्यात येत आहे. शेख यांचीही आत्तापर्यंतची कार्यकीर्द वादळी ठरली आहे. उत्तर पंचायत समितीकडे नेमणुकीस असताना पदाधिकाऱ्यांबरोबर त्यांचे अनेक वेळा खटके उडाले. डॉ.कदम आणि शेख यांच्या वादळी कारकिर्दीबाबत प्रशासनाला माहिती असतानाही त्यांच्यावर आत्तापर्यंत कारवाई झालेली नाही.

CMYK


# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कोसळलेले झाड त्वरीत दूर करणे गरजेचे

**अक्कलकोट, दि. ७ जून-**

मैदर्गी रस्ता निलवाणी प्लॉट समर्थ पार्क येथे वीजवहन तारांवर वादळी वारा पाऊस यामुळे झाड कोसळले आहे. ते त्वरीत दूर करणे गरजेच आहे, अन्यथा अपघाताची शक्यता आहे. याबाबत काशीनाथ कोळ्ळे, बारसकर यांच्यासह परिसरातील नागरिकांनी वीज वितरण कंपनीला कळवले. मात्र अद्याप झाड बाजुला केले नाही. यामुळे पुन्हा अनर्थ घटना होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात येत आहे.





## महत्त्वाचे...



### वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. ७ जून-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय येथे आज शनिवार दि.६ जून रोजी सकाळी 'शिवराज्याभिषेक दिन' साजरा करण्यात आला. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ व संचालक धिरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी वाचनालयाचे वाचक वर्ग व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ यांनी केले तर आभार प्रदर्शन वाचनालयाचे संचालक प्रमोद भंडारी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



### अन्नछत्र मंडळाकडून स्वामी भक्तांना अनेक सुविधा : सचिन सहस्त्रबुध्दे

**अक्कलकोट दि.७ जून-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून श्रद्धेला आधुनिकतेची जोड दिल्याने स्वामी भक्तांना आवश्यक सोयी सुविधा मिळत असल्याचे प्रशंसोद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपसचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. सहस्त्रबुद्धे हे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोट नगरपरिषदेचे घरकुल विभागाचे प्रथमेश अळ्ळोळी हे उपस्थित होते. याप्रसंगी बाळासाहेब पोळ, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे, शुभम सावंत, दत्ता मोरे, किरण साठे, यश विभूते, विनायक भोसले, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, रोहित कदम, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



### एकता मंचच्या वतीने झरेगांव वृक्षारोपण

**वैराग, दि. ७ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दि. ५ जून रोजी बार्शी तालुक्यातील झरेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. महिलांनी वृक्षसंगोपनाची सामूहिक शपथही घेतली. उपक्रमात एकता महिला मंचच्या शितल संकपाळ, लक्ष्मी संकपाळ, अश्विनी कडपे, जयश्री संकपाळ, मंगल पोटभरे यांच्यासह गावातील इतर सदस्या व महिला उपस्थित होत्या.



### दहिटणे येथे एकता महिला मंचतर्फे वृक्षारोपण

**वैराग, दि. ७ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवार ५ जून रोजी, बार्शी तालुक्यातील दहिटणे येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. मंचच्या सदस्यांनी घरासमोरील मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले. तसेच वृक्षांचे जतन करण्याची सामुहिक शपथही घेतली. याप्रसंगी एकता महिला मंचच्या प्रमुख सदस्या लक्ष्मी सुतार, आरती कोळी, विश्रांता शेळके यांच्यासह गावातील इतर महिला व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लंडनहून येणार श्री विठ्ठलाची पालखी

## ५० दिवसात तब्बल ११ देशांचा प्रवास; श्री विठ्ठल व आषाढी यात्रेची कीर्ती सातासमुद्रापार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ जून -**

वारकरी सांप्रदायात कुंभमेळ्या इतके आषाढी एकादशीच्या सोहळ्याला महत्व असते. देहू, आळंदीसह राज्याच्या विविध भागातून संतांचे पालखी सोहळे पंढरपूरात येत असतात. यंदाच्या वर्षी चक्क लंडन येथून विठ्ठल भक्ताची दिंडी पंढरपूर येथे येणार आहे. यामुळे विठ्ठलाची भक्ती साता समुद्रापार पोहोचल्याचे दिसून येत आहे.

आषाढीच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देहू येथून संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा ७ जुलै तर आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा ८ जुलै रोजी मार्गस्थ होणार आहे. संतांच्या पालखी सोहळ्यात लाखो भाविक सहभागी होणार आहेत. हरिनामाचा गजर करत विविध संतांचे पालखी सोहळे विविध जिल्ह्यातून पंढरपुरात दाखल होणार आहेत.



याच धर्तीवर यावर्षी लंडन ते पंढरपूर ही पहिली ग्लोबल दिंडी आषाढी यात्रेसाठी येणार आहे. ही दिंडी ११ देश व ५० दिवसाचा प्रवास करून शेकडो भक्तांसह आषाढी एकादशी दिवशी पंढरपुरात पोहोचणार आहे. दिंडीचे आयोजन अनिल खेडकर या मराठी भक्ताने केले आहे. विठ्ठलाचे असंख्य भक्त भारतात आहेत. तसेच हे भक्त आता सातासमुद्रापार उपजिविकेसाठी वास्तव्यास आहेत. मात्र तरीही त्यांचे विठ्ठलावरील प्रेम आणि भक्ती तूसभरही कमी झाली नसल्याचे दिसत आहे. एकंदरीतच राज्यासह देशातील इतर राज्यातून येणाऱ्या विविध संतांच्या पालखी सोहळ्याबरोबरच आता थेट लंडन येथून देखील पालखी सोहळा पंढरपूरात येणार असल्यामुळे यंदाच्या आषाढी यात्रेसाठी हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### सोहळा २६ जुलै रोजी पंढरपुरात दाखल होणार

लंडन येथून ही दिंडी ६ जून रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. ११ देश व ५० दिवसाचा प्रवास करून हा दिंडी सोहळा २६ जुलै रोजी पंढरपुरात दाखल होणार आहे. ही दिंडी लंडन, नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, पोलंड, झेक, रिपब्लिकन, हंगेरी, तुर्कीये, जॉर्जिया आदी देशातून भारतात येणार आहे. त्यानंतर ती पंढरपुरात दाखल होणार आहे.

# वाहतुकीची कोंडी, पोलिसांचे दुर्लक्ष

- सुटीमुळे दर्शनासाठी भाविकांच्या गर्दीत वाढ
- महत्वाच्या चौकात वाहनांची दाटी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ जून-**

अधिक महिना व शनिवार, रविवार सुट्टी असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपुरात भाविकांची संख्या वाढली आहे. अनेक भाविकांनी खासगी वाहने आणली आहेत. यामुळे चौका-चौकांमध्ये वाहतुकीची कोंडी झाली असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांचे मात्र याकडे दुर्लक्ष असल्याने भाविक व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या शाळांच्या उन्हाळी सुट्या त्यामध्येच अनायसा आलेल्या अधिक महिन्यांमध्ये भाविक तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यासाठी जातात. तसेच शनिवार, रविवार सलग शासकीय सुट्टी असल्यामुळे नोकरदार व इतर नागरिक विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपुरात दाखल झाले आहेत.

अनेक भाविकांनी खाजगी वाहने आणली असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पंढरपुरात वाहने दाखल झाली आहेत. यामुळे शहरातील महत्वाच्या चौका-चौकात वारंवार वाहतुकीची कोंडी होत आहे.



### बंदोबस्त ठेवून वाहतुकीचे नियोजन आवश्यक

अधिक महिन्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात भाविकांची संख्या वाढणार असल्यामुळे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवून वाहतुकीचे नियोजन करणे गरजेचे होते; मात्र याकडे पोलिसांचे दुर्लक्ष असल्यामुळे याचा त्रास भाविक तसेच शहरातील सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे पहावयास मिळत आहे.

चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सावरकर चौक, इंदिरा गांधी चौक, सांगोला चौक, अर्बन बँक चौक आदी परिसरात गोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाली असल्याचे दिसून येत आहे. याचा त्रास भाविक तसेच शहरातील सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागल्याने एकंदरीतच नाराजीचा सूर व्यक्त होत आहे.

## खतांसाठी ऑनलाईन बुकिंग सक्तीबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम

**सोलापूर, दि. ७ जून-**

शासनाच्या कृषी विभागामार्फत अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणासाठी ऑनलाइन बुकिंग व डिजिटल टोकन प्रणाली लागू केली आहे. नव्या प्रक्रियेबाबत शेतकरी व खत विक्रेत्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सोलापूर सीड्स फर्टिलायझर अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशनचे सचिव बालाजी चौगुले यांनी शेतकरी व विक्रेत्यांच्या वतीने महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. अनेक शेतकरी आजही स्मार्टफोन, इंटरनेट व ऑनलाइन व्यवहारांपासून दूर आहेत. अशा परिस्थितीत खत खरेदीसाठी ऑनलाइन बुकिंग सक्तीची केल्यास शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. खरीप हंगामाच्या तोंडावर खतांची गरज असताना तांत्रिक अडचणी, नेटवर्क समस्या व डिजिटल साक्षरतेचा अभाव यामुळे शेतकरी व विक्रेते यांच्यात वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्यांनी म्हटले आहे.



# खा. मोहिते-पाटील यांनी केली गारपीटग्रस्त केळीबागांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ जून-**

माढा तालुक्यातील अकोले, टाकळी, आलेगाव खुर्द, चांदज, रुई, वडवली तसेच कोंढार परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे केळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शुक्रवारी नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यावेळी शेतकऱ्यांनी गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती खासदार मोहिते-पाटील यांना दिली. सुमारे एक हजार एकरांवरील केळीबागांना फटका बसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी केळीची झाडे कोसळली असून फळांचे मोठे नुकसान झाले आहे. केळी उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला असताना अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासनाने तत्काळ पंचनामे करावेत आणि शासनाकडे सविस्तर अहवाल सादर करावा, अशी सूचना खासदार मोहिते-पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. तसेच

### पंचनामे करून तातडीने मदत द्या; शासनाकडे पाठपुरावा करणार

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळावी यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी नेते शिवाजीराव पाटील चांदजकर यांनी शासनाने संपूर्ण पीक कर्ज माफ करावे तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी पाच लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी केली. केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांना तातडीने आर्थिक आधार देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शासनाने त्वरित मदतीची घोषणा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा येणाऱ्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मुंबई येथील आझाद मैदानावर शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शिवाजीराव पाटील चांदजकर यांनी दिला आहे.

# दारुच्या नशेत घरात घुसुन महिलेला मारहाण; जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जून-**

सकाळी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरुन दारुच्या नशेत एका महिलेच्या घरात घुसून तिला बेदम मारहाण केल्याची घटना बार्शी शहरातील राऊत चाळ परिसरात घडली आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

आशा वाघमारे (वय ४८, रा. राऊत चाळ, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. त्या आपल्या पतीसम वेत मजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दि. ५ जून रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास त्या घरी एकट्याच टीव्ही पाहत



बसल्या होत्या. त्यावेळी शेजारी राहणारा प्रशांत उर्फ प्रविण नवनाथ रिकीबे हा दारुच्या नशेत त्यांच्या घरात आला.

सकाळी त्याच्या वडिलांशी झालेल्या वादाचा जाब विचारत त्याने महिलेस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. महिलेने वाद मिटला असल्याचे सांगून त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपी अधिक आक्रमक झाला. आरोपीने महिलेला शिवीगाळ करत हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी पाठीवर आणि पोटावर मारहाण केली. यावेळी महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने हातातील कड्याने त्यांच्या तोंडावर जोरदार प्रहार केला. त्यानंतर त्यांना घराबाहेर ओढत रस्त्यावर नेऊन पुन्हा मारहाण केली. या हल्ल्यात म हिला जखमी झाल्या असून त्यांच्या चेहऱ्यावर सूज आली आहे.

मारहाण केल्यानंतर आरोपीने 'तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देत पलायन केले. घटनेनंतर पीडित महिलेने आपल्या पती व मुलास घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी त्यांना वैद्यकीय उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविले. या प्रकरणी प्रशांत उर्फ प्रविण नवनाथ रिकीबे (रा. राऊत चाळ, बार्शी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.

# शिक्षणसेवकांना सामाजिक सुरक्षा कवच कधी?

- आरोग्य विमा, अपघाती संरक्षण आणि अनुकंपा नियुक्तीची मागणी
- राज्यभरातील ४० हजारांहून अधिक शिक्षणसेवकांची शासनाकडे आर्त हाक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

राज्यातील शिक्षणसेवकांना नियमित शिक्षकांप्रमाणे आरोग्य सुविधा, वैद्यकीय परतावा, आरोग्य विमा, अपघाती विमा संरक्षण तसेच अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी राज्यभरातील शिक्षणसेवकांकडून जोर धरू लागली आहे.




मागणीसंदर्भात मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे. शिक्षणसेवकांच्या सेवाशर्तींचा पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. राज्य शासनाच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना परिविक्षाधीन कालावधीत नियमित वेतनासह विविध शासकीय सुविधा मिळतात. मात्र शिक्षणसेवकांना तीन वर्षे केवळ मानधनावर सेवा द्यावी लागते. या कालावधीत त्यांना वैद्यकीय सुविधा, आरोग्य विमा अथवा अपघाती विमा संरक्षण उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक असुरक्षिततेची टांगती तलवार कायम राहते.

शिक्षणसेवक केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता शाळांमधील प्रशासकीय जबाबदाऱ्या, निवडणूक कर्तव्ये, बीएलओ कामकाज, जनगणना, विविध सर्वेक्षणे तसेच शासनाकडून सोपविण्यात येणारी इतर कामेही पार पाडत आहेत. जबाबदाऱ्या नियमित शिक्षकांप्रमाणेच असताना संरक्षणात्मक सुविधा मात्र उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

सन २०२४ मधील शिक्षक भरतीनंतर राज्यातील काही शिक्षणसेवकांचा विविध कारणांनी मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. अशा वेळी संबंधित कुटुंबांना सानुग्रह अनुदान, विमा लाभ किंवा अन्य आर्थिक सहाय्याची कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याने गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

### जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडूनही पाठपुरावा हवा

सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक, माध्यमिक, खाजगी, अल्पसंख्याक व अल्पभाषिक संस्थांमध्ये मिळून सुमारे १३०० हून अधिक शिक्षणसेवक कार्यरत आहेत. यापैकी अनेकांना जनगणना आणि बीएलओची जबाबदारीही देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागानेही या प्रश्नाची दखल घेऊन शासनाकडे सकारात्मक पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.